वांकडें घर

(एक अद्भुत कथा)

बाबूराव अर्नाळकर

मुकुंदमाला : पुष्प १०२ वें

फक्त १॥ रुपया

मुकुंदमाळा...

पुष्प १०२ वें

वांकडें घर

(एक अद्भुतरम्य रहस्यकथा)

[कादंबरी क्रमांक ६७४]

लेखक

बाबूराव अर्नाळकर

रम्यकथा प्रकाशन,

५५१ बुधवार पेठ, कासारदेवी धर्मशाळा, पुणे २.

किंमत १॥ रुपया

प्रकाशक : व्ही. जी. मेहेंदळे रम्यकथा प्रकाशन, ५५१ बुधवार पेठ, पुणें २.

प्रथमावृत्ति : फेब्रुवारी १९६७ किंमत १॥ रुपया

श्री. बाबूराव अनाळिकरांच्या नवनवीन रहस्यमय

कादंबऱ्या ज्यांतून प्रसिद्ध होतात, त्या—

- जयमाला— वार्षिक वर्गणी रु. १२-००
- मुकुंदमाला— वार्षिक वर्गणी रु. १२-००
- झुंजारमाला— वार्षिक वर्गणी रु. १५-००
- चित्तरंजनमाला— वार्षिक वर्गणी रु. १५-००
- रहस्यरंजनमाला— वार्षिक वर्गणी रु. १५-००
- गूढरंजनमाला— वार्षिक वर्गणी रु. १५-००

आ ऽ णि ' चार आणे मालेंतून ' प्रसिद्ध झालेल्या व एकेकाळीं अत्यंत गाजलेल्या रहस्यमय कादंबऱ्यांचें पुनर्मुद्रण करणाऱ्या—

- कूटकथामाला— वार्षिक वर्गणी रु. १२-००
- खूनकथामाला— वार्षिक वर्गणी रु. १२-००
- मस्तकथा— (रहस्यमय, रोमांचकारी, विचित्र, विलक्षण, अद्भुत, भीषण आणि साहसकथांस वाहिलेली एकमेव सचित्र माला) खास अंकासह वार्षिक वर्गणी रु. १०-००

सर्व नऊहि मालांची एकत्र वार्षिक वर्गणी फक्त रु. १००

(सर्व पुस्तकें रजिस्टर पोस्टानें एकत्र पाठविलीं जातात.)

दोन रुपये योजनेचे सभासद व्हा. माहिती मागवा.

त्यांत आपला भरपूर फायदा आहे.

मुद्रक : वि. कृ. पटवर्धन, जयभारत मुद्रणालय, ५५१ बुधवार पेठ, पुणें २.

कौटुंबिक मनोरंजनाचीं सुंदर साधनें

'रम्यकथा प्रकाशन' व 'सुंदर साहित्य प्रकाशन' यांमार्फत दरमहा २० तारखेस निरनिराळ्या प्रकारचीं एकूण २० पुस्तकें अत्यंत आकर्षक ढंगांत प्रसिद्ध होतात. त्यांची साधारण वर्गवारी पुढीलप्रमाणें—

(१) बाबूराव अर्नाळकर यांच्या अत्यंत चित्ताकर्षक नवीन व दुर्मीळ अशा ८ रहस्य-कादंबऱ्या. (एकूण किंमत रु. ९.)

(२) तरुण-तरुणींना गुदगुल्या करणारे नि प्रेम करायला शिकवणारे प्रणयशृंगार-कथांचे ३ अंतर्बाह्य सुंदर सचित्र संग्रह. (एकूण किंमत रु. २॥।)

(३) लैंगिक विषयांची अत्यंत मनोवेधक, उपयुक्त नि अद्यावत् माहिती देणारी एकमेव मराठी मासिक-माला... 'कामजीवन' (किंमत फक्त ७५ पैसे)

(४) लहान मुलांसाठीं अद्भुतरम्य तशाच उपदेशगर्भ बालकथांचीं अंतर्बाह्य सचित्र व चित्ताकर्षक अशीं ५ पुस्तकें. (एकूण किंमत रु. १॥)

(५) लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांचें निर्दोष मनरंजन करणारीं अद्भुतरम्य प्राचीन नि लोकप्रिय कथांचीं अंतर्बाह्य आकर्षक अशीं किमान ३ पुस्तकें. (एकूण किंमत अंदाजें रु. ३)

वरील सर्व प्रकाशनांची सवलतींचीं एकत्र वार्षिक वर्गणी किमान १५० रुपये होते, म्हणून—आम्हीं दोन सवलतींच्या योजना जाहीर करीत आहोंत....

(मागील पानावर पहा...)

२ रुपये ग्राहक योजना

दरमहा आमचीं सर्व प्रकाशनें घेण्याची इच्छा असूनहि अधिक वर्गणी आगाऊ भरणें ज्यांना गैरसोईचें असेल त्यांनीं २ रुपये डिपॉझिट भरावें. दरमहा पाऊणपट किंमतीच्या व्ही. पी. नें त्यांना सर्व पुस्तकें पाठविण्यांत येतील. व्ही. पी. खर्च आमचा.

१॥ रुपया ग्राहक योजना

ज्यांना आमचीं सर्वच प्रकाशनें नको असतात, परंतु त्यांतील निम्मीं किंवा अधिक हवीं असतात त्यांनीं १॥ रुपया अनामत भरावा. त्यांना हवीं असतील तीं पुस्तकें दरमहा ७/८ किंमतीच्या व्ही. पी. नें घरपोंच पाठवूं.

• मात्र, वरील दोन्ही सवलत-योजनांबाबतींत व्ही. पी. परत आल्यास डिपॉझिट रक्कम पुन्हां भरावी लागते; ही अट मात्र लक्षांत ठेवावी.

तरी वरीलपैकीं कोणत्याहि योजनेसाठीं ताबडतोब अनामत रक्कम पाठवून अखंड आनंदाचा ठेवा सवलतीच्या दरांत हस्तगत करा—

• अधिक माहितीसाठीं लिहा •

रम्य कथा प्रकाशन

५५१ बुधवार पेठ, पुणें २.

वांकडें घर !

१ : आजोबांचा मृत्यु !

सुचित्राची आणि माझी ओळख झाली ती केवळ आम्ही दोघें सरकारी खात्यांत काम करत होतों म्हणून. त्यावेळीं तिचें वय अवघें बावीस वर्षांचें होतें आणि काम करण्याच्या तिच्या पद्धतीमुळें आणि हुषारीमुळें माझें लक्ष प्रथम तिच्याकडे वेधलें होतें.

सुचित्रा दिसण्यांत फार सुंदर नसली तरी आकर्षक होती. ती सुस्वभावी आणि विनोदी वृत्तीची होती. त्यामुळें तिच्याबरोबर बोलतांना मला आनंद होत असे. आमची मैत्री जमली. आम्ही दोघे ऑफिसच्या आणि इतरहि अनेक मेजवान्यांना हजर राहिलों होतों. कांहीं छोटया सफरीहि केल्या होत्या. ती जरी मनमोकळेपणें बोलणारी आणि प्रेमळपणें वागणारी होती, तरी ती सभ्यतेच्या मर्यादा सांभाळणारी होती.

हें सर्व मला माहीत होतें, पण मला दोन वर्षांकरितां परदेशीं जाण्याचा हुकूम मिळेपर्यंत एक गोष्ट मला समजली नव्हती. ज्या दिवशीं तो हुकूम माझ्या हातीं पडला त्यावेळीं, माझें सुचित्रावर प्रेम जडलें आहे आणि तिच्याशीं विवाहबद्ध होण्याची माझी उत्कट इच्छा आहे हें माझ्या लक्षांत आलें ! तें लक्षांत आल्यामुळें मला आश्चर्याचा धक्का बसला नव्हता. फक्त माझ्या मनाला जें कांहीं वाटत होतें तें आतां स्पष्टपणें समजलें होतें इतकेंच.

त्यामुळेंच आम्ही हॉटेलांत एकमेकांचे सुखदुःखाचे निरोप घेत असतांना मीं तिच्याकडे वेगळ्या दृष्टीनें पाहिलें. अर्थात् मीं जें पाहिलें तें मला माहीत होतें आणि तें मला आवडलेंहि होतें. मला तिचा चेहरा, तिचा पेहराव, तिचें वागणें, बोलणें हंसणें, एकदम पसंत पडलें होतें. प्रेम आंधळें असतें असें म्हणतात.

आम्ही आतांपर्यंत एकमेकांना भेटल्यानंतर अनेक गोष्टींसंबंधीं चर्चा करीत होतों. आमच्या आवडीनिवडी, भविष्यकाळासंबंधींचें आमचें ध्येय,

आमच्या मित्र–मैत्रिणी, राजकारण, समाजकारण वगैरे अनेक गोष्टींवर आम्ही बोलत होतों. तरी तिनें कधींहि स्वतःबद्दल, स्वतःच्या घराबद्दल कांहींच सांगितलें नव्हतें. तिला माझ्यासंबंधींची सर्व माहिती होती. मला मात्र तिची कांहींच माहिती नव्हती आणि ती गोष्ट आतांपर्यंत माझ्या लक्षांतच आली नव्हती.

सुचित्रानें मी कशाबद्दल विचार करीत आहें असें मला विचारलें आणि मीं सत्य उत्तर दिलें, 'तुझ्याबद्दलच विचार करीत आहें.'

'अस्सें.' ती म्हणाली. पण माझें बोलणें तिला समजलें नसावें असें दिसलें.

'हें बघ सुचित्रा, कदाचित् आपली दोन वर्षें भेट होणार नाहीं.' मी म्हणालों, 'मी मुंबईस परत कधीं येईन तें मला माहीत नाहीं. पण आल्यानंतर मी कोणती प्रथम गोष्ट करीन हें मात्र मला माहीत आहे. मी तुझी भेट घेईन आणि तूं माझ्याबरोबर लग्न केलें पाहिजेस असें सांगेन.'

तिनें स्थिर नजरेनें माझ्याकडे पहात तें ऐकलें. नंतर ती दुसरीकडे मान वळवून पाहूं लागली आणि क्षणभर मला असें वाटलें कीं तिला माझें हेंहि बोलणें समजलें नसावें.

'ऐक सुचित्रा' मी म्हणालों, 'ताबडतोब तूं माझ्याबरोबर लग्न करावें असें मी तुला सुचविणार नाहीं. तसें करणें योग्य नाहीं. पहिली गोष्ट ही, कीं तूं कदाचित् मला नकार देशील आणि नव्या कामगिरीवर जातांना मी मनानें अतिशय नाराज झालों असेन. त्यामुळें मला माझें कर्तृत्व सिद्ध करतां येणार नाहीं. शिवाय मी पुरुष असल्यामुळें माझा स्वाभिमान दुखावला म्हणून मी कुणाहरी भलत्या स्त्रीबरोबर विवाहबद्ध होऊन कदाचित् जन्माचाच दुःखी होईन

'आणि समज, तूं जर मला आतांच होकार दिलास तर काय होईल? आपण लग्न करायचें आणि ताबडतोब एकमेकांपासून कांहीं वर्षें दूर व्हायचें? तसला विरह तर मला मुळींच सहन होणार नाहीं आणि मला वाटतें, तुलाहि ती परिस्थिति रुचणार नाहीं. तूं आणि मी मिळून जें कांहीं करूं तें कायमचेंच असलें पाहिजे. दुसऱ्या कोणत्याहि प्रकारें लग्नाचा

निदान मला तरी कांहींच उपयोग होणार नाहीं.'

'आणि मलाहि नाहीं' ती म्हणाली, 'म्हणून मी म्हणतें, तुम्ही आतां परदेशीं जा आणि परत आल्यानंतर जर तुमचा सभ्यांचा विचार कायम राहिला असला तर मला भेटा...आणि–'

'मला त्याबद्दल मुळींच शंका नाहीं.'

'शंका सर्व बाबतींत असते.' ती म्हणाली, 'माणसाच्या आयुष्यांत त्याचीं सारीं सुखस्वप्नें क्षणार्धांत उधळून लावणाऱ्या अनपेक्षित गोष्टी घडत असतात. त्यांतून तुम्हांला माझ्याबद्दल कांहींच माहीत नाहीं.'

'तूं कुठें रहातेस तेंसुद्धां मला माहीत नाहीं.' मी म्हणालों.

'मी जोगेश्वरी येथें रहातें.'

मीं मान डोलाविली. जोगेश्वरी येथें कुठल्यातरी देवीचें मंदिर आहे आणि तेथें कांहीं गरम पाण्याचीं कुंडें आहेत हें मला माहीत होतें!

ती हलक्या आवाजांत पुढें म्हणाली, 'आमच्या त्या छोट्या निवासस्थानाचें नांव आहे– 'वांकडें घर.'

मी किंचित् दचकून तिच्याकडे पाहिलें आणि तिला त्या गोष्टीची गंमत वाटली. ती पुढें म्हणाली, 'आम्ही रहातों तें घर असें पाहिल्यास लहान नाहीं. पण तें वेडेंवांकडें आहे. हें मात्र खरें आहे. तें घर अर्धें लांकडी आहे. त्याच्या आकारावरून तें वांकडे घर म्हणून प्रसिद्ध आहे.'

'तुमचें बरेंच मोठें कुटुंब असणार? तुला भाऊ बहिणीहि असतील?'

'मला एक भाऊ आहे, एक बहीण आहे, आई, बाबा, काका आणि एक चुलती आहे. माझे आजोबा आहेत. एक चुलत आजी आहे आणि एक सावत्र आजी आहे.'

'अरे बापरे!' मी उद्गारलों.

ती हंसली आणि म्हणाली, 'पूर्वीं आम्ही सर्व एकत्र रहात नव्हतों. पण जागतिक युद्धाच्या गडबडींत सर्व मंडळी माझ्या आजोबांच्या संरक्षणाखालीं आली. माझे आजोबा म्हणजे विलक्षण व्यक्ति आहेत. त्यांचें वय ऐंशी वर्षांपेक्षां जास्त आहे आणि उंची पांच फुटांपेक्षांहि एक–दोन इंच कमीच आहे. पण कुणीहि त्यांच्या जवळ गेलें कीं ते

आजोबांपेक्षां कमीच ठरतात.'

'हें ऐकायला मोठें कुतूहलजनक आहे.' मी म्हणालों.

'माझे आजोबा कुतूहलजनक आहेतच.' ती मिष्किल नजरेनें माझ्याकडे पहात म्हणाली, 'आजोबा अतिशय श्रीमंत आहेत. अर्थात् तुम्हांला ते आवडतील कीं नाहीं तें मला सांगतां येणार नाहीं.'

'तुला ते आवडतात काय?' मीं विचारलें.

'जगांतील इतर कुणाहिपेक्षां मला ते जास्त आवडतात.' ती म्हणाली.

० ० ०

दोन वर्षांहून अधिक काळ लंडन येथील भारतीय वकिलातींत काम केल्यानंतर मी मुंबईस परत आलों. त्यापूर्वी मीं सुचित्राला पत्रें लिहीत होतों आणि मलाहि तिचीं उत्तरें मिळत होतीं. माझ्याप्रमाणें तिचीं पत्रें प्रेमपत्रें नसत. एका ओळखीच्या माणसानें आपल्या दुसऱ्या ओळखीच्या मित्राला लिहावें, त्याप्रमाणेंच आमचा पत्रव्यवहार होता. पण आम्ही पूर्वीपेक्षां एकमेकांच्या प्रेमबंधनांत जास्त अडकत आहोंत असें मात्र मला वाटत होतें.

मी मुंबईत परत आलों आणि विमानतळावरूनच सुचित्राला तांतडीची तार पाठवली.

"मी नुकताच परत आलों आहें. आज रात्रीं नऊ वाजतां तूं बिंदुमाधव क्लबमध्यें माझ्याबरोबर भोजन करशील काय?— सूर्यकांत."

त्यानंतर एका ताशानें मी त्या दिवशींचा टाइम्स वाचीत असतांना जन्म, मृत्यु आणि विवाह ह्यांची माहिती देणाऱ्या स्तंभाकडे माझी नजर वळविली. त्यांत पहिलीच बातमी अशी होती—

"गेल्या एकोणीस तारखेला जोगेश्वरी येथील वांकडे घर ह्या ठिकाणीं रहाणारे सुमंतलाल अधिकारी हे आपल्या वयाच्या अठ्ठाऐंशीव्या वर्षीं अचानक मरण पावले."

मीं लागलीच सुचित्राला दुसरी तार पाठविली—"मी तुझ्या आजोबांच्या मृत्यूची बातमी नुकतीच वाचली. मला अतिशय दुःख होतें. कुठें

भेटा वें तें कळवावें—सूर्यकांत."

सुचित्राची तार मला त्या संध्याकाळीं सहा वाजतां माझ्या वडिलांच्या घरीं मिळाली, "मी बिंदुमाधव क्लबमध्यें बरोबर नऊ वाजतां येतें—सुचित्रा."

सुचित्राची आणि माझी पुन्हां भेट होणार ह्या विचारानें मी अस्वस्थ झालों होतों आणि उत्तेजितहि बनलों होतों. त्यानंतरचे ते तीन तास मला युगासारख वाटले. मी बिंदुमाधव क्लबमध्यें ठरलेल्या वेळेच्या वीस मिनिटें आधीं पोहोंचलों. ती पांच मिनिटें उशिरां आली.

ज्याला तुम्हीं दीर्घकाळ पाहिलेलें नसतें, पण ज्याच्याबद्दल तुम्ही सदैव विचार करीत असतां अशी व्यक्ति भेटतांच तुम्हांला एक प्रकारचा धक्का बसावा हें स्वाभाविक असतें. तिला जेव्हां काळ्या रंगाची साडी नेसून माझ्याकडे येतांना मीं पाहिली तेव्हां मला आश्चर्यच वाटलें.

आम्हीं आमच्या टेबलावर बसल्यानंतर कांहीं पेय घेत गप्पागोष्टी करण्यांत वेळ घालविला. खरें म्हटलें तर तें संभाषण एक प्रकारें कृत्रिमच होतें. पण त्यामुळें आम्हांला सुरुवातीला वाटणाऱ्या परकेपणाचा पडदा बाजूला सारतां आला. नंतर मीं तिला तिच्या आजोबांच्या मृत्यूबद्दल विचारलें आणि तो मृत्यु अगदीं अचानक होता असें तिनें शांतपणें सांगितलें.

पुन्हां आम्ही निरनिराळ्या विषयावर बोलूं लागलों आणि कांहींतरी वेगळा प्रकार असावा असें माझ्या मनांत वाटूं लागलें. सुचित्राच्या बाबतींत कांहींतरीं बिघडलें होतें ह्यांत शंकाच नव्हती. माझ्या दीर्घ गैरहजेरींत कुणी दुसरा माणूस तिला भेटला असावा अशी मला भीति वाटूं लागली. बहुधा आपला पूर्वीचा विचार बदलला आहे असें ती सांगेल असेंहि मला वाटलें.

'सुचित्रा, आपणाला असें काय झालें आहे ?' मीं विचारलें.

'बहुधा तो माझाच अपराध आहे.' ती म्हणाली, 'मी मूर्ख आहें.'

आम्ही एकमेकाकडे पाहून हंसलों व नंतर मीं विचारलें, 'आतां

आपण लग्न कधीं करायचें ?'

तिच्या चर्येवरील हास्य नाहींसें झालें आणि माझी पूर्वीची भीति पुन्हां जागृत झाली. ती म्हणाली, 'तें मला माहीत नाहीं. माझें तुमच्या-बरोबर लग्न होईल अशी मला खात्री वाटत नाहीं.'

'पण का नाहीं ? दीर्घकाळ मी तुझ्या नजरेसमोर नसल्यामुळें तुला माझ्याबद्दल परकेपणा वाटतो काय ? पुन्हां संवय होईपर्यंत तुला वेळ हवा आहे कीं तुझ्या नजरेसमोर आणखी कुणी आहे ? पण नाहीं—मी मूर्ख आहें. असलें कांहीं नसणार.'

'तसलें कांहीं नाहींच.' ती मान हालवीत हलक्या आवाजांत म्हणाली, 'पण माझ्या आजोबांचा मृत्यु आपल्यामध्यें आडवा आला आहे.'

'तुझ्या आजोबांचा मृत्यु ? त्यामुळें काय फरक पडणार ? तुला तुझ्या आजोबांनीं कांहीं पैसे ठेवले नसले तर तुला माहीत आहे कीं मी—'

'पैशाचा प्रश्न नाहीं.' ती किंचित् हंसून म्हणाली, 'मी अगदीं निर्धन असलें तरी तुम्ही माझा स्वीकार कराल हें मला माहीत आहे आणि माझे आजोबा पैसे गमावणारे नव्हते.'

'तर मग काय आहे ?'

'फक्त त्यांचा मृत्यु, सूर्यकांत ! त्यांना केवळ नैसर्गिक मृत्यूनें गांठलें असें मला वाटत नाहीं. मला वाटतें कीं, त्यांना कुणीतरी जाणूनबुजून ठार केलें असावें.'

मी तिच्याकडे टक लावून पहात म्हणालों, 'ही तुझी कल्पना ठीं भयंकर आहे. तुला तसें कां वाटावें ?'

'मला तसें वाटलें नव्हतें. पण सुरुवातीची डॉक्टरांची वागणूक चमत्कारिक होती. डॉक्टर मृत्यूचें सर्टिफिकेट देईनात. प्रेताची चिरफाड करून तपासणी करायला हवी असें ते म्हणाले. कांहींतरी वेगळा प्रकार असावा अशी त्यांना शंका वाटतें. ते हयावरून स्पष्ट होत नाहीं काय ?'

माझें तोंडच बंद झालें होतें. ती बुद्धिमान होती. तिनें जो निष्कर्ष

काढला होता त्यावर विश्वासच ठेवायला हवा होता. पण मी म्हणालों, 'डॉक्टरांचा संशय निराधार असेल. पण समज, त्यांचा जरी संशय खरा असला तरी त्या गोष्टीचा संबंध तुझ्या माझ्याशीं येतो कुठें ?'

'कांहीं विशिष्ट परिस्थितींत संबंध येतो. तुम्ही परराष्ट्रीय खात्यांत काम करतां आणि त्या अधिकाऱ्यांच्या स्त्रियांच्या बाबतींत कांहीं खास नियम आहेत. थांबा–तुम्ही बोलूं नका. प्रथम माझें ऐका. परराष्ट्रीय खात्यांतील अधिकाऱ्यांच्या स्त्रियांची वागणूक यत्किंचितहि संशयास्पद असतां कामा नये असा नियम आहे. मी अतिशय स्वाभिमानी आहें. आपण जर लग्न केलें तर तें सर्वांच्याच दृष्टीनें चांगलें ठरलें पाहिजे. पण इतक्यांतच आपणाला घाबरण्याचें कांहीं कारण नाहीं. सर्व कांहीं ठीक होईल.'

'म्हणजे त्या डॉक्टरांची कांहींतरी चूक झाली असावी असें सिद्ध होईल ?'

'त्यांची चूक झाली नसली तरीसुद्धां योग्य माणसानें आजोबांचा खून केला असें सिद्ध झालें म्हणजे कांहीं हरकत नाहीं.'

'सुचित्रा, हया तुझ्या बोलण्याचा अर्थ काय ?'

'खरें म्हटलें तर मी जें बोललें तें मला शोभणारें नव्हतें. पण माणसानें प्रामाणिक असलेलें बरें. नाहीं सूर्यकांत, मला आणखी कांहीं बोलायचें नाहीं. बहुधा आतांच मी प्रमाणाबाहेर बोललें असेन. पण मीं येथें येऊन तुम्हांला भेटण्याचा निश्चय केला होता. तुम्हांला प्रत्यक्ष पहाण्याचें आणि तें समजावून देण्याचें ठरविलें होतें. हें सर्व प्रकरण संपल्याखेरीज मला स्वतःबद्दल कांहींच विचार करावयाचा नाहीं.'

'पण निदान मला त्यासंबंधीं सर्व सांगशील कीं नाहीं ?' मीं विचारलें.

ती मान हलवीत म्हणाली, 'माझी तशी इच्छा नाहीं. तुम्हीं आमच्याकडे माझ्या दृष्टिकोनांतून पहावें हें मला पसंत नाहीं. तुम्हीं आपलें मत कोणत्याहि प्रकारें कलुषित न करतां बाहेरच्या दृष्टिकोनांतून आमच्याकडे पहावें अशी माझी इच्छा आहे.'

'पण मी तें करायचें कसें ?'

तिनें चमत्कारिक मुद्रेनें माझ्याकडे पाहिलें आणि ती म्हणाली, 'तुम्हांला तें तुमच्या वडिलांकडून समजेलच.'

माझे वडील पोलीस कमिशनर होते. तिचे ते शब्द ऐकतांच माझ्या हृदयावर फार मोठें दडपण पडलें असें मला वाटलें आणि मीं विचारलें, 'तें इतकें वाईट आहे ?'

'मला तसें वाटतें.' ती गंभीर स्वरांत म्हणाली, 'दाराजवळच्या टेबलाजवळ एक माणूस एकटाच बसला आहे. तो तुम्हांला दिसतो काय ? दिसण्यांत तो माणूस फार सज्जन दिसतो.'

'होय.' मी म्हणालों.

'मी आज संध्याकाळीं जोगेश्वरी स्टेशनवर गाडींत बसलें तेव्हां तो तेथल्या प्लॅटफॉर्मवर होता.'

म्हणजे त्यानें तुझा इथपर्यंत पाठलाग केला आहे असें तुझें म्हणणें आहे ?'

'होय, आम्हां सर्वांवरच नजर ठेवण्यांत येत आहे असें मला वाटतें. आमच्यांतील कुणीं घराबाहेर पडतां कामा नये असें त्यांनीं आम्हांला सुचविलें आहे. पण मीं तुम्हांला भेटण्याचा निश्चय केला होता. त्यामुळें मी बाथरूमच्या खिडकींतून बाहेर पडून आणि तेथल्या पाइपाला धरून खालीं उतरलें.'

'काय म्हणतेस ?' मी आश्चर्यानें म्हणालों.

'पण पोलीस फार हुषार आहेत. शिवाय मीं तुम्हांला तार पाठविली होती. तीहि त्यांना पहावयास मिळाली असणार. जाऊं द्या. आपली भेट तर झाली. पण ह्यापुढें मात्र आपण एकमेकांना भेटतां कामा नये. आपलें दोघांचेंहि एकमेकांवर प्रेम कायम आहे हीच ह्यांतील वाईट गोष्ट आहे.'

'त्यांत कांहींच वाईट नाहीं.' मी म्हणालों. 'तुझ्या आजोबांचें वय काय होतें ?'

'सत्त्याऐंशी वर्षें.' ती म्हणाली.

'तर मग मला वाटतें त्यांचा मृत्यु नैसर्गिक असावा. कोणत्याहि डॉक्टरला ही गोष्ट मान्य करावी लागेल.'

' तुम्ही माझ्या आजोबांना ओळखत नव्हता म्हणून असें म्हणता.' ती म्हणाली, ' नाहींतर त्यांच्या मृत्यूचें तुम्हांलाहि आश्चर्य वाटलें असतें. त्यांचा मृत्यु नैसर्गिक असणें शक्यच नाहीं.

० ० ०

२ : संशयितांची यादी !

मी माझ्या वडिलांच्या कामांत नेहमींच कांहीं लक्ष घालीत नसे, पण आतांपर्यंत मीं त्यांच्या कामांत माझें वैयक्तिक लक्ष घालण्यासारखें कांहीं घडलें नव्हतें. माझी आणि बाबांची अद्याप भेट झाली नव्हती. मी घरीं आलों तेव्हां ते बाहेर गेले होते. नंतर दाढी, स्नान वगैरे आटोपून मी कपडे बदलून सुचित्राला भेटावयास बाहेर पडलों होतों. पण मी जेव्हां परत आलों तेव्हां ते त्यांच्या बैठकीच्या खोलींत बसले आहेत असें मला आमच्या नोकरानें सांगितलें.

ते आपल्या टेबलाजवळ बसून कांहीं कागदपत्रें चाळीत होते. मला पहातांच ते उडी घेऊनच उठलें आणि त्यांनीं मला पोटाशीं धरलें. आमचें दोघांचें एकमेकांवर अतिशय प्रेम होतें आणि आम्ही एकमेकांना फार चांगल्या प्रकारें ओळखत होतों.

' तूं दोन वर्षांनंतर घरीं आलास आणि तुझे स्वागत करण्यास मी हजर नव्हतों ह्याचें मला वाईट वाटतें.' ते म्हणाले, ' सध्यां मी कामांत आहें. एक अतिशय गुंतागुंतीचें प्रकरण उपस्थित झालें आहे. '

' सुमंतलालांचें का ?' मीं विचारलें.

त्यांनीं त्वरेनें माझ्याकडे पाहिलें. ते भेदक नजरेनें माझ्याकडे पहात होते. पण त्यांनीं मृदु स्वरांत विचारलें, ' तूं तसें कां म्हणालास ? '

' म्हणजे माझा तर्क बरोबर होता तर ?'

' पण तुला तें कसें समजलें ?'

' मला माहिती मिळाली आहे आणि माझी बातमी अगदीं घरांतीलच आहे. ' मी म्हणालों.

माझे वडील थांबले आणि म्हणाले, ' ठीक आहे सूर्यकांत, तूं तें मला सांग.. '

'बाबा, कदाचित् तुम्हांला तें आवडणार नाहीं. माझी आणि सुचित्रा अधिकारीची ओळख आहे. माझें तिच्यावर प्रेम जडलें आहे आणि मी तिच्याबरोबर लग्न करणार आहें. आज रात्रीं ती मला भेटली होती. आम्हीं दोघांनीं एकत्रच भोजन केलें आहे.'

'तुझ्याबरोबर आणि ह्या मुंबईत भोजन केलें ? तिला तसें करणें कसें शक्य झालें ? त्या घराण्यांतील कुणीहि घराबाहेर पडूं नये अशी त्यांना सूचना करण्यांत आली होती.'

'तें बरोबर आहे. पण ती मला भेटण्यासाठीं गटाराच्या पाइपावरून खालीं उतरली.'

माझे वडील किंचित् हंसून म्हणाले, 'ती बरीच धीट मुलगी दिसते.'

'होय. पण बाबा, तुमचे पोलीसहि कांहीं कमी नाहींत. तुमच्या एका माणसानें तिचा त्या हॉटेलपर्यंत पाठलाग केला होता. त्याच्या रिपोर्टांत तुम्हांला माझें वर्णन वाचायला मिळेल. बाबा, तुम्हांला हें पसंत नाहीं काय ?'

'एका आठवड्यापूर्वी मला तें पसंत पडलें असतें. ती मंडळी चांगली घरंदाज आहेत. शिवाय त्या मुलीजवळ स्वतःचे पैसे आहेत आणि तूंहि भलत्या मोहांत पडणार नाहींस हें मला माहीत आहे. आतांची गोष्ट वेगळी आहे. पण–'

'बाबा, पण काय ?' मीं विचारलें.

'तें योग्य माणसाचें काम असलें तर कांहींच हरकत नाहीं.'

पुन्हां मला तेंच वाक्य ऐकायला मिळालें होतें आणि त्यामुळें माझें कुतूहल जागृत झालें होतें. मीं विचारलें, 'बाबा, योग्य माणूस कोण आहे ?'

'तुला काय माहिती आहे तें मला आधीं सांग.'

'मला कांहींच माहिती नाहीं.' मी म्हणालों.

'तुला त्या मुलीनें कांहीं सांगितलें नाहीं ?' वडिलांनीं आश्चर्यानें विचारलें.

'नाहीं. ती म्हणाली कीं मी माझें मन निर्विकार ठेवून बाहेरच्या

दृष्टिकोनांतून त्या प्रकरणाकडे पहावें.'

'तुझ्या या बोलण्याचा अर्थ काय ?'

'बाबा, तो अर्थ स्पष्ट नाहीं काय ? केवळ आमची मैत्री आहे म्हणून ती निर्दोष आहे असें मीं समजूं नये असेंच तिनें मला सांगितलें आहे.'

वडील चिरूट पेटवून उभे राहिले आणि फेऱ्या घालूं लागले. त्यावरून ते किती अस्वस्थ झाले होते ह्याची मी कल्पना करूं शकत होतों. नंतर त्यांनीं विचारलें, 'तुला त्या कुटुंबाबद्दल काय माहिती आहे ?'

'त्या म्हातारयाला बरेच मुलगे, नातवंडें, जांवई आणि सुना आहेत असें मीं ऐकलें आहे. पण कुटुंबासंबंधीचें स्पष्ट चित्र माझ्या नजरेसमोर नाहीं. बाबा, तुम्ही मला ती माहिती द्याल काय ?'

'होय.' ते आपल्या जागेवर बसून म्हणाले, 'आपण सुरुवात त्या सुमंतलालपासून करूं. ते चोवीस वर्षांपूर्वी येथें येऊन जोगेश्वरीला स्थायिक झाले.'

त्याचवेळीं दार उघडलें गेलें आणि आमचा मुख्य नोकर बासू आंत आला आणि त्यानें इन्स्पेक्टर कौशिक भेटावयास आले आहेत असें सांगितलें.

'कौशिकांवरच हें प्रकरण सोपविण्यांत आलें आहे.' माझे वडील म्हणाले, 'आपण त्यांना येथें बोलावूं. ते सध्यां त्या कुटुंबाबद्दलची माहिती गोळा करीत आहेत. तेव्हां त्यांना माझ्यापेक्षांहि कांहीं गोष्टी जास्त माहीत असतील.'

'बाबा, स्थानिक पोलिसांनीं तुमची मदत मागितली काय ?' मीं विचारलें.

'नाहीं, हें आमच्याच हद्दींतील प्रकरण आहे. जोगेश्वरी हा बृहन्-मुंबईचा भाग आहे.'

मी मान डोलावीत असतांनाच कौशिक तेथें आले. मी त्यांना अनेक वर्षांपासून ओळखत होतों. त्यांनीं परदेशांतून सुखरूपपणें परत आल्याबद्दल माझें हार्दिक अभिनंदन केलें.

'मी सूर्यकांताला माहिती देत आहें.' माझे वडील म्हणाले, 'कुठें

माझी चूक झाली तर दुरुस्त करा. चोवीस वर्षांपूर्वी सुमंतलाल मुंबईत येऊन स्थायिक झाले. त्यांनीं नळबाजारांत एक लहानसें उपाहारगृह सुरू केलें. तें चांगले पैसे देऊं लागलें तेव्हां त्यांनीं दुसरें सुरू केलें. लवकरच त्यांच्या मालकीची सात-आठ उपाहारगृहें झालीं आणि त्यांत त्यांना भरपूर पैसा मिळूं लागला.'

'कारण ते व्यवहाराच्या बाबतींत अतिशय दक्ष होते.' इन्स्पेक्टर कौशिक म्हणाले.

'स्वभावतःच ते व्यवहारकुशल आहेत.' माझे वडील म्हणाले, 'बहुतेक मुंबईतील सर्व सुप्रसिद्ध उपाहारगृहांच्या मागें त्यांचा हात होता. ते फार मोठ्या प्रमाणांत हॉटेलचा धंदा करूं लागले.'

'त्यांनीं तरहि अनेक धंद्यांकडे लक्ष पुरविलें होतें.' कौशिक म्हणाले, 'त्यांचा सामान्य प्रकारच्या तयार कपड्यांचा धंदा होता, स्वस्त दागिन्यांची दुकानें वगैरे. ते भारी लबाड होते.'

'म्हणजे ते बदमाष होते?' मी विचारलें.

'नाहीं. बदमाष नव्हते. पण कायद्याच्या मर्यादेंत राहून हवी ती बदमाषी करणारे होते. कायद्यांतून पळवाटा शोधून काढण्यांत ते पटाईत होते. त्यांनीं जें कांहीं केलें तें बेकायदेशीर नव्हतें. पण त्यांनीं सुरू केलेल्या धंद्याबाबत सरकारला नवे कायदे करणें भाग पडत असे आणि ते कायदे अस्तित्वांत येईपर्यंत सुमंतलाल दुसरेंच कांहीं हातीं घेत होते.'

'हयावरून त्यांचें व्यक्तिमत्व आकर्षक नसावें असें दिसतें.' मी म्हणालों.

'त्यांचें व्यक्तिमत्व प्रभावी होतें. त्यांच्याजवळ जाणाऱ्याला तें भासत असे. ते दिसण्यांत अगदींच सामान्य, विद्रूप आणि बुटके व हडकुळे होते. पण तरीहि स्त्रिया लोहचुंबकाप्रमाणें त्यांच्याकडे आकर्षित होत असत.'

'त्यांनीं केलेलें लग्नहि आश्चर्यकारक होतें.' माझे वडील म्हणाले, 'एका धनाढ्य माणसाच्या मुलीबरोबर त्यांनीं लग्न केलें. पण त्यांनीं पैशासाठीं लग्न केलें नव्हतें तर तो एकप्रकारचा प्रेमविवाह होता.

ातच्या एका ओळखीच्या गृहस्थांच्या समारंभांत खाद्यपदार्थ पुरविण्याची जबाबदारी सुमंतलालांवर होती. त्यावेळीं त्या दोघांची भेट झाली आणि ती त्यांच्या प्रेमांत पडली त्यामुळें त्यांच्या कांहीं मित्रांनीं त्यांना सोडलें. पण ह्या दोघांनीं त्या गोष्टीची पर्वा केली नाहीं. तिनें आपल्या आई-बापाच्या मर्जीविरुद्ध त्यांच्याबरोबर लग्न केलें. त्यांनीं जोगेश्वरी येथें घर बांधलें आणि तेथें त्यांना आठ मुलें झालीं. सुमारें सोळा वर्षांचा संसार केल्यानंतर ती वारली.'

'आणि सुमंतलालांवर त्या आठ मुलांची जबाबदारी पडली?' मीं विचारलें.

'त्यांतील एक मूल लहानपणींच वारलें. दोन मुलगे काश्मीरच्या लढाईत ठार झाले. एक मुलगी लग्न करून आफ्रिकेंत गेली आणि तेथेंच वारली. दुसरी एक अविवाहित मुलगी मोटार अपघातांत ठार झाली. आणखी एक-एक दोन वर्षांपूर्वी वारली. दोन मुलें अद्याप हयात आहेत. थोरला मुलगा रघुनाथ विवाहित आहे, पण त्याला मुलें नाहींत. दुसरा शेषनाथ. त्यानें एका सुप्रसिद्ध नटीबरोबर विवाह केला आणि त्याला तीन मुलें आहेत. तुझी सुचित्रा, शोभना आणि सुनेत्रा.'

'आणि ही सर्व मंडळी त्या वांकड्या घरांत रहातात?' मीं विचारलें.

'होय. ह्या दोन मुलांच्या परिवाराशिवाय तेथें एक वयस्क मावशी म्हणजे सुमंतलालच्या पहिल्या बायकोची बहीण रहाते. तिचें नांव आहे भागीरथी. ती पूर्वी आपल्या मेहुण्याचा तिरस्कार करीत असे. पण नंतर जेव्हां तिची बहीण वारली तेव्हां ती कर्तव्य म्हणून मुलांना सांभाळ-ण्यासाठीं आपल्या मेहुण्याकडेच राहूं लागली.'

'ती बाई फार कर्तव्यदक्ष आहे.' कौशिक म्हणाला, 'तिचे इतरां-बद्दलचे ग्रह कधींच बदलत नसतात. तिला सुमंतलाल किंवा त्यांची कार्यपद्धति मुळींच आवडत नव्हती—'

'तें घराणें तर चांगलें दिसतें.' मी म्हणालों, 'त्यांचा कुणीं खून केला असावा असें तुम्हांला वाटतें?' मीं विचारलें, 'सांगा कौशिक,

तुम्हांला तें माहीत असावें अशी माझी खात्री आहे आणि आतां कांहीं आपण कोर्टात [illegible] नाहीं.'

'आपणाला कधीं कोर्टात जातां येईल असें वाटत नाहीं.' कौशिक खेदानें म्हणाले.

'म्हणजे त्यांचा खून झाला नसावा असें तुम्हांला वाटतें काय ?' मी आशेनें विचारलें.

'नाहीं, खून झाला हें निश्चित आहे. त्यांच्यावर विषप्रयोग करण्यांत आला पण विषप्रयोगाच्या प्रकरणांत योग्य पुरावा मिळविणें फार कठीण असतें. हें प्रकरण फारच गुंतागुंतीचें आहे.'

कौशिक दाद देत नाहींत हें पाहून मी माझ्या वडिलांच्याकडे मनधरणीच्या नजरेनें पाहिलें आणि सावकाश ते म्हणाले, 'सूर्यकांत, जुनाच्या प्रकरणामध्यें जें सहज लक्षांत येण्यासारखें असतें तेंच पुढें सत्य ठरतें. दहा वर्षांपूर्वी सुमंतलालांनीं पुन्हां लग्न केलें होतें.'

'म्हणजे वयाच्या सत्याहत्तराव्या वर्षीं ?' मी आश्चर्यानें विचारलें.

'होय, त्यांनीं चोवीस वर्षांच्या एका तरुणीबरोबर लग्न केलें.' कौशिक म्हणाले, 'ती दिसण्यांत व्यवस्थित आणि सभ्य तरुणी होती आणि आतां ती चौतीस वर्षाची आहे आणि तरुण मास्तर त्या घरांत आहे. त्या दोघांची फार मोठी गट्टी आहे.'

मी विचारी नजरेनें कौशिकांकडे पाहिलें. हा एक फार जुनाच प्रकार होता. सुमंतलालांची दुसरी बायको फारच सभ्य आहे असें मला सांगण्यांत आलें. पण सभ्यतेच्या बुरख्याखालीं अनेक खून करण्यांत येतात.

'त्यांच्या पोटांत आर्सेनिक गेलें काय ?'

'अद्याप आम्हांला प्रेत तपासणीचा रिपोर्ट मिळावयाचा आहे. पण त्यांच्या पोटांत इसरीन गेलें असावें असें डॉक्टरांचें मत आहे. त्यांना डोळ्याचा थोडा त्रास होता. म्हणून ते डोळ्यांत घालण्यासाठीं इसरीन जवळ बाळगीत असत. त्यांना मधुमेहाचें दुखणें असल्यानें ते इन्सुलीनची इंजेक्शनें घेत असत आणि त्यांना इन्सुलीनऐवजीं इसरीनचें इंजेक्शन देण्यांत आलें असावें.'

' त्यांना इंजेक्शन कोण देत असे ?'

' त्यांची बायको. ' वडील म्हणाले.

आणि सुचित्रानें ' योग्य माणूस ' हे शब्द कां उच्चारले होतें, ह्याचा मला उलगडा झाला. मीं विचारलें, ' सुमंतलालच्या ह्या दुसऱ्या पत्नीबरोबर घरांतील इतर मंडळींचे संबंध चांगले आहेत काय ?'

' नाहीं, तिच्याबरोबर कुणी बोलतहि नाहीं. '

माझ्या दृष्टीनें तें कोडें अधिक स्पष्ट बनलें होतें. पण कौशिकांची खिन्न मुद्रा पाहून मीं विचारलें, ' तुम्हांला त्यांतलें काय खटकतें ?'

' सूर्यकांत, जर तिचें तें काम असतें तर तिला इसरीनच्या ऐवजीं इन्सुलीनची बाटली बदलतां आली असती आणि जर ती अपराधी असती तर तिनें तिच्याविरुद्ध जाणारा इतका महत्त्वाचा पुरावा तसाच कां राहूं द्यावा तें मला तरी समजणार नाहीं. तिनें जर तसें केलें असतें तर बहुधा डॉक्टरांनाहि संशय आला नसता. त्यांच्या पोटांत इसरीन गेलें आहे हें कुणालाच समजलें नसतें. '

मी विचार करीत म्हणालों, ' एक तर ती बाई फार मूर्ख असावी किंवा फार हुषार असावी. आपल्या बचावासाठींच तिनें तसें केलें असावें. पण आणखी कुणावर संशय घेतां येईल ?'

माझे वडील म्हणाले, ' त्या घरांत रहाणाऱ्या इतर सर्वांनाच तसें करणें शक्य होतें. घरांत इन्सुलीन आणि इसरीन ह्या दोन्हींचा भरपूर साठा होता आणि तो ज्या फडताळांत ठेवण्यांत आला होता तें कुणालाहि उघडण्यासारखें होतें. सूर्यकांत, सुमंतलाल अतिशय श्रीमंत होते. त्यांनीं आपल्या पैशांतील बराच मोठा वांटा कुटुंबियांना देऊनहि टाकला होता, पण त्यांच्यांतील कुणाला आपणाला अधिक पैसे मिळावे असें वाटणें शक्य आहे. '

' त्या पैशांची गरज सध्यां विधवा बनलेल्या स्त्रीलाच जास्त असणार.' मी म्हणालों, ' किंवा तिचा तो मास्तर श्रीमंत आहे काय ?'

' नाहीं, तो अगदींच गरीब आहे. ' वडील म्हणाले.

' कौशिक, त्या बाईबद्दल तुमचें काय मत आहे ?'

' सूर्यकांत, तें सांगणें फार कठीण आहे. ती अतिशय शांत वृत्तीची

आहे. त्यामुळें तिच्या मनांत कोणते विचार घोळतात हें तुला कधींच समजणार नाहीं. पण तिला ऐषारामी जीवनाची आवड आहे हें मात्र खरें आहे. पण तिच्यावर आरोप करण्यासाठीं आम्हांला पुरावा हवा ना ?'

तसा पुरावा मला, सुचित्राला आणि इन्स्पेक्टर कौशिकांना हवा होता. पण त्या बाईनेंच खून केला असावा अशी सुचित्राची खात्री नव्हती, माझी नव्हती किंवा कौशिकांचीहि नव्हती.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी कौशिकांबरोबर जोगेश्वरी येथें गेलों. मला तसल्या कामाचा थोडासा अनुभव होता. पण माझ्या वडिलांनीं माझ्यावर ती कामगिरी वेगळ्याच हेतूनें सोपविली होती.

'आपणाला जर हें प्रकरण संपवावयाचें असेल तर अंतस्थ माहिती मिळविली पाहिजे आणि कुणाहिपेक्षां ती तुलाच मिळवितां येईल.' ते म्हणाले होते.

'म्हणजे मी जिच्यावर प्रेम करतों तिला फसवून तिच्याकडूनच तुमच्यासाठीं माहिती मिळवायची काय ?' मीं जोरानें विचारलें होतें.

माझे वडील चिडून म्हणाले, 'एखाद्या सामान्य माणसाप्रमाणें कांहीं तरी बोलूं नकोस. तुझ्या त्या मैत्रिणीनें तिच्या आजोबाचा खून केला असावा असें तुला वाटतें काय ?'

'अर्थातच नाहीं.' मी म्हणालों, 'ती कल्पनाच मूर्खपणाची आहे.'

'आम्हांलाहि तसें वाटत नाहीं. ती कित्येक वर्षें त्या घरापासून दूर रहात आहे. शिवाय तिचे आजोबाबरोबरचे संबंध फार चांगले होते. त्यांनीं तिला भरपूर उत्पन्न मिळेल अशी व्यवस्था केली आहे. तिचें लग्न होणार असें त्यांना समजतें तर त्यांनीं मोठ्या आनंदानें तिला आणखीहि पैसे खात्रीनें दिलें असते. ह्या प्रकरणाचा उलगडा झाल्याशिवाय ती तुझ्याबरोबर लग्न करणार नाहीं हें स्पष्ट आहे. तेव्हां तूं तिला विश्वासांत घेऊनच माहिती मिळविण्याचा प्रयत्न कर.'

आणि त्याप्रमाणें मी कौशिकांबरोबर तेथें गेलों. तें अफाट आणि वेड्यावांकड्या आकाराचें घर पाहून मी थक्कच झालों. अनेक छोटी

मोठीं बैठीं घरें एकमेकांना जुळवून तें घर तयार करण्यांत आलें असावें असें दिसत होतें. कौशिकांनीं त्यासंबंधीं खुलासा केला—

'त्यांनीं एकंदर तीन वेगवेगळीं घरें एकमेकांना जोडलीं आहेत.' तें म्हणाले, 'आतां मात्र सर्व घर बादशाही हॉटेलाप्रमाणें सजविलें आहे.'

पुढच्या दारानें त्याचवेळीं सुचित्रा बाहेर आली. मला पहातांच तिला जणुं आश्चर्याचा धक्का बसला होता. ती म्हणाली, 'तुम्ही ?'

'होय सुचित्रा.' मी म्हणालों, 'पण मला तुझ्याबरोबर कांहीं बोलायचें आहे.'

मीं क्षणभर विचार केला. ती माझ्या सूचनेला नकार देईल अशी मला भीति वाटली. नंतर ती म्हणाली, 'चला माझ्याबरोबर.'

तिनें मला पाठीमागच्या बागेंत नेलें आणि तिला मीं सर्व हकीकत सांगितली. तें ऐकल्यानंतर तिनें दीर्घ उसासा सोडला आणि ती म्हणाली, 'तुमचे वडील फार हुषार आहेत असें मला वाटतें. मला काय वाटत असावें हयाची त्यांना तुमच्याहिपेक्षां जास्त कल्पना असावी. निदान माझ्यासाठीं तरी सत्य उघडकीस यायला हवें. पण सूर्यकांत, मला भीति वाटते.'

'भीति ?' मीं विचारलें.

'होय, अतिशय भीति वाटते. तें बिंदाचें काम असावें असें पोलिसांना वाटतें, तुमच्या वडिलांना आणि तुम्हांला वाटतें, सर्वांनाच वाटतें.'

'आणि तुला तसें वाटत नाहीं ?' मी विचारलें.

'तेंच तर मला समजत नाहीं.' ती म्हणाली, 'तुम्हीं माझ्या सूचनेप्रमाणें बाहेरच्यांचा दृष्टिकोन समजावून घेतलात.' आतां मी तुम्हांला अंतस्थ माहिती देतें. स्वतःला कोणत्याहि प्रकारच्या संकटांत अडकवून घेणारी बिंदा नाहीं. तिचा तसा स्वभावच नाहीं. ती स्वतःबद्दल अतिशय काळजी करणारी आहे.'

'पण तिच्या त्या मास्तरमित्राचें काय ?' मीं विचारलें.

'माधव हा भेकड आहे. त्याच्यांत ती हिंमत मुळींच नाहीं.'

'तुला भीति वाटते असें तूं मघांशी कां म्हणालीस ?'

'मी म्हणालें तें अगदीं खरें आहे. माझे आजोबा जरी अतिशय वृद्ध होते, तरी बिंदाला त्यांच्याबद्दल वाटणारें आकर्षण कमी झालें नव्हतें. त्या बाबतींत आजोबा खरोखरच फार धूर्त होते. आमचें घराणें अतिशय चमत्कारिक आहे आणि आमच्यांत निरनिराळ्या प्रकारची निर्दयता आहे. माझ्या आजोबांनीं आपल्या बालपणाची हकीकत सांगतांना त्यांचा कुणीं अपमान केला म्हणून आपण दोघांना भोसकलें होतें असें मला सांगितलें.

'हा निर्दयतेचा एक प्रकार झाला.' ती पुढें म्हणाली, 'माझी बाजी फक्त मला आठवते, पण मीं तिच्याबद्दलहि बरेंच ऐकलें आहे. तिच्यांत मुळींच कल्पनाशक्ति नव्हती, पण तीहि निर्दयच होती. ती बमेंडखोर आणि उद्धट होती आणि तसल्या माणसाच्या हातून होणाऱ्या कोणत्याहि वाईट गोष्टीच्या परिणामाची पर्वा करणारी नव्हती.'

'माझी स्वतःची आई एके काळची प्रसिद्ध नटी आहे. ती धाडसी आहे आणि स्वतःबद्दल भलताच अभिमान बाळगणारी आहे. माझी काकी तारा. ही शास्त्रज्ञ आहे आणि कोणत्या तरी प्रकारचा प्रयोग करीत असते, पण तीहि निर्दय आहे. काका अतिशय दयाळू आहेत, पण त्यांचा राग अनावर झाला तर ते काय करतील ह्याचा नेम नाहीं आणि माझे वडील---'

ती बराच वेळ थांबली आणि नंतर सावकाश म्हणाली, 'माझ्या वडिलांचा स्वतःवर इतका ताबा आहे कीं ते कसला विचार करीत आहेत हें कुणालाच समजणार नाहीं आणि माझ्या दृष्टीनें तीहि गोष्ट चिंता करण्यासारखी आहे.'

'मला वाटतें तूं निष्कारण भलभलते विचार मनांत आणीत आहेस. ह्या घरांतील कुणाहि माणसानें तो खून केला आहे हें सत्य आहे असें ऐकणाराला वाटेल.' मी म्हणालों.

'आणि तें खरेंहि आहे. मींसुद्धां तो खून केला असेन.' ती म्हणाली, 'तुम्हीं मला तुमच्या यादींतून काढतां कामा नये. कारण मीहि खून करूं शकेन. माझ्या दृष्टीनें जर कांहीं अतिशय महत्त्वाची गोष्ट साध्य

होणार असली, तर मला वाटतें मीहि खून करण्यास मागें पुढें पहाणार नाहीं.'

मी तें ऐकून हंसलों आणि तीहि हंसली. ती म्हणाली, 'कदाचित् मी मूर्ख असेन, पण आजोबांच्या मृत्यूचें रहस्य आपण उलगडायलाच हवें. जर तें काम बिंदानेंच केलें असलें—'

आणि मला एकाएकीं सुमंतलालच्या दुसऱ्या पत्नीबद्दल, बिंदाबद्दल सहानुभूति वाटूं लागली.

• ० ०

३ : शेषनाथ !

एक उंच व्यक्ति झरझर पावलें टाकीत आमच्याकडे येत होती. ती अधूनमधून झाडावरील फुलें काढण्यासाठीं थांबत होती.

'भागीरथीमावशी.' सुचित्रा म्हणाली.

मावशी जवळ आल्यानंतर सुचित्रानें माझी व तिची ओळख करून दिली. मावशी सुमारें सत्तर वर्षांची होती. तिचे पांढरे केंस अस्ताव्यस्त झालेले होते. चेहरा सुकलेला, पण बुद्धिमान दिसत होता आणि नजर भेदक होती.

'मीं तुमच्याबद्दल ऐकलें आहे.' ती म्हणाली, 'तुम्ही नुकतेच परदेशाहून परत आलां आहांत ना ? तुमचे वडील कसे आहेत ?'

मला त्या प्रश्नाचें नवल वाटलें. आणि मीं वडील मजेंत आहेत असें सांगितलें.

'मीं त्यांना त्यांच्या अगदीं लहानपणापासून ओळखतें. त्यांची आई तर माझ्या चांगली ओळखीची होती. तुम्ही दिसण्यांत तुमच्या आजीसारखे आहांत.' मावशी म्हणाली, 'तुम्ही आम्हांला मदत करण्यासाठीं आलां आहांत कीं दुसऱ्या कारणाकरतां ?'

मी अस्वस्थ होऊन म्हणालों, 'मी मदत करूं शकेन अशी मला आशा वाटते.'

तिनें मान डोलावली आणि ती म्हणाली, 'आम्हांला कांहीं मदत मिळाली तर ती हवीच आहे. ही जागा पोलिसांनीं अगदीं भरून गेली

आहे आणि त्यांच्यांतील कांहीं मला मुळींच आवडत नाहींत. चांगल्या मुलांनीं पोलीस खात्यांत नोकरी पत्करूं नये असें माझें मत आहे. सुचित्रा, नानी तुझी आठवण करीत होती.'

'मी जातें आणि टेलिफोन करतें.' सुचित्रा म्हणाली.

ती भरामर पावलें टाकीत घराकडे निघून गेली. मावशीनेंहि त्याच दिशेनें सावकाश चालण्यास सुरुवात केली होती. मीहि तिच्याबरोबर चालूं लागलों.

'नानी ही सुचित्राचीच दाई आहे. कित्येक वर्षांपूर्वी मींच तिची निवड केली होती. ती आतां आमच्याकडेच रहाते. ती कपडे धुते, इस्त्री करते, जेवण करते आणि इतर कामहि करते. फार प्रामाणिक आहे.'

मी कांहींच बोललों नाहीं. कारण बोलण्यासारखें कांहींच नव्हतें. मावशी वाटेंत थबकून घराकडे पहात होती.

'सूर्यकांत, हा फार वाईट प्रकार आहे. पोलिसांना ह्याबद्दल काय वाटतें? अर्थात् हा प्रश्न मीं तुम्हांला विचारूं नये. सुमंतवर विषप्रयोग व्हावा ही गोष्टच चमत्कारिक आहे आणि तो जिवंत नाहीं ह्याबरहि विश्वास बसत नाहीं. मला तो आधींच आवडत नव्हता, पण तो जिवंत नाहीं ही कल्पनाच मला सहन होत नाहीं. त्यामुळें घर कसें अगदीं रिकामें वाटतें.'

मी कांहींच बोललों नाहीं. मावशीची बोलण्याची पद्धति वेगळी होती आणि ती जणुं काय घडलेल्या गोष्टी आपल्या डोळ्यांसमोर उभ्या करीत होती.

'मी आज सकाळींच विचार करीत होतें. ह्या घरांत मी जवळजवळ चाळीस वर्षें रहात आहें. माझी बहीण वारली तेव्हां सुमंतनेंच मला बोलाविलें. त्याला सात मुलें होतीं आणि त्यांतील सर्वांत धाकटें तर फक्त एक वर्षाचें होतें. त्याला मी टाकणार होतें. मला नेहमींच वाटतें कीं, माझ्या बहिणीवर त्यानें कांहींतरी जादू केली असावी. तो दिसण्यांत अगदींच विचित्र होता. पण त्यानें घराचे सर्व अधिकार माझ्या स्वाधीन केलें होते हें मात्र मी कबूल करतें.'

'आणि तेव्हांपासून तुम्ही येथें आहांत?' मीं विचारलें.

'होय एका दृष्टीनें तें चमत्कारिकच आहे. खरें म्हटलें तर मुलें मोठीं झाल्यानंतर आणि त्यांचीं लग्नकार्यें झाल्यानंतर मीं येथून जायला हवें होतें. पण येथील बागेवर माझें प्रेम जडलें होतें. शिवाय शेषनाथानें एका नटीबरोबर लग्न केलें होतें. तसल्या लग्नामुळें माणसाला घरगुती जीवन लाभत नसतें. हच्या नटयांना मुलें कां होतात तें मला समजत नाहीं. पण शेषनाथनें येथें रहावयास येण्यांत मोठा शहाणपणा केला.'

'ते काय करीत असतात ?' मीं विचारलें.

'तो पुस्तकें लिहितो. कां लिहितो, तें मला मुळींच समजत नाहीं, कारण तीं कुणीच वाचत नाहीं. मला वाटतें, तुम्हीं त्याबद्दल कधीं ऐकलें नसेल.'

मी ऐकलें नव्हतें. त्यामुळें मला तें कबूल करावें लागलें.

'त्याच्याकडे भरपूर पैसा आहे त्यामुळें असें घडतें. पुस्तकापासून प्राप्ती मुळींच नाहीं. पण इतिहासावरील तो एक तज्ञ आहे असें लोक समजतात. त्याच्या बापानें त्याला भरपूर पैसा दिला आहे. त्यानें सर्वांनाच पैसे दिले आहेत. रघुनाथ हॉटेलचा धंदा करतो. त्यांची बहीण रेखा हिलाहि भरपूर पैसे देण्यांत आले आहेत आणि मुलीच्या पैशांचा ट्रस्ट करण्यांत आला आहे.'

'त्यामुळें त्यांच्या मृत्यूमुळें कुणाचाच तसा फायदा होणार नव्हता.'

तिनें माझ्याकडे विलक्षण नजरेनें पाहिलें आणि ती म्हणाली, 'फायदा होणारच आहे. त्या सर्वांना अधिक पैसे मिळणार होते. पण खरें म्हटलें तर त्यांनीं ते मागितले असते तर त्या म्हाताऱ्यानें दिलेहि असते.'

'मावशी, विषप्रयोग कुणीं केला असावा ह्याबद्दल तुम्हांला कांहीं कल्पना आहे काय ?'

'नाहीं. त्यामुळें मी फार अस्वस्थ झालें आहें घरांत कुणीतरी खुनी माणूस आहे ही कल्पना केव्हांहि चांगली नाहींच. मला वाटतें, पोलीस बहुधा बिचाऱ्या बिंदाच्याच हातांत बेडया ठोकविणार.'

'त्यांनीं तसें करणें योग्य होणार नाहीं असें तुम्हांला वाटतें काय ?'

'मला कांहीं सांगतां येणार नाहीं. मला तरी ती अगदीं मूर्ख आणि

सामान्य बाई आहे असें वाटतें. माझ्या मतें खुनी माणूस तसा असूं शकणार नाहीं. पण जेव्हां चोवीस वर्षांची तरुणी ऐंशी वर्षांच्या म्हाताऱ्याबरोबर लग्न करते तेव्हां ती तें पैशांसाठीं करते हें स्पष्टच आहे. जगरहाटीकडे पाहिलें तर ती लग्नानंतर श्रीमंत विधवा बनली असती. सुमंत कांहीं वेगळा माणूस होता. त्यानें त्याचें मधुमेहाचें दुखणेंसुद्धां आपल्या काबूंत ठेवलें होतें आणि तो शंभर वर्षे नक्कीच जगणार असें दिसत होतें. तेव्हां जर त्याला जगण्याचा कंटाळा आला असला...'

ती थांबली असें पाहून मीं विचारलें, 'तर काय ?'

'तर तिच्या हातून असें घडणें अशक्य नाहीं.' मावशी म्हणाली, 'पण त्यामुळें सर्व घराण्याला फार वाईट प्रसिद्धि मिळते.'

तिच्या त्या बोलण्यावरून ती अतिशय धूर्त स्त्री आहे हें स्पष्ट झालें होतें. क्षणभर माझ्या मनांत असाहि विचार आला कीं, मावशीनेंच सुर्यतलालावर विषप्रयोग केला नसेल ना ? ती कल्पना कांहीं अशक्य कोटींतील नव्हती. त्या घरांतील सर्वांतच निर्दयता वास करते असें सुचित्रा म्हणाली होती. पण खून करायला तसेंच कांहीं कारण लागतें. मावशीनें जर तो खून केला असला तर तसें करण्याचें तिला काय कारण होतें ह्या प्रश्नाचें उत्तर मिळविण्यासाठीं मला तिची जास्त ओळख करून घ्यायला हवी होती.

घराचें पुढलें दार उघडेंच होतें. आम्ही आंत गेलों तेव्हां मला एक प्रशस्त दिवाणखाना दिसला. तो व्यवस्थित सजविलेला होता. पाठीमागल्या बाजूला शुभ्र रंग दिलेल्या भिंतीला एक दार होतें.

'ही माझ्या मेहुण्याची जागा. तळमजला शेषनाथ आणि चित्रमाला ह्यांना दिला आहे.' मावशी म्हणाली.

आम्ही त्या दारांतून प्रवेश करून डाव्या बाजूला वळलों. तेथें बैठकीची मोठी खोली होती. भिंतीला फिक्कट निळा रंग दिला होता आणि तेथें मोठाले फोटो टांगले होते. त्यांत नटनटींचे फोटो जास्त होते. ठिकठिकाणीं सुंदर पुष्पपात्रें ठेवलेलीं होतीं आणि फुलांच्या सुवासानें तेथलें वातावरण प्रसन्न बनलें होतें.

'मला वाटतें तुम्हांला शेषनाथाला भेटावयाचें असेल!' तिनें विचारलें.

मला फक्त सुचित्राला भेटावयाचें होतें आणि तिची आणि माझी भेटहि झाली होती. आतां ती कुणालातरी टेलिफोन करण्यासाठीं गेली होती. मीं शेषनाथाला भावी जांवई ह्या नात्यानें भेटावयाचें कीं त्या कुटुंबाचा एक मित्र ह्या नात्यानें भेटावयाचें होतें? मला मित्र म्हणून भेटतां येणार नव्हतें. तेव्हां मी पोलिसांचा एक सहकारी आहे असें सांगावयाचें काय?

पण मला मावशीनें त्या प्रश्नाबद्दल विचार करण्यास वेळच दिला नव्हता. खरें म्हटलें तर तो प्रश्न नव्हताच. तिनें तसें गृहीतच धरलें नव्हतें. ते म्हणाले, 'आपण वाचनालयांत जाऊं.'

तिनें मला त्या बैठकीच्या खोलींतून आणखी एका दारांतून पलीकडच्या जागेंत नेलें. ती फार मोठी खोली होती आणि ती पुस्तकांनीं भरली होती. तेथल्या वरच्या छतापर्यंत पोहोंचणाऱ्या कपाटांत पुस्तकें भरलेलीं होतीं. पण त्याशिवाय तीं टेबलावर, खुर्च्यांवर आणि जमिनीवरहि ठेवलेलीं होतीं. पण असें असतांनाहि तेथें अव्यवस्था किंवा निष्काळजीपणा दिसत नव्हता.

त्या खोलींतील वातावरण अगदींच थंड होतें. तेथें कसलासा अस्पष्ट वास दरवळत होता. प्रथम मला तो वास जुन्या पुस्तकांचा असावा असें वाटलें. पण एकदोन क्षणांतच तो वास तंबाखूचा आहे हें मीं ओळखलें आणि शेषनाथ तर धूम्रपान करीत नव्हता.

आम्ही तेथें गेल्यानंतर तो एका टेबलामागून उभा राहिला. तो सुमारें पन्नाशीच्या घरांतला उंच आणि अतिशय देखणा माणूस होता. अनेकांनीं मला माहिती देतांना सुमंतलाल यांच्या विद्रूपतेवर भर दिला होता आणि त्यामुळें त्यांचा मुलगाहि दिसण्यांत तसाच असणार अशी माझी कल्पना होती. तो माणूस इतका रुबाबदार आणि संदर असेल अशी माझी अपेक्षा नव्हती.

'शेषनाथ, ह्यांचें नांव सूर्यकांत.' मावशी म्हणाली.

'नमस्ते.' तो म्हणाला. त्यानें माझें नांव ऐकलें असावें अशी माझी

खात्री नव्हती. त्यानें हस्तांदोलनासाठीं पुढें केलेल्या हातांत आपुलकी नव्हती आणि चेहऱ्यावरहि कुतूहल नव्हतें. तो जणुं काय आपणाला कांहीं कर्तव्यच नाहीं अशा प्रकारें माझ्याकडे पहात उभा होता. त्यामुळें मला कसेंसेंच वाटलें.

'ते भयंकर पोलीस कुठें आहेत ?' मावशीनें विचारलें. 'ते येथें आले होते काय ?'

'मला वाटलें, इन्पेक्टर कौशिक लवकरच मला भेटावयास येणार आहेत.' शेषनाथ टेबलावरील कार्डाकडे पहात म्हणाले.

'ते आतां कुठें आहेत ?'

'मावशी, मला कल्पना नाहीं. ते बहुधा वरच्या मजल्यावर असावेत.'

'बिन्दाजवळ ?'

'मला माहीत नाहीं.' शेषनाथनें सांगितलें.

त्याच्याकडे पहातांना मला असें वाटलें कीं असल्या माणसाच्या आसपास कधीं खून घडणें शक्य नाहीं.

'चित्रमाला अद्याप उठली कीं नाहीं ?' मावशीनें विचारलें.

'मला माहीत नाहीं.' तो म्हणाला, 'ती बहुधा अकरा वाजण्यापूर्वीं उठत असणार.'

'मला तर तिचाच आवाज ऐकूं येत आहे.' मावशी म्हणाली.

मला कुणीतरी त्वरेनें बोलत चाललें आहे असें वाटलें आणि माझ्या पाठीमागलें दार जोरांत उघडून एक बाई आंत आली. एकाच वेळीं तेथें तीन स्त्रिया आल्या आहेत अशा प्रकारचा भास ती कशी निर्माण करूं शकली तें मला समजलेंच नाहीं. तिचे केंस मोकळे होते. डोळे निळे आणि मोठे होते आणि ती आपल्या आकर्षक आणि स्पष्ट आवाजांत बोलत होती.

'मला हें सहन होत नाहीं. मला एक साडी विकत घ्यावयाची होती. पण मी मोटारीच्या बाहेर गेलें तर पोलीस पाठलाग करतील आणि मला वाटतें, भलतेच प्रश्न विचारतील. तुम्ही इतके शांत कसे ? आपणाला आतां ह्या भयंकर घरांतून बाहेर पडतां येणार नाहीं हें तुमच्या

लक्षांत येत नाहीं काय ? खरें म्हटलें तर आपण मामंजींना ते जिवंत असतांना एकटेंच सोडायला नको होतें.' त्या वरच्या मजल्यावरील बाईनें जरी आपले संबंध बिघडविण्याचा प्रयत्न केला होता तरी बिचाऱ्या मामंजींचें आपल्यावर प्रेम होतें.

'माझी खात्री आहे कीं आपण जर त्यांना सोडून गेलों असतों. तर त्या बाईनें आपणाला त्यांच्याकडून कांहीं मिळणार नाहीं अशी व्यवस्था केली असेल ह्या अचानक निर्माण झालेल्या भयंकर प्रकरणामुळें मला तर मी कोणत्यातरी मोठ्या नाटकांत काम करीत आहें असें वाटलें. अहो, मी घाबरलें आहें.'

तिचें तें असबद्ध आणि विलक्षण बोलणें ऐकत मी तिच्याकडे आश्चर्यानें पहात म्हटलें, 'तिचा नवरा मात्र कपाळावर किंचित् आंठ्या चढवून शांतपणें उभा होता.'

'मला वाटतें, हें काम तिचेंच असावें.' ती म्हणाली, 'मी हसें त्या इन्स्पेक्टराला सांगावें काय ?'

'चित्रमाले, तशी आवश्यकता नाहीं. तूं त्यांना भेटण्याची गरज नाहीं. त्यांना जी माहिती हवी असेल, ती मी त्यांना देईन.'

'मी त्या इन्स्पेक्टराला भेटतांच कामा नये !' तिनें आवाज चढवून विचारलें, 'पण मी त्याला भेटणारच. तुम्हांला मुळींच कल्पना नाहीं. तुम्हांला माहितीचें महत्त्व समजत नाहीं. त्याला तें कसें घडलें ह्यासंबंधींची सर्व माहिती असणार आणि ती मीच——'

'आई, तूं त्या इन्स्पेक्टरांना कांहींहि खोटें सांगतां कामा नये.' त्याच दारांतून बाहेर पडत सुचित्रा म्हणाली, 'मला माहीत आहे कीं तूं नाटकांतील भाषणाप्रमाणें पोलिसांना काय सांगावयाचें तें पाठ करून ठेवलें आहेस आणि तें अगदीं हावभावासहित त्यांना सांगणार आहेस. पण तें सर्व चुकीचें आहे.'

'भलतेंच ! सुचित्रा, तुला तें समजत नाहीं.'

'मला तें समजतें. पण आई, हें नाटक नाहीं हें तूं लक्षांत ठेवलें पाहिजेस. मीं तुझ्यासाठीं फराळाची तयारी करून ठेवली आहे.'

'हें मात्र तूं फार चांगलें केलेंस. मला खूप भूक लागली आहे. अहो,

मुलगी असणें किती चांगलें असतें हें पाहिलेंत ना ? ' आणि ती घाई-घाईनें तेथून निघून गेली.

' ही बाई आतां पोलिसांना काय सांगेल तें एका ईश्वरालाच माहीत ! ' मावशी कपाळाला हात लावून म्हणाली, ' ती वाटेल ते सांगेल. '

' मावशी, तूं ती चिंता करूं नकोस. डायरेक्टर सांगेल तसें वाग-ण्याची तिला संवय झाली आहे आणि मीच तिची डायरेक्टर आहें. ' सुचित्रा आईच्या पाठीमागून जात हंसत म्हणाली, ' बाबा व इन्स्पेक्टर कौशिक तुम्हांला भेटावयास येत आहेत. त्यावेळीं सूर्यकांत हजर राहिले तर तुमची कांहीं हरकत नाहीं ना ? '

' माझी मुळींच हरकत नाहीं. ' शेषनाथ निर्विकार मुद्रेनें माझ्याकडे पहात म्हणाला.

सुचित्रा एका दारानें निघून गेली आणि दुसऱ्या दारानें इन्स्पेक्टर कौशिक आले. त्यांना पहातांच मावशी म्हणाली, ' इन्स्पेक्टर, तुम्हांला आतां माझी गरज नसणार. मी गरज लागली तर वरच्या मजल्या-वर आहें. '

मावशी तेथून निघून गेली आणि शेषनाथ म्हणाला, ' बोला इन्स्पेक्टर. '

' साहेब, तुम्ही अतिशय कामांत असतां याची मला कल्पना आहे. ' ' मला तुमचा फार वेळ घ्यावयाचा नाहीं. मी तुम्हांला खाजगी सांगतों कीं, आम्हांला जो संशय आला होता. तो खरा आहे असें सिद्ध झालें आहे. तुमच्या वडिलांना स्वाभाविक मृत्यु आला नाहीं. त्यांच्या पोटांत मोठ्या प्रमाणांत इसरीन गेल्यामुळें ते मरण पावले आहेत. हें ऐकून तुम्हांला कांहीं सुचतें कीं नाहीं तें मला माहीत नाहीं. '

' मला काय सुचणार ? ' भावनाविरहीत स्वरांत शेषनाथ म्हणाला, ' माझी स्वतःची अशी कल्पना आहे कीं बाबांनींच चुकून तें विष घेतलें असावें. '

' तुम्हांला तसें खरोखरच वाटतें काय ? ' कौशिकांनीं विचारलें.

' होय, मला तसें घडणें शक्य वाटतें. ते जवळजवळ नव्वद वर्षाचे

होते आणि त्यांची दृष्टीहि चांगली होती.'

'म्हणून त्यांनीं इन्सुलीनच्या बाटलींत इसरीनू ओतलें असें जर तुम्हांला सुचवायचें असले तर तें तितकेंसें योग्य होणार नाहीं.' कौशिक म्हणाले, 'आम्हांला इसरीनची रिकामी बाटली केराच्या टोपलींत मिळाली आहे आणि त्यावर बोटांच्या खुणा नाहींत. तीच गोष्ट चमत्कारिक आहे. खरें म्हटलें तर त्या बाटलीवर तुमच्या वडिलांच्या, तुमच्या सावत्र आईच्या किंवा कुणातरी नोकरांच्या बोटांच्या खुणा असायला हव्या होत्या.'

'तर मग नोकराकडे लक्ष पुरवायला हवें.'

'तुमच्या नोकराला तसें करण्याची संधि साधली नव्हती. पण तो तसें कोणत्या हेतूनें करील?' कौशिकानें विचारलें. 'तुमचे वडील त्याला चांगला पगार देत होते. शिवाय दरवर्षी वाढत्या पगाराबरोबर बोनस देत होते. त्यामुळें तुमचे वडील जितकीं वर्षे जास्त जगतील तितकें त्या नोकराच्या फायद्याचें होतें. शिवाय आम्हीं त्याच्याबद्दलची सर्व माहिती मिळविली आहे. तो प्रामाणिक माणूस आहे. त्याच्याबद्दल संशय घेण्यास कांहींच जागा नाहीं.'

'अस्सें!' शेषनाथ म्हणाला.

'तुमच्या वडिलांच्या मृत्यूच्या दिवशीं तुम्ही स्वतः काय करीत होतां ह्याबद्दलची सविस्तर माहिती सांगाल काय?' कौशिकानें विचारलें.

'जरूर सांगेन. फक्त भोजनाची वेळ सोडल्यास मी त्या दिवशीं ह्या खोलींत होतों.'

'तुम्ही तुमच्या वडिलांना भेटला होतां काय?'

'नेहमींच्या रिवाजाप्रमाणें मीं त्या सकाळीं न्याहारी केल्यानंतर बाबांची भेट घेतली होती.'

'तुम्ही त्यावेळीं त्यांच्याजवळ एकटेच होतां काय?' कौशिकानें विचारलें.

'नाहीं. माझी सावत्र आई तेथें होती.'

'ते तुम्हांला नेहमींप्रमाणें दिसले काय?'

थोड्या खंवचटपणें शेषनाथ म्हणाला, 'त्या दिवशीं आपला खून होणार आहे अशी त्यांना कल्पना होती असें त्यांच्या चर्येवरून दिसत नव्हतें.'

'ह्या घरांत तुमच्या वडिलांची जी जागा आहे ती इतरांपासून अगदीं स्वतंत्र अशी आहे ना ?'

'होय. फक्त बाहेरच्या खोलींतील दारानेंच तेथें जातां येतें.'

'तें दार नेहमीं बंद ठेवण्यांत येतें काय ?'

'नाहीं, निदान मीं तरी तें दार बंद असलेलें कधीं पाहिलें नाहीं.' शेषनाथ म्हणाला.

'तर मग कुणालाहि त्यांच्या रहात्या जागेंत प्रवेश करणें शक्य होतें ?'

'अर्थातच. फक्त घरांतील व्यवस्थेच्या दृष्टीनें त्यांची जागा वेगळी होती.'

'तुम्हांला तुमच्या वडिलांच्या मृत्यूची बातमी प्रथम कशी समजली ?' कौशिकानें विचारलें.

'माझा मोठा भाऊ रघुनाथ वरच्याच मजल्यावर रहात होता. बाबांना एकाएकीं झटका आला आहे असें त्यानें मला धांवतच येऊन सांगितलें. मी पाहिलें तेव्हां त्यांना श्वासोच्छ्वास करण्यासहि त्रास होत होता.'

'तुम्ही काय केलेंत ?' कौशिकांनीं विचारलें.

'मीं डॉक्टरांना टेलिफोन केला. तसें करण्याचें कुणालाच सुचलें नव्हतें. पण डॉक्टर बाहेर गेले होते त्यांनी शक्य त्या त्वरेनें आमच्या घरीं यावें असा मी त्यांच्यासाठीं निरोप ठेवला आणि बाबांजवळ बसलों. बाबा फार आजारी होते हें स्पष्टच होतें. डॉक्टर येण्यापूर्वीच त्यांनीं प्राण सोडला होता.'

पण तसें सांगतांना शेषनाथाच्या बोलण्यांत कांहींच भावना दिसून आल्या नव्हत्या. कौशिकांनींच विचारलें, 'तुमची बाकीची मंडळी कुठें होती ?'

'माझी बायको मुंबईस गेली होती. त्यानंतर थोड्या वेळानें परत

आली. मला वाटतें त्यावेळीं सुचित्राहि येथें नव्हती. तिच्या धाकट्या बहिणी सुनेत्रा आणि शोभना ह्या घरांतच होत्या.'

'शेषनाथ, आतां मी तो प्रश्न विचारणार आहें. त्याबद्दल कृपा करून गैरसमज करून घेऊं नका. पण तुमच्या वडिलांच्या मृत्यूंचा तुमच्या सांपत्तिक परिस्थितीवर काय परिणाम होईल ?'

'तुम्ही सर्व माहिती गोळा करण्यासाठीं हें सर्व विचारीत आहां. हें मला माहीत आहे.' शेषनाथ म्हणाला, 'पण कित्येक वर्षांपूर्वींच बाबांनीं आम्हांला सांपत्तिक दृष्ट्या स्वतंत्र बनविलें होतें. त्यांनीं आपल्या सर्वांत मोठ्या कंपनीचा डायरेक्टर म्हणून रघुनाथची निवड केली होती आणि तेवढीच रोकड रक्कम मला दिली होती. मला जवळजवळ पंधरा लक्ष रुपये देण्यांत आले होते. माझ्या दोन बहिणी मरण पावल्या आहेत. पण त्यांनाहि बाबांनीं उदारहस्तें मोठ्या रकमा दिल्या होत्या.'

'आणि इतकें करूनहि त्यांनीं स्वतःजवळ कांहींच संपत्ती ठेवली नव्हती काय ?' कौशिकांनीं विचारलें.

'त्यांनीं स्वतःसाठीं फारच थोडें उत्पन्न राहूं दिलें होतें. ते म्हणाले कीं, तेवढे पैसे जवळ असले कीं आपणाला आपल्या आयुष्यांत कांहीं स्वारस्य आहें असें वाटेल. पण तेवढ्या भांडवलावरहि त्यांनीं त्यानंतर इतके पैसे मिळविले कीं ते पूर्वीपेक्षांहि अधिक श्रीमंत बनले होते.'

'तर मग तुम्ही आणि तुमचे भाऊ कांहीं सांपत्तिक विवंचनेमुळें येथें रहावयास आलां नाहीं ?'

'अर्थातच नाहीं. केवळ सोयीच्या दृष्टीनें आम्हीं तसें केलें. आमची इच्छा होईल तेव्हां आम्हांला त्यांच्याबरोबर रहातां येईल असें बाबांनीं पूर्वींच सांगितलें होतें. कांहीं घरगुती कारणांमुळें मला स्वतःला येथें रहाणें अधिक सोयिस्कर होतें. शिवाय माझं माझ्या वडिलांवर अतिशय प्रेम होतें आणि मी घरखर्चाचे माझ्या वाटयांतील पैसेहि देत होतों.'

'आणि तुमचे वडिल बंधु ?'

'ते मुंबईत रहात होते. ती इमारत जुनी असल्यामुळें कोसळली आणि त्यामुळे ते येथेंच रहावयास आले.'

'तुम्हांला तुमच्या वडिलांच्या मृत्युपत्राबद्दल कांहीं माहिती आहे काय ?'

'मला संपूर्ण माहिती आहे. माझे वडील गुप्तता बाळगणारे नव्हते आणि कुटुंबांतील सर्व मंडळींबद्दल ते नेहमींच विचार करीत असत. त्यांनीं मृत्युपत्र तयार केलें त्या वेळेला वकिलांबरोबर आम्हां सर्वांनाच तेथें हजर राहूं दिलें होतें आणि मृत्युपत्रांत काय आहे तें सर्वांनाच सांगितलें होतें. माझ्या सावत्र आईला त्यांनीं पूर्वी बरेच पैसे दिलेले आहेत. त्याशिवाय तिला त्यांच्या मृत्यूनंतर दहा लक्ष रुपये मिळावयाचे होते.

'त्यानंतर उरलेल्या संपत्तीचे त्यांनीं तीन भाग केले होते दोन भाग आम्हां दोघां भावांना आणि तिसऱ्या भागाची रक्कम त्यांनीं नातवंडांसाठीं खास राखून ठेवली होती व त्यासाठीं ट्रस्ट निर्माण केला होता. त्यांनीं नोकरांसाठीं कांहीं ठेवलें नव्हतें, परंतु नोकरांनीं जर हें घर सोडलें नाहीं तर दरवर्षी त्यांच्या पगारांत भरपूर वाढ करण्यांत यावी अशी त्यांनीं व्यवस्था केली होती.'

'आतां मी तुम्हांला एक नाजुक प्रश्न विचारतों.' कौशिक म्हणाले, 'तुमच्या वडिलांचे आणि सावत्र आईचे संबंध चांगले होते काय ?'

'होय, त्यांचे कधींहि मतभेद किंवा भांडणें होत नव्हतीं.'

'तुमच्या वडिलांच्या दुसऱ्या लग्नाला तुमची संमति होती काय ?'

'माझी संमति घेण्यांत आली नव्हती.'

'साहेब, हें माझ्या प्रश्नाचें उत्तर नाहीं.'

'तुम्ही आतां आग्रहच धरतां म्हणून सांगतों. माझ्या मतें त्यांनीं दुसरें लग्न करणें शहाणपणाचें नव्हतें. पण माझे वडील त्यांना हवें तें करण्यास स्वतंत्र होते.'

'तुमचे तुमच्या सावत्र आईबरोबरचे संबंध चांगले आहेत काय ?'

'आम्ही क्वचितच एकमेकांना भेटतों.'

'तुम्ही माधवरावांबद्दल कांहीं सांगूं शकाल काय ?'

'मला त्यांची कांहींच माहिती नाहीं. बाबांनीं त्यांची नेमणूक केली होती.'

'पण तुमच्याच मुलांना शिकविण्यासाठीं त्यांची नेमणूक झाली होती ना ?'

'खरें आहे. माझा मुलगा लहाणपणीं फार अशक्त असल्यामुळें त्याला शाळेंत पाठविणें शक्य नव्हतें. म्हणून बाबांनीं त्याला आणि माझी धाकटी मुलगी शोभना हिला शिकविण्यासाठीं माधवरावांची नेमणूक केली आणि त्यांची शिकविण्याची पद्धत फार चांगली आहे असें मलाहि आढळून आलें.'

'मला विचारायला वाईट वाटतें. पण माधव मास्तर आणि तुमची सावत्र आई यांचा कांहीं घनिष्ट संबंध असावा असें कधीं तुमच्या लक्षांत आलें होतें काय ?'

'तसल्या संबंधाचें निरीक्षण करण्याची मला कधींच संधि मिळाली नव्हती.'

'तुम्ही तशा प्रकारच्या कधीं अफवा ऐकल्या होत्या काय ?'

'मी अफवा ऐकत नाहीं आणि त्या कानांवर पडल्यास मी त्यावर विश्वास ठेवीत नाहीं.'

'हें फारच चांगलें.' कौशिक म्हणाले, 'तुम्ही कांहीं वाईट पाहिलें नाहीं, वाईट ऐकलें नाहीं आणि तुम्हांला कांहीं वाईट बोलायचें नाहीं.'

'तुम्ही वाटल्यास तसें म्हणूं शकतां.'

कौशिकांनीं शेषनाथाचे आभार मानले आणि ते तेथून बाहेर पडले. मीहि त्यांच्या मागें होतों. शेषनाथ हा विलक्षण माणूस होता ह्यांत शंका नव्हती !

० • ०

४ : रघुनाथ !

'आतां आपण शेषनाथाच्या बायकोला भेटूं. चित्रमाला हें तिचें चित्रपटसृष्टींतील नांव आहे.'

'मीं तिचें नांव ऐकलें आणि तिचीं कांहीं कामेंहि पाहिलीं आहेत. पण कधीं आणि कुठें तें आठवत नाहीं.' मी म्हणालों.

'चित्रपटसृष्टींत तिनें चांगलें नांव कमावलें आहे. विशेषतः ती

विनोदी कामें फार चांगलीं करते. पण दिग्दर्शकांना ती विशेष आवडत नाहीं. ती भलतीच स्वतंत्र वृत्तीची, भलत्या भानगडी करणारी आणि त्यांत आनंद मानणारी आहे असें ते म्हणतात. त्यांतील किती सत्य आहे हें मला माहीत नाहीं. पण ती इतर कलावंतांमध्यें लोकप्रिय नाहीं.'

सुचित्रा आम्ही बसलों होतों त्या खोलींत आली आणि म्हणाली, 'इन्स्पेक्टरसाहेब, माझी आई खालीं आली आहे'

मी कौशिकांच्या पाठीमागून मोठ्या दिवाणखान्यांत गेलों. तेथें कोचावर बसलेल्या स्त्रीला मीं क्षणभर ओळखलेंच नाहीं. ह्या खेपेला तिनें फार चांगला पेहराव केला होता आणि चेहराहि सजविला होता.

'या इन्स्पेक्टरसाहेब.' ती अभिनय करीत म्हणाली, 'तुम्हांला जर कांहीं मी मदत करूं शकेन तर तुम्ही मला तें अवश्य सांगा.'

'बाईसाहेब, ह्याबद्दल मी तुमचा फार आभारी आहें. तो दुर्दैवी प्रकार घडला तेव्हां तुम्ही कुठें होतां?' कौशिकांनीं विचारलें.

'मला वाटतें मी त्यावेळीं मुंबईहून मोटारीनें येथें येत होतें. त्या-दिवशीं मीं ताजमहाल हॉटेलांत एका मैत्रिणीबरोबर भोजन केलें, नंतर एका चित्रपटाची ट्रायल पाहिली आणि घराकडे परतलें. मी येथें आलें तेव्हां एकच गोंधळ उडाला होता. बिचारे माझे सासरे मरण पावले होते.'

शेवटचें वाक्य उच्चारतांना तिचा आवाज थरथरत होता. कौशि-कांनीं विचारलें, 'तुमचें तुमच्या सासऱ्यावर प्रेम होतें काय?'

'माझें खूपच प्रेम होतें!' ती आवाज उंचावून म्हणाली. सुचि-त्रानें भिंतीवरील फोटो किंचित् बाजूला सरकविला आणि त्याबरोबरच तिचा आवाज खालीं आला आणि ती पुढें म्हणाली, 'आमचें सर्वांचेंच त्यांच्यावर प्रेम होतें. ते आम्हांला चांगली बागणूक देत होते.'

'तुमचे आणि बिन्दाबाईंचे परस्पर संबंध चांगले आहेत काय?'

'आम्ही समविचारी नसल्यामुळें एकमेकींना फारशा भेटत नव्हतों. बिचारी बिन्दा! कधींतरी तिला आपलें आयुष्य घालविणें फार त्रासदायक वाटत असणार.'

पुन्हां सुचित्रानें तेथली खुर्ची सारखी केली आणि कौशिकांनीं विचा-

रलें, ' त्यांचे आपल्या यजमानांच्याबरोबरचे संबंध चांगले होते ना ?'

' मला तसें वाटतें. ' ती चोरटया नजरेनें आपल्या मुलीकडे पहात म्हणाली.

' त्यांचीं भांडणें होत होतीं काय ?'

' मला तें खरोखरच माहीत नाहीं. आमच्या रहाण्याचा भाग अगदीं स्वतंत्र होता. '

' बिन्दाबाईंचे आणि माझ्या मास्तरांचे संबंध फार मैत्रीचे होते ना?'

चित्रमाला कौशिकांकडे कपाळावर आंठया चढवून पहात म्हणाली, ' तुम्ही असले प्रश्न मला विचारतां कामा नये. बिंदा सर्वांशींच प्रेमानें वागतें. ती स्वभावानें चांगली आहे.'

' तुम्हांला माधव मास्तर आवडतात काय ?'

' ते फार शांत आणि चांगले आहेत ते इथें असतात, तेव्हां त्यांची जाणीवहि होत नाहीं अर्थात् माझा त्यांचा कांहीं विशेष संबंध नाहीं. ते चांगलें शिकवितात असें माझे यजमान म्हणतात. '

कौशिकांनीं तिला मुद्दामच धक्का देण्याचें ठरविलें आणि विचारलें, ' बिंदाबाई आणि माधव मास्तर यांचे कांहीं प्रेमप्रकरण असावें असें तुम्हांला वाटतें काय ? '

चित्रमाला चित्रपटांतील रागावलेल्या नायिकेप्रमाणें उभी राहिली आणि म्हणाली, ' मीं तसला कांहीं पुरावा पाहिलेला नाहीं आणि इन्स्पेक्टरसाहेब, तुम्ही मला हा प्रश्न विचारायला नको होता. सावत्र असली तरी ती माझी सासू आहे. '

तिनें तें वाक्य म्हणतांना असा अभिनय केला होता कीं मी कुठें आहें हें विसरून मला टाळया वाजविण्याचा मोह झाला होता ! कौशिक तिचे आभार मानून बाहेर पडले आणि सुचित्रानें आपल्या आईची पाठ थोपटली.

' आई, तूं तुझें काम फार चांगलें केलेंस. ' ती म्हणाली.

आईनें एका आरशांत स्वतःचें प्रतिबिंब पाहिलें आणि ती म्हणाली, ' मला वाटतें माझा अभिनय योग्यच होता. '

मला सुचित्रानें खुणावलें आणि मीहि त्या खोलींतून बाहेर पडलों

आणि जिन्याजवळ कौशिकांना गांठलें.

'मी आतां वडील भावाला भेटावयास जात आहें.' कौशिक म्हणाले.

'पण मी काय करावें तें मला सांगा.' मी म्हणालों, 'मी येथें काय करीत आहें असें जर कुणी मला विचारलें तर मी काय उत्तर द्यायचें?'

कौशिकांना त्या प्रश्नाचें आश्चर्य वाटलें. त्यांनीं क्षणभर विचार केला. नंतर हंसून विचारलें, 'आतांपर्यंत तुला तसें कुणी विचारलें आहे काय?'

मी मान हलवीत म्हणालों, 'नाहीं...पण–'

'तर मग तूं तें तेवढ्यावरच कां सोडीत नाहींस? कधीं खुलासाच करूं नकोस. विशेषतः असल्या प्रकारच्या आणि ह्या परिस्थितींतल्या घरांतील प्रत्येक माणूस स्वतःच्या चिंतेंत आणि भीतीमध्यें गढलेला असतो. तो प्रश्न विचारण्याच्या अवस्थेंत नसतो. मीसुद्धां माहिती मिळविण्यासाठीं त्यांना प्रश्न विचारीत नाहीं. त्यांना प्रत्यक्ष पाहून मला त्यांचें मोजमाप घ्यावयाचे आहे. माझी खात्री आहे कीं त्या चित्रमालेनें आपणाला बरीच माहिती पुरविली असती.'

'पण त्या माहितीवर विश्वास ठेवतां आला असता काय?' मी विचारलें.

'विश्वास ठेवतां आला नसता पण त्यामुळें तपासाच्या एखाद्या दिशेची सुरुवात झाली असती. ह्या घरांतील प्रत्येकाला तो खून करणें शक्य होतें मला खुनाचा उद्देश काय तो हवा आहे.'

आम्ही वरच्या मजल्यावरील एका खोलीचें दार ठोठावलें आणि तें इतक्या त्वरेनें उघडलें गेलें कीं तें उघडणारा आमची वाट पहात दाराजवळच उभा होता. दार उघडणारा माणूस चांगला धिप्पाड आणि भरदार अंगाचा होता. त्याचे काळे केंस विस्कटलेले होते. तो विद्रूप होता. पण त्याबरोबरच त्याचा चेहरा फार प्रसन्न आणि प्रामाणिक दिसत होता.

'या, आंत या.' तो म्हणाला, 'मी आतांच––पण तें जाऊं दे.

मी माझ्या बायकोला बोलावितों–अरेच्च्या...पण तीहि येथेंच आहे. या इन्स्पेक्टरसाहेब.'

आम्ही आंत गेलों. सुचित्राची काकी तेथल्या खिडकीजवळ उभी होती. तिचें व्यक्तिमत्व आणि त्या खोलींतील वातावरण मला बुचकळ्यांत पाडणारें होतें. ती तिचीच खोली असावी अशी माझी पूर्ण खात्री होती.

तेथल्या भिंतींना पांढरा रंग दिला होता. तेथल्या भिंतीवर एकहि चित्र नव्हतें आणि त्या खोलींत सामानहि विशेष नव्हतें. तेथें तीन चार खुर्च्या, एक टेबल आणि एक लहान पुस्तकांचें कपाट होतें. तेथें प्रकाश आणि हवा मात्र भरपूर होती.

सुचित्राची काकी सुचित्राच्या आईपेक्षां अगदींच भिन्न होती. तिचें वेगळेंच व्यक्तिमत्व होतें. ती पन्नाशीच्या घरांतील होती. तिचे केंस पिकलेले होते. डोळे बुद्धिमान होते आणि पेहराव अगदीं साधा होता.

'बसा इन्स्पेक्टर, आणखी कांहीं बातमी आहे काय?' तिनें विचारलें.

'बाईसाहेब, बऱ्याच मोठ्या प्रमाणांत इसरीन पोटांत गेल्यामुळें तसें घडलें आहे.' कौशिक म्हणाले.

'तर मग तो खून होता असें म्हणावें लागेल.' ती म्हणाली, 'तसें अपघातानें घडलें नसावें ना?'

'नाहीं बाईसाहेब.' कौशिक म्हणाले.

आमचें हें बोलणें सुरू असतांना रघुनाथ घाईघाईनें आंतल्या खोलींत गेला होता. आंतल्या दाराकडे पहात ती म्हणाली, 'तुम्ही माझ्या यजमानाशीं बोलतांना फार जपलें पाहिजे. ह्या गोष्टीचा त्यांच्यावर भलताच परिणाम होईल. ते आपल्या वडिलांना देवाप्रमाणें मानीत होते आणि ते भावनाप्रधान असल्यामुळें त्यांच्या मनावर असल्या गोष्टीचा फार परिणाम होतो.'

'तुमचे तुमच्या सासऱ्याबरोबरचे संबंध चांगले होते ना?'

'होय, संबंध फार चांगले होते. पण मला ते विशेष आवडत नव्हतें.' ती शांतपणें म्हणाली.

'कां आवडत नव्हते ?'

'त्यांचें जीवनाचें जें ध्येय होतें तें आणि तें ध्येय साध्य करण्याची त्यांची पद्धति मला मुळींच आवडत नव्हती. आपल्या बुद्धीच्या जोरावर पण भल्या-बुऱ्या मार्गानें सदा पैशाच्या मागें धांवणारा माणूस मला आवडत नाहीं.'

'आणि बिन्दाबाई ?'

'तिचा आणि माझा कधीं विशेष संबंधच येत नाहीं.'

'बिन्दाबाईंचा आणि माधव मास्तरांचा काहीं संबंध असणें शक्य आहे असें तुम्हांला वाटतें काय ?'

'मला तसें वाटत नाहीं. पण खरें म्हणाल तर तसलें कांहीं असलें तर मला तें समजणारच नाहीं.'

त्याचवेळीं घाईघाईनें रघुनाथ तेथें परतला आणि तो म्हणाला, 'मला टेलिफोन करायचा होता. पण इन्स्पेक्टर, तुम्ही कांहीं बातमी आणली आहे काय ? माझ्या वडिलांच्या मृत्यूचें कारण काय ?'

'पोटांत इसरीन गेल्यामुळें त्यांना मृत्यु आला.'

'अरे देवा ! तर मग तें त्या बाईचेंच काम ! तिला थांबतां आलें नाहीं ! बाबांनीं तिला जवळजवळ गटारांतूनच बाहेर काढलें आणि त्याचें त्यांना हें बक्षीस मिळालें. तिनें त्यांचा खून केला ! हया केवळ कल्पनेनेंहि माझें रक्त उसळतें'

'तुम्हांला तसें वाटावें हयाचें कांहीं विशिष्ट कारण आहे काय ?'

रघुनाथनें दोन्ही हाताने आपलें केंस ओढीत फेऱ्या घालण्यास सुरुवात केली होती. तो म्हणाला, 'कारण ! तें दुसरें कोण करणार ? माझा तिच्यावर कधींच विश्वास नव्हता आणि ती मला कधीं आवडलीहि नव्हती. आमच्यापैकीं ती कधींच कुणाला आवडली नव्हती. एके दिवशीं बाबा तिच्याबरोबर लग्न करून आणि तिला घरीं घेऊन आले तेव्हां मला आणि शेषनाथला मोठा धक्काच बसला. त्यांचा तो वेडेपणा होता ! पण माझे बाबा फार विलक्षण होते. माझ्यावर त्यांचें खूपच उपकार आहेत. माझ्यासाठीं त्यांनीं सर्व कांहीं केलें आहे. मला मात्र त्यांच्यासाठीं कांहींहि करतां आलें नाहीं.'

रघुनाथ जोरानें खुर्चीवर बसला. त्याची बायको हळूंच त्याच्या-जवळ आली आणि म्हणाली, 'अहो, आतां हें पुरें झालें. तुम्ही शांत रहा.'

तो तिचा हात धरून म्हणाला, 'पण मी कसा शांत राहूं ?'

'पण आपण सर्वांनीं शांतच राहिलें पाहिजे.' ती म्हणाली, 'इन्स्पेक्टरांना आपली मदत हवी आहे.'

'मला काय करावेंसें वाटतें तें तुला माहीत आहे काय ?' त्यानें ओरडून विचारलें, 'असें वाटतें कीं, त्या बाईची मान आवळून तिला ठार करावें.'

'गप्प बसा !' ती रागानें म्हणाली.

त्यानें तिच्याकडे पाहिलें आणि तो लज्जित बनला. तो उभा राहिला आणि आमच्याकडे वळून म्हणाला, 'मला क्षमा करा. भावना अनावर झाल्या म्हणजे मी असे कांहींतरी---'

रघुनाथ पुन्हां बाहेर निघून गेला. ती किंचित् हंसली आणि म्हणाली, 'ते कधीं मुंगीहि चिरडणार नाहींत.'

कौशिकांनीं मान डोलवून तें मान्य केलें आणि प्रश्न विचारण्यास सुरुवात केली. ती त्या प्रश्नांचीं थोडक्यांत आणि योग्य उत्तरें देत होती.

'वडिलांच्या मृत्युच्या दिवशीं रघुनाथ आपल्या ऑफिसांत होता. तो नेहमींप्रमाणें संध्याकाळीं लवकर परत आला आणि त्यानें नेहमींप्रमाणें आपला कांहीं वेळ संध्याकाळीं वडिलांजवळ बसून काढला. ती सहा वाजण्याच्या सुमारास आपल्या प्रयोगशाळेंतून परत आली होती.

'तुम्ही तुमच्या सासऱ्यांना त्यांच्या मृत्यूच्या दिवशी पाहिलें नाहींत ?'

'नाहीं. कारण सहा वाजल्यानंतर ते डुलक्या काढीत असत. त्यामुळें मला त्यांना त्रास द्यावा असें वाटलें नाहीं.'

'तुम्हांला त्यांच्या आजाराबद्दल कधीं समजलें ?'

'बिंदानें मला धांवत येऊन ती बातमी सांगितली. त्यावेळीं साडे-सहा वाजून एक-दोन मिनिटें झालीं होतीं.'

त्या प्रश्नांना कांहीं महत्व नव्हतेंच. पण कौशिक प्रश्न विचारतांना तिचें लक्षपूर्वक निरीक्षण करीत आहेत हें माझ्या लक्षांत आलें, नंतर कौशिकांनीं ती जागा पहाण्याची इच्छा प्रदर्शित केली आणि इतर सर्व

खोल्या पहात आम्ही रघुनाथाच्या खास खोलींत गेलों.

मी समाधानाचा सुस्कारा सोडला. आतांपर्यंत आपण एखाद्या संन्याशाच्या स्वच्छ मठांत आहोंत असें मला वाटत होतें. ही खोली मात्र कुणा सामान्य माणसाची होती. तेथल्या मोठ्या टेबलावर कागदपत्रें, पाईप आणि तंबाखू होती. भिंतींवर नाना प्रकारचे फोटो होते. मला ती खोली आवडली होती.

रघुनाथ तेथल्या टेबलाजवळ बसला होता. त्यानें आमच्याकडे किंचित् लाजूनच पाहिलें. त्याची बायको मात्र बाहेरूनच निघून गेली होती.

'माझी बायको फार चांगली आहे.' तो म्हणाला, 'पूर्वी तिनें फार हालअपेष्टा भोगल्या आहेत. आमचा पुनर्विवाह आहे. तिचा पहिला नवरा महान् शास्त्रज्ञ होता, पण निर्धन होता. त्याला अतिश्रमामुळें क्षयाचें दुखणें जडलें होतें. त्या आजारांत तिनेंच त्याची खूप सेवा केली होती. तो मरण पावल्यानंतर तिला सुखी करावें ह्या हेतूनें मीं तिच्याशीं लग्न केलें आणि खरोखरच मी सुदैवी आहें.

कौशिकानें विषय बदलण्यासाठीं त्यानें आपल्या वडिलांच्या आजारासंबंधीं प्रथम कधीं ऐकलें तें त्याला विचारलें.

'मला ती माहिती बिंदानें सांगितली. बाबांना कसल्यातरी प्रकारचा झटका आला आहे असें ती म्हणाली. मला तें खरेंच वाटलें. कारण मी अर्ध्या तासापूर्वीच त्यांच्याजवळ बसून गप्पागोष्टी केल्या होत्या. मी धांवत तेथें गेलों आणि त्यांचें तोंड काळेनिळें पडलें आहे आणि त्यांना श्वासोच्छ्वास करणेंहि जड जात आहे, हें पाहून मी धांवतच खालीं जाऊन शेषनाथला कळविलें. त्यानें डॉक्टरांना बोलाविलें. पण असे कांहीं चमत्कारिक घडेल ह्याची मला कल्पनाहि नव्हती.'

आम्ही तेथून बाहेर पडल्यानंतर कौशिक मला म्हणाले, 'ह्या माणसाची बायको मात्र तो खून करूं शकेल असें मला वाटलें.'

'आयुष्याबद्दलच्या भलत्याच कल्पना बाळगणारा माणूस तिला आवडत नाहीं असें ती म्हणाली होती.' मी म्हणालों, 'तिला

सासरा आवडत नव्हता. पण केवळ कुणी माणूस आपल्याला आवडत नाहीं म्हणून कोणी त्याचा खून करेल काय ?'

'तसा खून करणारें कुणी मला अद्याप आढळलें नाहीं.' कौशिक म्हणाले, 'मला वाटतें आपण त्या बिंदाला चिकटून रहाणें आपल्या दृष्टीनें सुरक्षित आहे. पण आपणाला कांहीं पुरावा मिळेल कीं नाहीं तें एक ईश्वरालाच माहीत !'

० ० ०

५ : बिंदा आणि माधव !

एका मोलकरणीनें घराच्या पलीकडच्या भागांतील कौशिकांना पहातांच ती घाबरलेली दिसली. पण तिच्या मुद्रेवर किंचित् तिरस्कारहि दिसत होता.

'तुम्हांला बाईसाहेबांना भेटावयाचें आहे काय ?' तिनें विचारलें.

'होय,' कौशिक म्हणाले.

तिनें त्यांना आंतल्या एका मोठ्या दिवाणखान्यांत बसविलें आणि ती बाहेर गेली. तळमजल्यावरील दिवाणखान्याइतकीच ह्या जागेचीहि लांबी-रुंदी होती, पण ही जागा जास्त चांगल्या प्रकारें सजविलेली होती. तेथल्या एका भिंतीवर प्रमुख ठिकाणीं एक मोठें तैलचित्र लावलेलें होतें आणि तें तेथें पाऊल ठेवणाऱ्याच्या नजरेंत लागलीच भरत असे. तें चित्र एका उत्कृष्ट चित्रकारानें रंगविलेलें तर होतेंच, पण त्या चित्रांत रंगविलेला चेहराहि तितकाच आकर्षक होता.

तें तैलचित्र एका काळ्या आणि भेदक डोळ्यांच्या चिमुकल्या मुलाचें होतें. त्यानें मस्तकावर घडीची मखमलीची टोपी चढविली होती आणि त्याचें मस्तक त्याच्या दोन्ही खांद्यांत खुपसलेलें होतें. पण त्या चित्रांतूनहि त्या माणसांतील चैतन्यशक्ति आणि बुद्धिमानता जणुं काय ओसंडत होती. मी त्या विलक्षण डोळ्यांकडे पहातच राहिलों.

'हेच ते सुमंतलाल.' कौशिक म्हणाले, 'जागतिक कीर्तीचे चित्रकार नंदराम ह्यांनीं चित्र तयार केलें आहे. त्यांचें व्यक्तिमत्व ह्या चित्रांतून प्रगट होतें. खरें ना ?'

'होय,' मी म्हणालों. त्या चित्राचें यथायोग्य वर्णन करण्यास मी तरी असमर्थ होतों.

त्या माणसाशिवाय सर्व घर ओसाड भासतें असें मावशी कां म्हणत होती हें आतां मला समजलें. ह्याच दिसण्यांत छोटघा पण कर्तृत्वानें मोठघा असलेल्या व्यक्तीनें हें वांकडें घर बांधलें होतें आणि त्याच्या-बरोबरच त्या घराचें जें कांहीं वैचित्र्य आणि व्यक्तिमत्व होतें तें नष्ट झालें होतें.

'पलीकडे जें तैलचित्र आहे तें त्यांच्या पहिल्या पत्नीचें असून तें चित्रकार राजवर्मा यांनीं रेखाटलें आहे.'

मी तें दुसरें चित्र तपासलें. तें चित्र एका सुंदर महाराष्ट्रीय स्त्रीचें होतें. पण त्यांत सजीवता नव्हती. समोरच्या बाजूला असलेल्या हुकूम-शहाला शोभणारी ती पत्नी दिसत नव्हती.

दार उघडलें गेलें आणि कौशिकचा मदतनीस आंत आला. तो म्हणाला, 'मी नोकरांकडून माहिती मिळविण्यासाठीं शक्य ती मेहनत घेतली आहे. पण त्यांतून कांहींच निष्पन्न झालेलें नाहीं.'

कौशिकनें दीर्घ निःश्वास सोडला. त्यांचा तो मदतनीस हातांत वही घेऊन कुणाच्या विशेष लक्षांत येणार नाहीं अशा ठिकाणीं बसला आणि दार उघडलें गेलें व सुमंतलालांची दुसरी पत्नी बिंदा तेथें आली.

बिंदानें काळघा रंगाचा पण अतिशय मौल्यवान असा पेहराव केला होता. ती अगदीं सहजगतीनें चालत होती. त्या काळघा पेहरावामुळें तिची सतेज गौर कांति अधिकच खुलून दिसत होती. तिनें तोंडाला पावडर लावली होती. ती लिपस्टिक लावण्यासहि विसरली नव्हती. पण ती रडत होती हें तिच्या डोळघांवरून स्पष्ट दिसत होतें. तिनें गळघांत एक टपोऱ्या व पाणीदार मोत्यांचा हार घातला होता. तिच्या एका हातांत मौल्यवान पाचूची तर दुसऱ्या हातांत तेजस्वी माणकाची अंगठी होती. आणखी एक गोष्ट माझ्या लागलीच लक्षांत आली, कीं ती घाबर-लेली दिसत होती.

'नमस्ते बिंदाताई.' कौशिक सहजतेनें म्हणाले, 'तुम्हांला पुन्हां त्रास द्यावा लागतो ह्याचें मला वाईट वाटतें.'

'मला वाटतें तें तुम्हांला टाळतां आलें नसेल.' ती म्हणाली.

'बिदाताई, आपण समजूतदार आहांत आणि ह्यावेळीं आपला वकील हजर असावा असें जर तुम्हांला मनःपूर्वक वाटत असेल तर तसेंहि व्यवस्था करतां येईल.'

तिला कौशिकांच्या त्या सूचक शब्दांचा अर्थ समजत नसावा अशी माझी कल्पना झाली होती आणि ती जें कांहीं बोलली त्यामुळें माझ्या तर्काला दुजोराच मिळाला होता.

'मला ते साखरदांडे आवडत नाहींत. ते जवळ असावेत असें मला वाटत नाहीं.'

'पण तुम्हांला आवडेल असा वकील येथें बोलावतां येईल.' कौशिक म्हणाले.

'पण मी कुणाला बोलवायलाच हवें काय? मला मुळीं वकीलच आवडत नाहीं. तुम्ही मला गोंधळवून सोडतां.'

'काय करावें तें तुम्हीच ठरवायचें आहे.' कौशिक किंचित् हंसून म्हणाले, 'मीं आतां सुरुवात करावी काय?'

त्यांच्या मदतनिसानें पेन्सिलीचें टोंक जिभेला लावलें. बिदा कौशिकांकडे तोंड करून एका कोचावर बसली आणि तिनें विचारलें, 'तुम्ही कांहीं शोधून काढलें आहे काय?'

ती तिचीं बोटें पिळवटीत होतीं. आपल्या पदराचा चोळामोळा करीत होती, तें मी पहात होतों. कौशिक तिच्याकडे रोखून पहात म्हणाले, 'तुमचे यजमान इसरीनच्या विषप्रयोगामुळें मरण पावले असें आम्ही आतां निश्चित म्हणूं शकतों.'

'म्हणजे त्या डोळ्यांत घालण्याच्या औषधानें त्यांचे प्राण घेतले?'

'होय, तुम्हीं जें त्यांना शेवटचें इंजेक्शन दिलेंत तें इन्सुलीनचें नसून इसरीनचें होतें असें दिसतें.'

'पण मला त्याबद्दल कांहींच माहिती नाहीं. माझा त्याच्याशीं कांहींच संबंध नाहीं. खरोखरच नाहीं.'

'तर मग दुसऱ्या कुणींतरी इंजेक्शनच्या नळींतील इन्सुलीन काढून घेऊन त्याच्याऐवजीं त्यांत इसरीन घातलें असावें.' कौशिक म्हणाले.

'किती दुष्टपणा !' ती उद्गारली.

'होय बिदाताई.' कौशिक मान हलवीत म्हणाले.

'पण कुणींतरी तसें हेतुपुरस्सर केलें असावें असें तुम्हांला वाटतें काय ? कीं तसें चुकीनें घडलें असावें ? तशा प्रकारची चेष्टा कुणी करणार नाहीं हें खरें ना ?'

'बिदाताई, ती चेष्टा होती असें आम्हांला वाटत नाहीं.'

'तर मग तें कुणा नोकराचें काम असणार.'

कौशिकांनीं उत्तर दिलें नाहीं आणि तीच पुढें म्हणाली, 'तसेंच असलें पाहिजे. नाहींत कोण तसें करणार ?'

'तुमची खात्री आहे ? बिदाताई, तुम्ही नीट विचार करा. तुम्ही कांहींच तर्क करूं शकत नाहीं काय ? कुणींतरी रागानें, भांडणामुळें किंवा इतर कांहीं हेतूमुळें तसें केलें नसावें काय ?'

ते तिच्याकडे अद्याप आव्हानात्मक नजरेनें पहात होते. ती म्हणाली, 'मला कांहींसुद्धां माहिती नाहीं.'

'तुम्ही त्या दुपारीं सिनेमाला गेलां होतां हें खरें ना ?'

'होय. मी साडेसहा वाजतां परत आलें. आणि इन्सुलीनचें इंजेक्शन देण्याची वेळ झाली होती म्हणून मीं त्यांना तें नेहमींप्रमाणें दिलें. त्यानंतर ते चमत्कारिक तोंड करूं लागले. मी घाबरलें आणि धांवतच जाऊन शेषनाथला सांगितलें. पण हें सर्व मीं पूर्वीं तुम्हांला सांगितलें आहे. त्या सर्वांची आणखी उजळणी करायला हवी काय ?'

'बिदाताई, मला क्षमा करा. पण मीं आतां माधवरावांबरोबर बोलावें काय ?'

'कशाला ?' तिनें उलट विचारलें. 'त्यांना तर कांहींच माहिती नाहीं. आतां सुधीरला ते शिकवीत आहेत. त्यांना येथें बोलवायला पाहिजे काय ?'

'नको, आम्हीच त्यांच्याकडे जातों.' कौशिक म्हणाले.

कौशिक अगदीं त्वरेनें त्या खोलींतून बाहेर पडले. मी आणि त्यांचा मदतनीस पाठीमागून चालत होतों. ते वरच्या मजल्यावरील एका खोलींत गेले. सुमारें तीस वर्षांचा एक आकर्षक तरुण गृहस्थ एका सोळा

वर्षाच्या मुलाला कांहीं शिकवत होता. त्या दोघांनींहि आमच्याकडे पाहिलें. सुचित्राचा भाऊ माझ्याकडे पहात होता तर माधवनें आपली नजर इन्स्पेक्टर कौशिकांवर स्थिर केली होती. इतका घाबरलेला माणूस मीं तरी कधीं पाहिला नव्हता.

तो उभा राहिला आणि पुन्हां खालीं बसून थरथरणाऱ्या आवाजांत म्हणाला, 'नमस्ते इन्स्पेक्टरसाहेब.'

'नमस्ते.' कौशिक म्हणाले, 'मी आतां तुमच्याबरोबर थोडें बोललों तर चालेल काय ?'

'अर्थातच चालेल. मला आनंद होईल. निदान—'

सुधीर उभा राहिला आणि जरा रुबाबानेंच म्हणाला, 'इन्स्पेक्टरसाहेब, मी येथून गेलें पाहिजे असें तुम्हांला वाटतें काय ?'

'होय. आपण नंतर अभ्यास करूं.'

सुधीर आळोखेपिळोखे देत दाराकडे वळला. तो बाहेर पडत असतांना त्याची माझी नजरानजर झाली. त्यानें सुरा फिरवावा त्याप्रमाणें आपलें एक बोट मानेवरून फिरविलें आणि तो हंसला नंतर तो दारांतून बाहेर पडला.

'माधवराव, इसरीन शरीरांत गेल्यामुळें सुमंतलालांना मृत्यु आला हें आतां निश्चित सिद्ध झालें आहे.' कौशिक म्हणाले.

'म्हणजे, त्यांच्यावर खरोखरच विषप्रयोग झाला ? मला अशी आशा वाटत होती...'

'त्यांच्यावर विषप्रयोगच झाला आहे.' कौशिक आवाज चढवून म्हणाले, 'कुणींतरी इन्सुलीन आणि इसरीन यांची बदलाबदल केली आहे.'

'माझा यावर विश्वास बसत नाहीं.' माधव म्हणाला, 'ही अशक्य कोटींतील गोष्ट आहे.'

'तसें घडलें आहे हें सिद्ध झालें आहे.' कौशिक जोरानें म्हणाले, 'आतां प्रश्न असा आहे कीं त्यांचा खून करण्याची कुणाला आणि कां गरज भासली ?'

'त्यांचा खून करण्याची कुणालाच गरज नव्हती किंवा तसें कर-

ध्याचें कांहीं कारणहि नव्हतें.' माधव उत्तेजित स्वरांत म्हणाला.

'तुम्हांला तुमचा वकील हयावेळीं हजर असावा असें तर वाटत नाहीं ना ?'

'माझा कुणी वकीलच नाहीं आणि मला कुणा वकिलाची गरजहि नाहीं. मला तें लपवायचेंच नाहीं. आणि लपविण्यासारखें माझ्याजवळ कांहींच नाहीं..'

'तुम्ही जे कांहीं सांगाल तें लिहून घेतलें जाईल हें तुमच्या लक्षांत आहे ना ? कौशिकांनी विचारलें.

'इन्स्पेक्टरसाहेब, मी निरपराधी आहें' तो म्हणाला.

'तुम्ही निरपराधी नाहीं असें मी म्हणालोंच नाहीं.' कौशिक म्हणाले 'पण बिंदाबाई आपल्या नवऱ्यापेक्षां खूपच तरुण आहेत हें खरें ना ?'

'होय, तें खरें आहे.'

'त्यामुळें त्यांना कधीं कधीं एकलकोंड्याप्रमाणें वाटत असणार ? आपणाला आवडण्यासारखा कुणीतरी जोडीदार बरोबर असावा असें त्यांना वाटत असणार ?'

'नाहीं...मुळींच नाहीं...म्हणजे...मला माहीत नाहीं.'

'तुमच्याबद्दल त्यांना आकर्षण वाटावें हें मला तरी अगदीं स्वाभाविक वाटतें.' कौशिक म्हणाले.

'तसल्या प्रकारचें कांहींच नाहीं.' माधव जोरांत म्हणाला, 'तुमच्या मनांत काय घोळत असावें तें मला समजतें. पण तसला प्रकार नाहीं ! बिंदाताई मला फार प्रेमानें वागवितात आणि मलाहि त्यांच्याबद्दल खूप आदर आहे. पण ह्याहून दुसरें कांहीं सुचविणें म्हणजे माझ्यावर आणि त्यांच्यावरहि अन्याय करण्यासारखें आहे. मी कुणाचा खून करणार नाहीं किंवा बाटल्यांची अदलाबदल किंवा तशाप्रकारचें कांहीं करणार नाहीं. खून करणें ही कल्पनाहि मला भयानक वाटते. मी मुलांना शिकवितों. या घरांतील सर्वच माणसें मला चांगलीं वागणूक देतात आणि आतां हा भयंकर प्रकार घडला...आणि मीच तो खून केला असा तुम्हांला संशय येतो !'

इन्स्पेक्टर कौशिकांनीं त्याच्याकडे कुतूहलानें पाहिलें आणि ते म्हणाले,

'मी तसें म्हणालों नाहीं.'

'पण तुम्हांला असें वाटतें! सर्वांनाच तसें वाटतें! तुम्ही–ते, सर्वच माझ्याकडे त्या दृष्टीनें पहातां. मला तुमच्याबरोबर बोलतां येणार नाहीं. माझी प्रकृति बरी नाहीं.'

माधव मास्तर घाईघाईनें त्या खोलींतून बाहेर गेला. कौशिक माझ्याकडे मान वळवून म्हणाले, 'तुला त्याच्याबद्दल काय वाटतें?'

'तो अतिशय घाबरला आहे.' मी म्हणालों.

'तें मला माहीत आहे, पण तो खुनी आहे काय?'

'तुम्हीं जर मला हें विचारलेंत. तर मी सांगेन त्याच्यांत ती हिंमतच नाहीं.' कौशिकांचा मदतनीस म्हणाला.

'तो कुणाचें डोकें फोडूं शकणार नाहीं किंवा कुणावर पिस्तुल झाडूं शकणार नाहीं हें मलाहि मान्य आहे.' कौशिक म्हणाले, 'पण ह्या विशिष्ट गुन्ह्यामध्यें काय करायला हवें होतें? फक्त दोन बाटल्यांची अदलाबदल करावयाची होती व एका अतिवृद्ध माणसाची कमींत कमी वेदना होतील, अशाप्रकारें या जगांतून सुटका करायची होती. त्यामुळें जिला लाखों रुपयांची संपत्ती मिळणार होती तिच्याबरोबर लग्न करण्याची संधि मिळणार होती. अर्थात हा सर्व तर्क आहे!'

कौशिक दीर्घ उसासा सोडून पुढें म्हणाले, 'मीं त्याला घाबरविलें आहें खरें. पण त्यावरून त्याच्यावर आरोप सिद्ध होत नाहीं. निरपराधीहि माणूस घाबरतो. त्यानें स्वहस्तानें तें केलें असावें अशी माझी खात्री नाहीं. त्या बाईला मात्र तें सहज करतां आलें असतें. पण तुला नोकरांकडून काय माहिती मिळाली?'

'मोलकरीण म्हणाली कीं, त्या दोघांची एकमेकांवर खूप मर्जी आहे.' मदतनीस म्हणाला.

'म्हणजे काय?' कौशिकांनीं विचारलें.

'ती स्वतःच्या हातानें कॉफीचे पेले भरून त्याला देते आणि तो त्यावेळीं तिच्याकडे अगदीं टक लावून पहात असतो.'

'असल्या पुराव्यानें कोर्टाचें समाधान होणार नाहीं.' कौशिक म्हणाले, 'कांहीं खास माहिती आहे काय?'

'तसें कुणीं पाहिलेलें नाहीं.' मदतनीस म्हणाला.

'इतरांनीं पहाण्यासारखें कांहीं असतें. तर तें कुणाला तरी दिसलेंच असतें. मला आतां असें वाटूं लागलें आहे कीं त्या दोघांत तसलें कांहीं नसावें' कौशिक माझ्याकडे पहात म्हणाले, 'तूं परत जाऊन तिच्याशीं बोल. तुझ्याबद्दल तिचें काय मत होतें तें मला ऐकावयाचें आहे.'

आणि मी अर्धवट नाखुशीनेंच तेथून निघालों. पण तिला काय वाटतें

तें समजावून घेण्याची उत्सुकता वाटतच होती.

० ० ० ०

मीं पूर्वी पाहिलें होतें त्याच ठिकाणीं बिंदा बसली होती. मी जातांच तिनें माझ्याकडे मान वळवून पाहिलें आणि विचारलें, 'ते इन्स्पेक्टर परत येणार आहेत काय ?'

'इतक्यांत येणार नाहींत.' मी म्हणालों.

'तुम्ही कोण आहांत ?'

सकाळपासून मी ज्याची वाट पहात होतों तो प्रश्न अखेरीस मला विचारण्यांत आला होता आणि मीं शक्य तितकें सत्यच उत्तर दिलें, 'माझा पोलिसांशीं संबंध आहेच, पण मी तुमच्या कुटुंबाचाहि मित्र आहें.'

'कुटुंब ! सर्व पशु ! मी त्या सर्वांचाच द्वेष करतें !' ती माझ्याकडे पहात रागानें म्हणाली, 'नेहमींच त्यांनीं मला पशूप्रमाणें वागविलें आहे. मीं त्यांच्या बापाशीं लग्न केलें तर त्यांत त्यांचें बिघडलें कुठें ? त्या सर्वांजवळ गडगंज पैसा आहे आणि त्या म्हाताऱ्यानें त्यांना तो दिला आहे. त्यांच्यांतील कुणालाहि पैसे मिळविण्याची अक्कल नाहीं आणि त्यांची तितकी लायकीहि नाहीं. एखादा माणूस म्हातारा असला आणि त्यानें पुन्हां लग्न केलें तर बिघडलें कुठें ? आणि ते मनानें मुळींच वृद्ध नव्हते. माझें त्यांच्यावर प्रेम होतें.'

ती माझ्याकडे आव्हानात्मक नजरेनें पहात होती. मी म्हणालों, 'तें बरोबर आहे.'

'मला वाटतें, तें खरें नसावें असें तुम्हांलाहि वाटत असणार.' ती म्हणाली, 'मला घर हवें होतें. मला कुणीतरी आपुलकीनें वागविणारा हक्काचा माणूस हवा होता, म्हणून मीं लग्न केलें आणि त्यांनीं मला अतिशय सुखी बनविलें ते मरण पावले ह्याचें मला दुःख होतेंच. मी ह्या ठिकाणीं त्यांच्याबरोबर अगदीं सुखांत होतें. त्यांची आणि माझी भेट कशी झाली हें तुम्हांला ठाऊक आहे काय ?'

माझ्या उत्तराची वाट न पहातां ती पुढें म्हणाली, 'मी ज्या हॉटेलांत काम करत होतें, तेथें ते आले. त्यांनीं मागविलेल्या पदार्थांचें पात्र त्यांच्या पुढ्यांत ठेवतांना मी रडत होतें. त्यांनीं मला जवळ बसविलें आणि रडण्याचें कारण विचारलें. त्यांना हवा असलेला पदार्थ तयार करतांना मीं त्यांत साखरेऐवजीं मीठ मिसळविलें होतें.

'मी रडत रडत म्हणालें, 'हें जर त्यांना समजलें तर ते मला कामावरून दूर करतील.'

'मुळींच नाहीं.' ते म्हणाले, 'हें हॉटेल माझ्याच मालकीचें आहे.'

'अशाप्रकारें त्यांची आणि माझी ओळख झाली. त्यांनाहि एकल-कोंडयासारखें वाटत होतें. एखाद्या स्वप्नाप्रमाणें सर्व कांहीं घडलें होतें. लग्न झाल्यानंतरच सुप्रसिद्ध लक्षाधीश सुमंतलाल ते हेच हें मला समजलें. नंतर आम्ही परदेशीं गेलों. माझ्या सहवासांत ते अगदीं सुखांत होते. मी त्यांच्या इच्छेविरुद्ध कधींच वागत नव्हते, पण त्यांच्या घरांतील मंडळींना मात्र मी आवडलें नव्हतें. शेषनाथ तर माझा द्वेषच करतो आणि रघुनाथ माझ्याबरोबर कधींच बोलत नाहीं. मींच खून केला अशी आतां ते बतावणी करतात, पण मी केला नाहीं. कृपा करून माझ्या बोलण्यावर विश्वास ठेवा.'

मला तिची दया आली तें सर्व कुटुंब तिच्याकडे तिरस्कारानें पहात होतें. तिच्यावर खुनाचा आरोप सिद्ध व्हावा, असें सर्वांनाच वाटत होतें. ती अगदीं एकाकी आणि असहाय्य अबला होती.

'आणि त्यांना वाटतें, मी जर तो खून केला नसला तर तो माधवरावांनीं केला असणार. मला त्या माणसाबद्दल वाईट वाटतें. तो नाजुक प्रकृतीचा आहे. त्याला लढतां येणार नाहीं तो भेकड नाहीं, पण भावनाप्रधान आहे. तो आनंदित असावा आणि त्यानें हें घर सोडूं नये म्हणून मी त्याला चांगल्या प्रकारें वागविण्याचा प्रयत्न केला. पोटासाठीं त्या भयंकर मुलांना शिकविणें भाग पडतें. तो सुधीर तर त्याचा तिरस्कारच करीत असतो आणि सुनेत्रा– ती कशी आहे हें तुम्हांला माहीतच आहे.'

माझी आणि सुनेत्राची अद्याप भेट झालेली नाहीं असें मीं तिला सांगितलें. तेव्हां तीच पुढें म्हणाली, 'कधीं कधीं मला वाटतें कीं ती वेडी असावी. तिच्याकडे पाहिलें कीं अनेकदां माझ्या अंगावर शहारे येतात.'

पण मला सुनेत्राऐवजीं माधवरावांबद्दल माहिती हवी होती. म्हणून मी विचारलें, 'तो कोण आहे ? तो आला कुठून ?'

'तो कोण आहे ह्याला कांहीं महत्त्व नाहीं. तो एक माझ्याचसारखा आहे. त्याचें ह्या मंडळींपुढें काय चालणार ? पोलीसहि त्यांच्याच बाजूचे आहेत, पण बाहेरच्या माणसांनीं तो खून केला असला तर ?'

'तो खून करून बाहेरच्या कुणाहि माणसाचा फायदा होणार नव्हता.' मी म्हणालों, 'खून करायला कांहीं तरी उद्देश लागतो.'

'पण तो खून करण्यांत माझा आणि माधवचा तरी काय उद्देश असणार ?' तिनें विचारलें.

'ते असें म्हणतील कीं तुमचें आणि माधवचें एकमेकांवर प्रेम आहे आणि तुमची लग्न करण्याची इच्छा आहे.'

ती ताठ उठून बसली आणि म्हणाली, 'हें म्हणणें अत्यंत दुष्टपणाचें आहे. तें मुळींच खरें नाहीं ! आमची केवळ मैत्री आहे, पण त्याशिवाय

इतर कसलाहि संबंध नाहीं. तुमचा तरी माझ्या बोलण्यावर विश्वास बसतो ना ?'

माझा तिच्या बोलण्यावर विश्वास बसला होता. त्या दोघांची केवळ मैत्री होती. हें मला मान्य होतें, पण मला असेंहि वाटत होतें कीं ती तिच्या नकळतच त्या तरुणावर प्रेम करीत होती.

मी तोच विचार करीत तेथून बाहेर निघालों. मी खाली आलों तेव्हां मला सुचित्रा भेटली. तिनें माझा हात पकडून मला एका बाजूच्या रिकाम्या खोलींत नेलें

'तुम्ही बिंदाला भेटायला गेलां होतां ना ? तुम्हांला तिच्याबद्दल काय वाटतें ?'

'स्पष्ट बोलायचें तर मला तिच्याबद्दल फार वाईट वाटतें. सुचित्रा, तुमच्या कुटुंबांतील कुणीं तिच्याबरोबर कधीं चांगलें वागण्याचा प्रयत्न केला होता काय ?'

'नाहीं, पण आम्हीं तसें करण्याची काय आवश्यकता होती ?'

'तसें कांहीं नसलें तरी तो साध्या माणुसकीचा प्रश्न होता.'

'तुमच्यावर तिचा भलतांच प्रभाव पडलेला दिसतो.' सुचित्रा म्हणाली, 'आपली परिस्थिति चांगली नव्हती ह्या एकाच कारणामुळें श्रीमंत वृद्धाबरोबर लग्न करणाऱ्या कुणाहि तरुणीबद्दल मला आपुलकी वाटणार नाहीं. तिनें तिच्याच तोलाच्या एखाद्या तरुणाबरोबर लग्न करून सुखी व्हायला हवें होतें. मी तर म्हणेन कीं तिनें आजोबांना फसविलें !'

'तुझे आजोबा तिच्यासारख्या एका तरुणीच्या बोलण्याला फसण्याइतके मूर्ख होते काय ?' मी जरा चिडूनच विचारलें.

'ते मूर्ख नव्हते, त्यांना करमणूक हवी होती. त्यांनीं आपल्या इतर व्यवहारांत जसें यश मिळवलें तसा आपला दुसऱ्या लग्नाचा व्यवहारहि यशस्वी करून दाखविला होता. आजोबांनीं मुद्दामच माधवासारख्या एका तरुणाची शिक्षक म्हणून ह्या घरांत नेमणूक केली होती. तिचें लक्ष बाहेरच्या कुणा तरुणाकडे जाऊं नये म्हणून त्यांनीं तसें केलें होतें. जें कांहीं घडेल, तें आपल्या नजरेसमोर घडावें असें त्यांना वाटत होतें आणि कांहीं विपरीत घडूं लागलें तर त्याला शह देण्याची त्यांच्यांत बुद्धिमत्ताहि तितकीच होती. पण जें कांहीं घडलें तें अघटित होतें. बिचाऱ्या आजोबांनाहि तसें कांहीं घडेल असें वाटलें नसावें.'

आणि मी तिला अडविण्याचा प्रयत्न करीत असतांनाहि ती थोड्या रागानेंच तेथून निघून गेली.

० ० ०

आदल्या रात्रीं पुरेशी झोंप न मिळाल्यामुळें मी लवकरच झोपीं गेलों होतों. जेव्हां मी जागा झालों तेव्हां माझ्या आजूबाजूला फुलांचा सुवास दरवळत होता आणि माझ्यापासून अवघ्या दोन फुटांवर कुणाचा तरी चेहरा दिसत होता. मला प्रथम वाटलें कीं तो भास असावा. पण कांहीं क्षणांतच तो मानवी चेहरा आहे, अशी माझी खात्री पटली.

तो चेहरा गोल होता. कपाळ थोडें पुढें आलेलें आणि केंस उलटे विंचरलेले होते. डोळे अगदीं लहान आणि काळे होते. जणुंकाय डोळ्या-ऐवजीं तेथें मोठें मणीच बसविले होते. त्या व्यक्तीचें शरीर हडकुळें होतें आणि ती माझ्याकडे अगदीं लक्षपूर्वक पहात होती.

'माझें नांव शोभना.' ती व्यक्ति म्हणाली.

ती सुचित्राची छोटी बहीण असावी, हें मी तर्कानें आधीं ओळखलें होतें तिचें वय सुमारें सोळा–सतरा वर्षांचें असावें. ती मुलगी अतिशय विद्रूप होती. तिचें तिच्या आजोबांशीं विलक्षण साम्य होतें आणि तिच्यांत आजोबांची बुद्धिमत्ताहि असावी असें मला वाटलें.

'तुम्हीच आमच्या सुचित्राचे भावी यजमान ना ?' तिनें विचारलें.

तिच्या त्या सरळ प्रश्नाचें मला थोडेंसें आश्चर्य वाटलें आणि मीं मान हलविली.

'पण तुम्ही इन्स्पेक्टर कौशिकांबरोबर कां आलांत ?'

'ते माझे फार जुने मित्र आहेत.' मी म्हणालों.

'खरें कीं काय ? मला ते आवडत नाहींत. मी त्यांना कांहींसुद्धां सांगणार नाहीं. मला खूप गोष्टी माहिती आहेत. माहिती मिळविणें मला आवडतें.'

ती माझ्यासमोरच्या एका खुर्चीच्या हातावर बसली होती आणि पाय हलवीत माझें लक्षपूर्वक निरीक्षण करीत होती. मला थोडें अस्वस्थ वाटूं लागलें होतें.

'माझ्या आजोबांचा खून झाला आहे हें तुम्हांला माहीत आहे काय ?' तिनें विचारलें.

'होय, तें मला माहीत आहे' मी म्हणालों.

'त्यांच्यावर इसरीनचा विषप्रयोग झाला आहे. मी आणि सुधीर रहस्यकथा वाचतों. आपण डिटेक्टिव्ह व्हावें, असें मला नेहमींच वाटत असें आणि आतां मी डिटेक्टिव्ह बनलें आहें मी आतां पुरावा गोळा करीत आहें.'

मला तिचें तें बोलणें विशेष आवडलें नव्हतें. मी म्हणालों, 'छान !'

'आतां ह्याठिकाणीं बराच बदल होणार. आम्ही आतां मुंबईत मरीन ड्राईव्हवर रहायला जाणार. आईची तशी फार दिवसांची इच्छा होती त्यामुळें तिला खूप आनंद होईल. बाबांजवळ त्यांचीं पुस्तकें असलीं कीं झालें. बाबा गोल-मोलवर फार खर्च करतात.'

'गोल-मोल म्हणजे काय?' मी बुचकळ्यांत पडून विचारलें.

'आमच्या बाबांनीं लिहिलेलें तें एक नाटक आहे. नाटकानें पहिल्याच प्रयोगाला आपटी खाल्ली आहे. परंतु तें यशस्वी होईल असें बाबांना वाटतें. तें नाटक पडणार असें आजोबा नेहमींच म्हणत असत.'

'तुमच्या वडिलांचें नाटक पडलें ह्याबद्दल मला फार वाईट वाटतें.' मी म्हणालों.

'आमच्या आईलासुद्धां फार वाईट वाटलें होतें.' ती म्हणाली, 'वर्तमानपत्रांनीं फार वाईट अभिप्राय दिले होते. ते वाचून आईला रडूं आलें. तिनें रागाच्या भरांत न्याहारीचें ताटच सखू मोलकरणीवर फेकलें आणि सखूनें नोकरी सोडण्याची नोटीस दिली. फार मोठीं गंमत झाली.'

शोभना, एकंदरींत तुला नाटकें आवडतात असें दिसतें!' मी म्हणालों, 'पण तुला तुझें आजोबा वारले ह्याबद्दल वाईट वाटतें काय?'

'विशेष वाईट वाटत नाहीं.' ती म्हणाली, 'मला ते फारसे आवडत नव्हते. मला त्यांनीं नृत्य शिकण्याची परवानगी दिली नव्हती. आई तयार होती, बाबांची तक्रारच नव्हती. पण आजोबांनीं मी नृत्य शिकण्याच्या लायकीचीं नाहीं असें सांगितलें होतें.'

'तुला नृत्याची आवड आहे काय?' मी विचारलें.

'फार आवड आहे. पण तुम्हांला हें घर आवडतें कां हो?'

'माझी अशी खात्री नाहीं.' मी म्हणालों.

'जर बिंदाबाई येथें राहिल्या नाहींत तर तें विकण्यांत येईल.' ती म्हणाली, 'मला वाटतें, रघुनाथकाका आणि काकी येथून आतां जाणार नाहींत.'

'म्हणजे ते येथून जाणार होते?' मी कुतूहलानें विचारलें.

'होय. ते मंगळवारीं कुठेंतरी बाहेरगांवीं जाणार होते. त्यांनीं विमानानें जाण्याचें ठरविलें होतें आणि काकीनें एक नवीन बॅगहि खरेदी केली होती.'

'ते बाहेरगांवीं जाणार होते असें मी तरी ऐकलें नव्हतें.'

'तें कुणालाच माहीत नव्हतें. त्यांनीं तें गुप्त ठेवलें होतें. येथून निघून गेल्याशिवाय ती गोष्ट ते कुणालाहि कळूं देणार नव्हते. जातांना ते आजोबांसाठीं चिठ्ठी लिहून ठेवणार होते.'

'असें! पण शोभना, तुझे काका बाहेरगांवीं कां जाणार होते, हें

तुला माहीत आहे काय ?'

तिनें माझ्याकडे लबाडीच्या नजरेनें पाहिलें आणि ती म्हणाली, 'त्या गोष्टीचा काकांच्या मुंबईतील ऑफिसशी कांहीं संबंध होता. माझा असा तर्क आहे कीं त्यांनीं कांहीं अफरातफर केली होती.'

'तुला तसें कां वाटावें ?' मी विचारलें.

ती माझ्या अगदीं जवळ आली. तिचा जोराचा श्वासोच्छ्वास माझ्या तोंडावर पडत होता. ती म्हणाली, 'आजोबांवर विषप्रयोग झाला त्या दिवशी काका त्यांच्याबरोबर बराच वेळ बसले होते. पैशाला विशेष महत्त्व नाहीं. आपणावर जो विश्वास टाकण्यांत आला होता त्याला आपण पात्र नाहींत असें काका बोलत होते.'

'शोभना, वडील मंडळींचें बोलणें आडून ऐकणें चांगलें नाहीं, असें तुला कधीं कुणीं सांगितलेंच नाहीं काय ?' मी विचारलें.

'तसा उपदेश सर्वच करतात.' ती जोरानें मान हलवीत म्हणाली, 'पण तुम्हांला जर कांहीं शोधून काढावयाचें असलें तर आडून ऐकायला हवें. मी तुम्हांला अगदीं पैज लावून सांगतें कीं ते इन्स्पेक्टर कौशिकहि तसें करीत असणार आणि ते स्वतः तसें करीत नसले तर दुसऱ्या कुणाला तरी तसें करायला सांगत असतील.'

मी तिच्याकडे पहातच राहिलों आणि तीच पुढें बोलूं लागली,

'सुधीरला आणि मला बऱ्याच गोष्टी माहीत आहेत, पण सुधीरपेक्षां मला जास्त माहिती आहे आणि आधींच ती मी त्याला सांगणार नाहीं. तो म्हणतो कीं बायका कधींच डिटेक्टिव्ह होणार नाहींत. मला त्याचें तें म्हणणें मान्य नाहीं. मी आतां सर्व गोष्टी लिहून ठेवणार आहे आणि पोलीस गोंधळले कीं त्यांना सांगणार आहे. मला हें कोडें उलगडतां येईल.'

'तर मग तुझ्या आजोबांना कुणीं ठार केलें हें तुला माहीत असेल.'

'मलाहि तसें वाटतें, पण मी आणखी कांहीं पुरावा गोळा करणार आहे. तुमच्या त्या कौशिकांना वाटतें कीं बिंदाबाईंनीं खून केला किंवा तिचें आणि माधवरावांचें प्रेम असल्यामुळें त्या दोघांनीं मिळून तो खून केला.'

'शोभना, ह्या असल्या गोष्टी बोलूं नये.'

'कां बोलूं नये ? त्या दोघांचें एकमेकांवर प्रेम आहेच. ते एकमेकांना प्रेमपत्रेंहि लिहितात.'

'शोभना, तुला तें काय माहीत ?'

'कारण तीं मी वाचलीं आहेत.' ती म्हणाली, 'त्या पत्रांत कांहीं दम नसतो. कारण माधवराव भित्रा आहे. पत्रांतून चांगले शब्द लिहायलाहि तो घाबरतो. त्याचीं पत्रें वाचून मी आणि सुधीर खूप हसलों

आहोंत.'

मी त्यावेळीं काय केलें असतें तें मला माहीत नाहीं, पण त्याचवेळीं बाहेर एक मोटार उभी रहाण्याचा आवाज ऐकूं आला आणि हरिणीच्या गतीनें धांवत शोभना खिडकीजवळ गली आणि तिनें आपलें फकटें नाक डकीच्या कांठावर दाबलें.

'कोण आलें आहे ?' मी विचारलें.

'साखरदांडे वकील. ते आजोबांचे वकील आहेत. मला वाटतें ते मृत्युपत्रासंबंधीं आले असावेत.' शोभना म्हणाली. ती इतकी उत्तेजित दिसत होती कीं तिला आपलें डिटेक्टिव्हाचें काम सुरू करावयाचें होतें. ह्यांत शंकाच नव्हती. कारण ती घाईघाईनें बाहेर निघून गेली होती.

सुचित्राची आई तेथें आली. ती सरळ माझ्याकडेच आली आणि तिनें माझे दोन्ही हात पकडले, तेव्हां मला आश्चर्यच वाटलें. ती म्हणाली. 'तुम्ही अद्याप येथें आहांत ही ईश्वराची कृपाच म्हणावयाची. अशा-वेळीं कुणातरी पुरुषाची गरज असते.'

ती माझे हात सोडून तेथल्या एका खुर्चीवर बसली. तिला आतां समोरच्या मोठ्या आरशांत आपलें प्रतिबिंब पहातां येत होतें. बऱ्याच मेहनतीनें तिनें अगदीं आकर्षक पोझ घेतली. जणुं काय आतां तिचा फोटोच काढावयाचा होता.

दारांतून सुचित्रानें डोकें आंत खुपसलें आणि ती अगदीं हलक्या आवाजांत म्हणाली, 'साखरदांडे !'

'तें मला माहीत आहे.' तिची आई म्हणाली.

आणखी कांहीं क्षणानंतर सुचित्रा एका वयस्क गृहस्थांबरोबर आंत आली आणि चित्रमालेनें त्यांना अभिनयपूर्वक नमस्कार केला.

'नमस्ते चित्रमालाबाई.' साखरदांडे म्हणाले, 'मी आतां वरच्या मजल्यावर जाणार आहें. मृत्युपत्राबद्दल कांहीं गैरसमज झालेला दिसतो. तुमच्या यजमानांनीं मला पत्र पाठविलें होतें मृत्युपत्र माझ्याच ताब्यांत आहे अशी त्यांची कल्पना झाली. पण आपण तें आपल्या तिजोरींत ठेवलें आहे असें मला सुमंतलालनीच कळविलें होतें. तुम्हांला त्याबद्दल कांहीं माहिती नसेलच.'

'मामंजींच्या मृत्युपत्राबद्दल ?' विस्फारित नेत्रांनीं साखरदांड्यांकडे पहात सुचित्राची आई म्हणाली, 'मला माहीत नाहीं. वरच्या मजल्यावर रहाणाऱ्या त्या दुसऱ्या बाईनें तें नष्ट केलें आहे कीं काय ?'

'हें पहा चित्रमालाबाई, आधाराशिवाय कोणतेहि वेडेवांकडे तर्क करणें योग्य नाहीं.' साखरदांडे म्हणाले, 'तें मृत्युपत्र कुठें आहे एवढाच प्रश्न आहे. आपण ह्या घरांतील सर्व खाजगी कागदपत्रें तपासलीं असें

पोलीस म्हणतात. मला आतां इन्स्पेक्टर कौशिकांना भेटलें पाहिजे.'

साखरदांडे निघून गेले आणि चित्रमाला बोठ्यानें म्हणाली, 'पाहिलेंस सुचि ? तिनें तें मृत्युपत्रहि नष्ट केलें आहे.'

'अलतेंच ! ती तसला मूर्खपणा कधींच करणार नाहीं.' सुचित्रा म्हणाली.

'पण हा मूर्खपणा नाहीं.' तिची आई म्हणाली, 'मृत्युपत्र नसलें तर सर्व कांहीं तिलाच मिळणार.'

'गप्प बैस ! साखरदांडे पुन्हां येथें येत आहेत.' सुचित्रा हळक्या आवाजांत म्हणाली.

वकीलसाहेबांनीं त्या खोलींत प्रवेश केला त्यावेळीं त्यांच्याबरोबर कौशिक आणि शेषनाथ हे दोघे होते.

'मला सुमंतलालांनीं असें कळविलें होतें कीं त्यांनीं आपलें मृत्युपत्र बँकेच्या तिजोरींत ठेवलें आहे.' साखरदांडे बोलत होते.

'पण मी बँकेकडे चौकशी केली आहे. त्यांच्याजवळ कांहीं कर्जरोख्यां-खेरीज दुसरें कांहींच नाहीं.'

रघुनाथला तेथें बोलावण्यांत आलें. पण तोहि त्या बाबतींत कांहीं मदत करूं शकला नव्हता. तो म्हणाला, 'हें मोठें विचित्र आहे. मृत्युपत्रा-वर सही केल्यानंतर दुसऱ्या दिवशीं आपण तें पोस्टानें साखरदांड्यांकडे पाठविणार असें बाबा अगदीं स्पष्ट म्हणाले होते.'

'माझ्या आठवणीप्रमाणें गेल्या महिन्याच्या नोव्हेंबर महिन्याच्या २४ तारखेला मी त्यांच्या सूचनेप्रमाणें मृत्युपत्राचा मसुदा तयार करून पाठविला होता. त्यांना तो पसंत पडल्यानंतर कांहीं दिवसांतच मी मृत्यु-पत्र तयार करून तें त्यांच्या सहीसाठीं येथें पाठविलें. एक आठवडाभर थांबूनहि जेव्हां तें मृत्युपत्र माझ्याकडे आलें नाहीं तेव्हां मी चौकशी केली आणि आपण तें बँकेकडे पाठविलें आहे असें त्यांचें उत्तर मिळालें.'

'तुम्हीच तें मृत्युपत्र तयार केलें होतें. तेव्हां त्यांत काय होतें हें तुम्हांला माहीत असणारच.' कौशिकांनीं विचारलें.

'तें अगदीं साधें मृत्युपत्र होतें.' रघुनाथ म्हणाला, 'आमची दोन भावंडें मरण पावलीं. तेव्हां त्यांच्या वांटणीचे पैसे बाबांकडेच परत आले होते. त्यामुळें मी, शेषनाथ आणि मुलें एवढेंच वारसदार होतों. बाबांनींच तसा खुलासा केला होता.

'त्यांनीं पांच लक्ष रुपये मावशीसाठीं बाजूला काढले होते आणि दहा लक्ष रुपये व हें घर बिंदाला दिलें. बिंदाला हें घर मिळावें किंवा तिनें मुंबईत स्वतःच्या पसंतीचें घर विकत घ्यावें असें त्यांनीं म्हटलें होतें. उरलेल्या संपत्तीचे त्यांनी तीन भाग पाडले होते. दोन भाग आम्हां

दोघां भावंडांना मिळावा आणि तिसरा भाग सुचित्रा, शोभना आणि सुनेत्रा ह्यांना सारख्या प्रमाणांत देण्यांत येणार होता. ही तिन्हीं मुलें वयांत येईपर्यंत ही रक्कम विश्वस्तांच्या ताब्यांत रहावी अशी त्यांनी व्यवस्था केली होती. वकीलसाहेब, माझें हें म्हणणें बरोबर आहे.'

'होय, साधारण तशाच प्रकारचें तें मृत्युपत्र होतें.' साखरदांडे म्हणाले, मृत्युपत्रांत काय होतें हें सांगण्याचा अधिकार आपला आहे असें त्यांना वाटत असावें.

'बाबांनीं आम्हांला तें वाचूनच दाखविलें होतें आणि त्यावर आमचें कांहीं म्हणणें आहे काय असेंहि विचारलें होतें. अर्थात् आमच्यापैकीं कुणालाच कांहीं म्हणावयाचें नव्हतें.' रघुनाथ म्हणाला.

'बिंदा त्यासंबंधीं कांहीं बोलली होती.' रघुनाथबरोबर तेथें आलेल्या मावशीनें सांगितलें.

'होय, ती म्हणाली होती कीं मामंजींनीं मृत्यूची भाषा बोलावी हें तिला पसंत नव्हतें आणि त्यांच्या मृत्यूनंतर तिला त्यांचे पैसे मुळींच नको होते.' चित्रमाला हावभाव करीत म्हणाली.

'तिच्या वर्गांतील माणसें तसें म्हणणारच. पण त्या म्हणण्यांत कांहीं अर्थ नसतो.' मावशी म्हणाली.

मला तें मावशीचें बोलणें मुळींच आवडलें नव्हतें. पण मला फक्त ऐकावयाचें होतें.

'त्यांनीं आपल्या पैशाची वांटणी अगदीं योग्य प्रकारें केली होती.' साखरदांडे म्हणाले.

'तुम्हा मंडळींना तें मृत्युपत्र वाचून दाखविल्यानंतर काय घडलें?' कौशिकांनीं विचारलें.

'त्यानंतर बाबांनीं सही केली.' रघुनाथ म्हणाला.

'पण त्यांनीं ती सही कधीं आणि केव्हां केली?'

'तुम्हांला त्याबद्दल इत्थंभूत माहिती हवी असली तर मीं ती सांगतें.' रघुनाथाची बायको म्हणाली, 'मामंजींनीं मृत्युपत्र वाचल्यानंतर तें आपल्या पुढ्यांत ठेवलें आणि घंटी वाजवून घरांतील दोघां नोकरांना बोलाविलें. त्यांनीं नोकरांसमक्ष मृत्युपत्रावर सही केली. नंतर साक्षीदार म्हणून त्या नोकरांच्या सह्या झाल्या. नोकर तेथून निघून गेल्यानंतर मामंजींनीं तें एका मोठ्या लिफाफ्यांत बंद केलें आणि आपण तें मृत्युपत्र दुसऱ्या दिवशीं साखरदांड्यांकडे पाठविणार असें ते म्हणाले.'

'मृत्युपत्रांतील मजकूर नोकरांना वाचून दाखविण्यांत आला होता काय?' कौशिकांनीं विचारलें.

'अर्थातच नाहीं.' शेषनाथ म्हणाला, 'नोकरांनीं सह्या केल्या तेव्हां त्यांनीं मजकुरावर एक कोरा कागद ठेवला होता. नोकरांना त्या गोष्टीशीं कांहीं कर्तव्यच नव्हतें.'

'असें मी तरी म्हणणार नाहीं.' कौशिक म्हणाले आणि त्यांनीं खिशांतून एक लांब लिफाफा काढून तो वकिलांपुढें केला. साखरदांड्यांनीं तो लिफाफा उघडून आंतला कागद बाहेर काढला व वाचला. नंतर ते म्हणाले, 'हें आश्चर्यच आहे. तुम्हांला हा लिफाफा कुठें सांपडला ?'

'तो सुमंतलालांच्या तिजोरींत इतर कागदपत्रांबरोबर होता.' कौशिक म्हणाले.

'पण मृत्युपत्र सांपडलें ना ? तर मग त्याबद्दल इतका घोळ का घालण्यांत आला आहे ?' रघुनाथनें विचारलें.

'रघुनाथराव, हेंच मृत्युपत्र मीं तुमच्या वडिलांच्या सहीसाठीं तयार केलें होतें, पण ह्यावर त्यांची सही नाहीं.' साखरदांडे म्हणाले.

'तर मग तो मृत्युपत्राचा मसुदा असेल.'

'नाहीं रघुनाथराव.' साखरदांडे म्हणाले, 'मसुदा माझ्याकडे परत पाठविण्यांत आला होता आणि त्यावरूनच मी हें मृत्युपत्र तयार केलें होतें. त्यांनीं सर्वांच्या देखत ह्यावर सही केली असें तुम्ही म्हणतां. दोघां साक्षीदारांनीं ह्यावर सह्या केल्या असेंहि तुम्ही सांगितलेंत, पण ह्या मृत्युपत्रावर सही नाहीं.'

'हें अशक्य आहे.' शेषनाथ जोरांत म्हणाला.

'तुमच्या वडिलांची दृष्टि चांगली होती ना ?' कौशिकांनीं विचारलें.

'ते चष्मा लावून लिहिण्यावाचण्याचें काम करीत असत आणि मृत्युपत्रावर सही करेपर्यंत त्यांच्या नाकावर चष्मा होता.' रघुनाथ म्हणाला.

'मला असें वाटतें कीं, सहीच्या वेळीं त्यांच्यापुढें कोणता तरी वेगळा कागद ठेवण्यांत आला असावा आणि आपण नुकत्याच वाचलेल्या मृत्युपत्रावर सही करीत आहोंत अशी सुमंतलालांची समजूत असावी.' कौशिक म्हणाले.

'ह्यावरील सह्या खोडून टाकण्यांत आल्या असाल्या तर ?' रघुनाथनें विचारलें.

'नाहीं रघुनाथराव, तें काम कितीहि सफाईनें करण्यांत आलें असलें तरी आम्हीं ती लबाडी शोधून काढली असती. सुमंतलालांनीं साखरदांडेकडे पाठविलेला हा कागद आणि ज्यावर त्यांनीं तुम्हां सर्वां देखत सही केली, तो कागद खात्रीनें एक नव्हता.'

'पण मी सही करण्यासाठीं त्यांच्याकडे पाठविलेलें मृत्युप मात्र सेंच आहे.' साखरदांडे म्हणाले.

ती सर्व मंडळी एकमेकांकडे पहातच राहिली. शेवटीं रघुनाथ म्हणाला, 'हें मोठें विलक्षण आहे. आम्ही सर्व येथें होतो. हें असें घडणेंच शक्य नाहीं.'

'जें प्रत्यक्ष घडलें आहे तें घडणें शक्य नाहीं असें म्हणण्यांत काय अर्थ आहे?' मावशीनें विचारलें, 'पण आतां पुढें काय?'

'हें एक कायदेशीर कोडें आहे आणि त्याचा अगदीं बारकाईनें विचार करायला हवा.' साखरदांडे म्हणाले, 'ह्या मृत्युपत्रामुळेंच पूर्वींची सर्व मृत्युपत्रें अर्थातच रद्द होतात. सही करतांना आपणासमोर हेंच मृत्युपत्र आहे अशी सुमंतलालांची कल्पना होती. असें सिद्ध करणारे अनेक साक्षीदार आपणाजवळ आहेत. ह्याचा बराच विचार करावा लागेल.'

शेषनाथनें साखरदांडेंना स्वतःबरोबर भोजन करण्याची विनंति केली आणि सर्वजण उभे राहिले. मी कुणाच्याहि लक्षांत येणार नाहीं अशा प्रकारे सुचित्राजवळ सरकलों आणि म्हणालों, 'मी येथें रहावें कीं जावें?'

'मला वाटतें तुम्हीं येथून जावें.' ती म्हणाली.

मी कौशिकांच्या पाठीमागून खोलीतून बाहेर पडलों. दाराबाहेर शोभना घुटमळत होती. तिची बरीच करमणूक झालेली दिसत होती. मी जवळ जातांच ती म्हणाली, 'पोलीस महामूर्खच आहेत.'

सुचित्रा त्याचवेळीं बाहेर आली आणि तिनें विचारलें, 'शोभना, तूं काय करीत होतीस?'

'मी स्वयंपाकिणीला मदत करीत होतें.' ती म्हणाली.

'मला वाटतें तूं ह्या दाराला कान लावून चोरून ऐकत होतीस.' सुचित्रा म्हणाली.

शोभनानें आपल्या वडील बहिणीला तोंड वेडेंवांकडें करून दाखविलें आणि मान हलवीत तेथून निघून गेली. सुचित्रा तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पहात उभी होती. ती म्हणाली, 'ही मुलगी म्हणजे एक मोठें कोडेंच आहे!'

० ० ०

७ : कोड्यांतील मेख!

दुसऱ्या दिवशीं मीं जेव्हां सी. आय्. डी. ऑफिसांतील माझ्या दप्तरांच्या खोलींत प्रवेश केला तेव्हां इन्स्पेक्टर कौशिक आपल्या रिपोर्टाचा

शेवटचा भाग निवेदन करीत होते.

'...आणि साहेब, मी इतके प्रयत्न करून शेवटीं त्यांतून कांहींच निष्पन्न झालें नाहीं. तो खून करण्याचें कुणालाहि कांहीं कारण नव्हतें. त्यांच्यापैकीं कुणालाहि सांपत्तिक विवंचना नाहीं. फक्त त्या वृद्धाच्या तरुण बायकोकडे आणि तिच्या हातांतून कॉफीचा प्याला घेतांना तिच्याकडे लाजून पहाणाऱ्या तरुणाकडे संशयाचें बोट दाखविण्यांत येतें.'

'कौशिक, मी ह्यांत थोडी चांगली भर घालूं शकेन.' मी म्हणालों, 'रघुनाथ आणि त्याची बायको येत्या गुरुवारीं अचानक परदेशीं निघून जाणार होते. खुनाच्या आदल्याच दिवशीं रघुनाथ आणि त्याचे वडील ह्यांची बरीच बाचाबाची झालीं होती. सुमंतलालांनीं कांहींतरी शोधून काढलें होतें आणि रघुनाथनें आपला गुन्हा मान्य केला होता.'

कौशिक माझ्याकडे आश्चर्यानें पहात म्हणाले, 'तूं हें सर्व मिळविलेंस कुठून ? जर नोकरांकडून ही माहिती मिळविली असलीस...'

'मला ी माहिती नोकरांकडून मिळालेली नाहीं.' मी म्हणालों, 'मला ती एका खाजगी गुप्तहेराकडून मिळाली आहे. त्या गुप्तहेरानें पोलिसांना खरोखरच चारीमुंड्या चीत केलें आहें आणि त्यानें अजूनहि बऱ्याच गोष्टी हातच्या राखून ठेवल्या आहेत.'

'तूं हें रघुनाथाबद्दल बोलतोस ?' कौशिक म्हणाले, 'तोच लबाड माणूस आहे तर ?'

थोड्याशा नाखुषीनेंच मी सत्य सांगितलें. मला रघुनाथ आवडला होता आणि पोलिसांनीं त्या माणसाला निष्कारण त्रास देऊं नये असें मला वाटत होतें. अर्थात शोभनाची माहिती विश्वासपात्र नसण्याचीहि शक्यता होती. पण मला मनापासून तसें वाटत नव्हतें.

'त्या पोर्टीनें तुला सांगितलें तर ?' कौशिक म्हणाले, 'त्या घरांत जें चालतें तें सर्व तिला समजतें असें दिसतें.'

'मुलांना बहुधा असल्या गोष्टी समजतात.' माझे वडील म्हणाले.

शोभनानें सांगितलेली हकीकत खरी असली तर त्या प्रकरणाचें सर्व स्वरूपच बदलत होतें. शोभना म्हणाली होती त्याप्रमाणें जर रघुनाथ कंपनीच्या पैशाची अफरातफर करीत असला आणि ती गोष्ट सुमंतलालांच्या लक्षांत आली असली तर तें सत्य उघडकीस येण्यापूर्वी सुमंतलालांचें तोंड कायमचें बंद करून त्यानें गुप्तपणें मुंबई सोडणें आवश्यक होतें. बहुधा रघुनाथाच्या हातून असें कांहीं घडलें असावें कीं ज्यामुळें त्याच्यावर फौजदारी गुन्ह्याचा आरोप ठेवण्यांत येणार होता.

ह्यासंबंधीं चर्चा झाल्यानंतर सुमंतलालांच्या कंपनीच्या व्यवहाराची चौकशी करण्यांत यावी असा निर्णय घेण्यांत आला. माझे वडील म्हणाले,

'जर त्या कंपनीचें दिवाळें निघालें तर मुंबईत भलताच गोंधळ उडेल. तो कंपनी म्हणजे शेंकडों लहानमोठ्या हॉटेलांची संघटना आहे आणि त्यांत हजारोंचें कोट्यावधि रुपयांचें भांडवल गुंतलेलें आहे.'

'जर त्या कंपनीच्या कारभारांत कांहीं गोंधळ दिसून आला तर आपणाला हवा असलेला पुरावा मिळूं शकेल.' कौशिक म्हणाले, 'ज्यामुळें बापानें मुलाला बोलाविले आणि रघुनाथनें आपला गुन्हा कबूल केला. बिंदा सिनेमाला गेली होती आणि रघुनाथला बाजूच्या खोलींत जाऊन इन्सुलीनची बाटली रिकामी करावयाची आणि त्यांत इसरीन भरावयाचें एवढेंच करावयाचें होतें. कदाचित् तें काम त्याच्या बायकोनेंहि केलें असेल.'

'त्या दिवशीं घरीं आल्यानंतर आपण सुमंतलालांच्या विभागांत गेलों होतों पण नवरा तेथें आपला पाईप विसरला होता आणि तो आणण्यासाठीं गेलों होतों असें तिनें कबूल केलें आहे. ती इसरीनची अदलाबदल करण्याठींहि गेली असेल किंवा तिनें बिंदा परत येण्यापूर्वी स्वतः तेंच इंजेक्शन दिलेंहि असेल ती बाई भलतीच शांत आणि बुद्धिमान आहे. तिला तें सहज करतां आलें असतें.'

मी मान डोलावीत म्हणालों, 'तुम्ही म्हणतां तशी ती बाई आहे खरी. पणं बापावर विषप्रयोग करण्याची कल्पना रघुनाथला सुचायची नाहीं. ती कल्पना कुणातरी स्त्रीचीच दिसतें.'

'विषप्रयोग करणारे पुरुष भरपूर आढळतात.' माझे वडील म्हणाले.

'तें कांही कां असेना! पण निदान एकट्या रघुनाथाचें तरी हें काम नाहीं' मी म्हणालों, 'पण आणखी एक गोष्ट आहे. रघुनाथची बायको संपत्तीचा हव्यास धरणारी नाहीं.'

दुसऱ्या दिवशीं पुन्हां मला वडिलांनीं ऑफिसांत बोलाविलें होतें. यावेळींहि कौशिक तेथें होते आणि ते बरेच खूष झालेले दिसत होते.

'कोणत्याहि क्षणीं त्या कंपनीचें दिवाळें वाजण्याची शक्यता आहे.' ते म्हणाले, 'आम्ही अतिशय सावधगिरीनें चौकशी केली. सरळ चौकशी केली तर मुंबईभर घबराट पसरायचा. अनेक वर्षांच्या अव्यवस्थित कारभारामुळें कंपनीचें दिवाळें निघण्याच्या बेतांत आहे आणि ती सर्व जबाबदारी रघुनाथची आहे'

'त्यानें कंपनीच्या पैशांचा गैरवापर केल्याचें आढळलें काय?' माझ्या वडिलांनीं विचारलें.

नाहीं, आम्हांला तसें वाटत नाहीं.' कौशिक म्हणाले, 'स्पष्टच सांगायचें तर तो माणूस खूनी असेल, पण तो पैसे खाणारा आहे असें म्हणतां येणार नाहीं. तो मूर्ख आहे त्यानें नालायकांवर विश्वास ठेवला आणि लायक माणसाला ओळखलें नाहीं. त्यामुळें ही परिस्थिति ओढवली

आहे. खरें म्हटलें तर त्याच्यासारखा माणूस कोणताहि धंदा करण्यास पात्र नाहीं.'

'तो धंद्यांत नसतांनाहि केवळ तो सुमंतलालांचा मुलगा आहे, म्हणून त्याला त्यांत पडावें लागलें.' माझे वडील म्हणाले, 'पण तो बदमाष आहे असें म्हणावयास कांहीं आधार सांपडला काय ?'

'नाहीं साहेब, तो मूर्ख आहे, पण बदमाष नाहीं. एवढें मात्र खरें कीं कंपनीचा ढांसळणारा व्यवहार सांभाळण्यासाठीं येत्या बुधवारपर्यंत अवाढव्य रकमेची गरज होती आणि ती त्याला आपल्या बापाच्या मृत्यूमुळें मिळूं शकणार होती. बाजारांत तेवढें कर्ज काढण्याइतकी त्याची स्वतःची पत नाहीं.'

'पण त्यांतून एक सोपा मार्ग होता.' माझे वडील म्हणाले, 'त्याला आपल्या वडिलांकडे जाऊन मदत मागतां येणार होती. मला वाटतें त्यानें तसें केलें असावें. त्या मुलीनें जें ऐकलें तें तेंच असावें. वडिलांनीं त्याला मदत करण्यास साफ नकार दिला. मला वाटतें ते आपले पैसे निष्कारण फुकट घालविण्यास तयार नसावेत.'

कौशिकांचें म्हणणें बरोबर दिसत होतें चित्रमालेच्या चित्रपटासाठीं भांडवल पुरवण्यासहि सुमंतलालनीं नकार दिला होता. तो चित्रपट पडणार असें त्यांचें म्हणणें होतें आणि पुढें तेंच खरें ठरलें होतें. ते उदार होते, पण भलत्याच गोष्टींत पैसा उधळण्याची त्यांची तयारी नव्हती. त्यांनीं कंपनीचा सर्व व्यवहार आपल्या मुलाच्या स्वाधीन केला होता, पण तो साव्हरण्यासाठीं स्वतः कष्टानें मिळविलेले हजारों रुपये गुंतविण्याची त्यांची इच्छा नव्हती. त्यामुळेंच रघुनाथसमोर पैसे मिळविण्याचा तो एकच मार्ग होता. कंपनीचें दिवाळें वाजूं नये म्हणून त्याला त्याच्या वडिलांना ठार करावें लागणार होतें ! खून करण्यासाठीं तें एक योग्य कारण होतें यांत शंकाच नव्हती.'

माझे वडील आपल्या घड्याळाकडे पहात म्हणाले, 'मी त्याला येथें बोलाविलें आहे. तो कोणत्याहि क्षणीं येथें येईल.'

'कुणाला ? रघुनाथला ?' मी आश्चर्यानें विचारलें.

वडिलांनीं मान डोलाविली. रघुनाथच्या स्वागताची सर्व तयारी करण्यांत आली. तेथें होणारें संभाषण लिहून घेण्यासाठीं एका लघुलिपी लेखकाला एका पडद्याआड बसविण्यांत आलें आणि कांहीं मिनिटांतच रघुनाथ तेथें आला.

तो एखाद्या वेंधळ्याप्रमाणें आला होता. एका खुर्चीवर तो धडपडलाहि . हसत्या माणसाकडून इन्सुलीनच्या बाटलींत इसरीन घालण्याची क्रिया घडणार नाहीं असें माझें ठाम मत बनलें. त्याच्यासारख्या माण-

साला तसलें नाजुक काम जमणेंच शक्य नव्हतें. तेव्हां तें त्याच्या बाय-कोनें केलें असावें.

'तुम्ही मला भेटायला बोलविलेंत ? कांहीं नवीन शोध लागला आहे काय ?' त्यानें घाईघाईनें बोलण्यास सुरुवात केली. 'सूर्यकांत, तुम्हीहि येथें आहांत ? मी तुम्हांला पाहिलें नव्हतें. तुम्ही येथें आलांत तें फार चांगलें झालें, पण साहेब...'

'रघुनाथराव, मी तुम्हांला कांहीं नवीन बातमी सांगण्यासाठीं किंवा विचारण्यासाठीं बोलाविलें नाहीं, पण मला असें समजलें आहे कीं, वडिलांच्या मृत्युपूर्वी त्यांच्याबरोबर तुमचें बोलणें झालें होतें.'

'होय, हें बरोबर आहे. मी त्यांच्याबरोबरच चहा घेतला, पण मी ते पूर्वीच सांगितलें आहे.'

'तुमच्या वडिलांबरोबर तुमचें काय बोलणें झालें तें तुम्हीं सांगितलें नाहीं.' वडील म्हणाले.

'त्यांत कांहीं विशेष नव्हतें. रोजच्याच घरासंबंधींच्या गोष्टी, सुचित्रा—'

'तुमच्यामध्यें कंपनीसंबंधीं बोलणें झालें नाहीं ?' साहेबांनीं विचारलें.

रघुनाथची चर्या एकदम बदलली. तो कमालीचा निराश झालेला दिसला. नंतर तो दोन्ही हातांनीं तोंड झांकून म्हणाला, 'अरे देवा !'

उंदरावर पंजा ठेवणाऱ्या मांजराप्रमाणें कौशिक हंसले ते म्हणाले, 'रघुनाथराव, तुम्ही आम्हांला सर्वच माहिती दिली नव्हती हें कबूल करतां ना ?'

'पण—पण तुम्हांला हें कसें समजलें ?'

'आमच्याजवळ असल्या गोष्टी शोधून काढण्याची साधनें आहेत.' कौशिक म्हणाले, 'आतां तरी तुम्ही सर्व सत्य सांगाल ना ?'

'अर्थातच सांगेन.' रघुनाथ म्हणाला, 'तुम्हांला काय माहिती हवी आहे ?'

'तुमच्या कंपनीचें दिवाळें वाजण्याच्या बेतांत आहे हें खरें काय ?'

'होय, कंपनी आतां वांचणार नाहीं. जर त्यासंबंधींची माहिती पुरविण्यापूर्वीं वडिलांना मृत्यु आला असता तर बरें झालें असतें. मला अतिशय लाज वाटते.'

'त्या संदर्भांत तुमच्यावर फौजदारी खटला चालविण्यांत येईल काय ?'

'मुळींच नाहीं.' रघुनाथ कपाळावर आठ्या चढवून म्हणाला, 'कंपनीचा व्यवहार बंद पडणार नाहीं. मी जर माझें स्वतःचें भांडवल त्यांत घातलें तर इतर ठेवीदारांना रुपयांबद्दल शंभर पैसे परत देतों

येतील आणि मी तसें करणारच आहे. मला लाज वाटली ती एवढ्याच-साठीं कीं, वडिलांनीं माझ्यावर जो विश्वास टाकला होता तो अनाठायीं होता. मी त्यांच्या विश्वासाचें चीज करूं शकलों नाहीं त्यांनीं आपली सर्वांत आवडती कंपनी माझ्या स्वाधीन केली होती आणि मला ती बंद करावी लागली.'

'तुम्ही जर सर्व ठेवीदारांचे पैसे पूर्ण करणार होतां. तर तुम्हांला मुप्तपणें परदेशीं निघून जाण्याचें काय कारण होतें?' कौशिकांनीं विचारलें.

'तुम्हांला तेंहि समजलें!' रघुनाथनें कपाळावर हात मारून विचारलें, 'बाबांना सत्य सांगण्याची माझ्यांत हिंमत नव्हती. त्यांचें माझ्यावर तसें प्रेम होतें. त्यांनीं मला हवी ती मदतहि केली असती. पण त्यांनीं कष्टानें मिळविलेले पैसे माझ्या बुडत्या धंद्यांत गुंतवावे असें मला वाटत नव्हतें आणि त्यामुळेंच दिवाळें टाळण्याची शक्यताच नव्हती. माझ्या बायकोनें मला वडिलांना कांहीं सांगूं नये असा सल्ला दिला.'

'तर मग तुमचें तें मत कां बदललें?' माझ्या वडिलांनीं विचारलें, 'तुम्ही पैशाची मदत मागण्यासाठींच त्यांना भेटलां होतां ना?'

'हें तुमचें म्हणणें अगदीं चुकीचें आहे' रघुनाथ म्हणाला, 'मी गेलों नव्हतों. बाबानींच मला बोलाविलें. त्यांना ती बातमी कुणाकडून तरी समजली होती. त्यांनीं जेव्हां मला आडवे तिडवे प्रश्न विचारण्यास सुरुवात केली तेव्हां मीं त्यांना सर्व कांहीं सांगितलें आणि मी नको नको म्हणत असतानाहि कंपनी पुन्हां भक्कम पायावर उभी राहील इतके भांडवल पुरविण्यास ते तयार झाले. इतकेंच नव्हे तर त्यांनीं आपल्या दलालांना पत्र लिहून त्यांना तशा सूचनाहि दिल्या. तें पत्र त्यांनीं माझ्या-जवळच दिलें होतें. पण अचानक त्यांना मृत्यूनें गांठल्यामुळें मी तें पोष्टांत टाकण्यास विसरलों तें बहुधा आतांहि माझ्या खिशांत असेल.'

त्यानें खिसे चांचपले. त्याला एका खिशांत चुरगळलेलें पत्र सांपडलें आणि त्यानें तें माझ्या वडिलांच्या स्वाधीन केलें. वडिलांनीं तें वाचलें. रघुनाथनें सांगितलेल्या सूचना सुमंतलालनीं आपल्या दलालांना दिल्या होत्या.

'हें पत्र मिळाल्यानंतर तुम्हीं काय केलेंत?' वडिलांनीं विचारलें.

'मी धांवत माझ्या भागांत गेलों. माझी बायको नुकतीच परत आली होती. तिला मी तें सांगितलें. मा त्यावेळीं इतका आनंदांत होतों कीं मी काय करीत आहें हेंहि त्यावेळीं मला समजत नव्हतें.'

'त्यानंतर किती वेळानें तुमचे वडील आजारी पडले?'

'अर्ध्या तासांतच, फार तर एक तास झाला असेल. बिंदा धांवत

माझ्याकडे आली. ती घाबरलेली आणि चमत्कारिक दिसत होती. पण तें मी तुम्हांला पूर्वी सांगितलें आहे.'

वडिलांनीं ते पत्र आपणाजवळ ठेवून घेतलें आणि त्याबद्दलची पावती लिहून दिली. नंतर ते उभे राहून म्हणाले, 'रघुनाथराव, तुम्हीं आम्हांला बरीच मदत केली आहे. त्याबद्दल मी तुमचे आभार मानतों. पण तुम्हीं हें सर्व आम्हांला पूर्वींच सांगायला हवें होतें.'

रघुनाथ निघून गेल्यानंतर कौशिक आशेनें म्हणाले, 'हें पत्र बनावटहि असूं शकेल.'

'असणें शक्य आहे. पण ह्यावेळीं तसें करण्यांत आलें असावें असें मला वाटत नाहीं.' वडील म्हणाले, 'आपल्या मुलाला संकटांतून वांचविण्याची सुमंतलालांची इच्छा होती आणि त्यांना जिवंत असतांनाच ती मदत चांगल्या प्रकारें करतां येणार होती. आतां मृत्युपत्र वाचीसें झालें आहे त्यामुळें रघुनाथरावांच्या मार्गांत आपल्या वाटयाचे पैसे मिळविण्यासाठीं मोठी अडचण निर्माण झाली आहे. त्यामुळेंच त्याच्या कंपनीचे दिवाळें वाजणें अपरिहार्य आहे. कौशिक, रघुनाथला किंवा त्याच्या बायकोला वृद्ध सुमंतलालांचा खून करण्याचें कांहींच कारण नव्हतें. उलट—'

'साहेब, तुमच्या मनांत तरी काय आहे?' वडिलांनीं आपलें बोलणें थांबविल्यामुळें कौशिकांनीं विचारलें.

माझे वडील अगदीं सावकाश म्हणाले, 'जर सुमंतलाल आणखी चोवीस तासच जगले असते, तरी रघुनाथवरील संकट दूर झालें असतें. पण त्यांना अचानक आणि नाटयमय प्रकारें तासाच्या आंत मृत्यूनें गांठलें.'

'म्हणजे त्या घरांतीलच कुणालातरी रघुनाथचें दिवाळें वाजावें असें वाटत होतें, असेंच तुम्हांला म्हणावयाचें आहे ना?' कौशिकांनीं विचारलें, 'पण तें संभवनीय दिसत नाहीं.'

'त्या मृत्युपत्राचें काय?' वडिलांनीं विचारलें, 'वृद्ध सुमंतलालांचे पैसे कुणाला मिळणार?'

'साहेब, वकील कसे असतात हें तुम्हांला माहीतच आहे.' कौशिक उसासा सोडून म्हणाले, 'त्यांच्याकडून कधीं सरळ उत्तर मिळावयाचें नाहीं त्यांचे पूर्वींचें एक मृत्युपत्र आहे आणि तें त्यांनीं आपल्या दुसऱ्या लग्नाच्या वेळीं केलेलें आहे त्यावेळीं त्यांनीं आपल्या बायकोला तेवढीच रक्कम दिली होती. मावशीला थोडी रक्कम दिली होती आणि उरलेले पैसे रघुनाथ आणि शेषनाथ ह्या दोघांना दिले होते. नव्या मृत्युपत्रावर सही केलेली नाहीं. तेव्हां जुने मृत्युपत्रच मान्य करायला हवें. अर्थात त्यांत अडचणी आहेतच. नव्या मृत्युपत्रामुळें जुनें रद्द होतें आणि नवें

मृत्युपत्र तयार करण्यांत आलें होतें असें सिद्ध करणारे साक्षीदार आहेत. पण कायदेशीर लटपटीमुळें तीं दोन्हीं मृत्युपत्रें रद्द झालीं तर नवऱ्याचे सर्व पैसे बायकोलाच मिळतील.'

'म्हणजे नवें मृत्युपत्र रद्द झाल्यामुळें बिंदाचाच फायदा होणार आहे?' वडील म्हणाले.

'होय. त्यावरून खुनाच्या प्रकरणांत तिचेंच अंग असावें असें म्हणतां येतें. पण तिनें तो खून केला असावा, असें मला वाटत नाहीं.'

आणि मलाहि वाटत नव्हतें. ह्या कोड्यांत कुठेंतरी मेख होती!

० ० ०

८ : पुन्हां वांकडें घर!

कौशिक निघून गेल्यानंतर मीं विचारलें, 'बाबा, खुनी असतात कसे?'

वडील किंचित् हंसून म्हणाले, 'कांहीं खुनी दिसण्यांत फार चांगले असतात. आत्तां रघुनाथ आला होता. त्याच्यासारखेच असतात! सामान्यतः खून हा योजनापूर्वक केलेला गुन्हा नसतो, अगदीं ऐनवेळीं आणि बहुधा अगदीं क्षुल्लक कारणावरून बहुसंख्य खून घडत असतात. कांहीं लोकांना कांहीं विशिष्ट परिस्थितींत खून करणें भागच पडतें. पण त्याबद्दल त्यांना पश्चात्तापहि होत नाहीं. खून केल्याबद्दल ज्यांना खरा पश्चात्ताप घडतो, असा माणूस निदान मी तरी पाहिलेला नाहीं.'

'बाबा, कुणीतरी फार पूर्वीपासून सुमंतलालांचा द्वेष करीत असला तर तें खून करण्याला पुरेसें कारण होईल काय?' मी विचारलें.

'केवळ द्वेषामुळें खून करणें संभवनीय नाहीं. मात्र प्रेमामुळें खून करणारें आढळतात. खुनी माणूस बहुधा बढाईखोर असतो आणि त्यामुळेंच दहांतील नऊ खुनी पकडले जातात. आपण कधींच पकडलें न जाण्याइतकें हुषार आहोंत असें त्यांना वाटते. त्यांना पकडलें जाण्याची भीति वाटते. पण ते बहुधा बढाई मारतात.

'खुनी माणसाला नेहमीं त्यासंबंधीं बोलावेसें वाटतें. आपण जें केलें त्यासंबंधीं कुणालातरी सांगावें असें त्याला वाटतें. त्यामुळें तो माणूस आपण केलेल्या खुनाबद्दल बोलत नाहीं. पण खून ह्या विषयाबद्दल चर्चा करण्यास हपापलेला असतो. मुला, तूं त्या दृष्टीनें प्रयत्न कर. तूं पुन्हां तेथें जा आणि त्यांच्यांत मिसळ आणि तेथली मंडळी काय बोलताहेत ह्याकडे अगदीं बारकाईनें लक्ष दे.'

आपल्या घराण्यांतील मंडळी निरनिराळ्या प्रकारें कशी निर्दय आहेत हें सुचित्रानें मला सांगितलें होतें. मी ते ह्यावेळी वडिलांना

सांगितलें.

'म्हणूनच मी म्हणतों तूं तेथें जा आणि सर्वांबरोबर बोल.' वडील म्हणाले, 'सुचित्राचें म्हणणें अगदीं बरोबर आहे. ह्या प्रकरणांतील सत्य बाहेर पडणें तुम्हां दोघांच्याहि दृष्टीनें आवश्यक आहे आणि त्या मुलीला जरा जप.'

'कुणाला, शोभनाला ? म्हणजे मी काय करत आहें तें तिला कळूं देतां कामा नये ?'

'नाहीं सूर्यकांत, माझ्या म्हणण्याचा तो अर्थ नाही. तूं तिच्यावर नजर ठेव त्या मुलीला कांहीं अपाय होता कामा नये. त्या घरांत एक निर्दय खुनी दडी मारून बसला आहे हें स्पष्टच आहे आणि त्या मुलीला सर्व कांहीं माहिती दिसते तें जर खुनी माणसाच्या लक्षांत आलें तर अर्थातच त्या मुलीला धोका आहे.'

मी पुन्हां जेव्हां त्या वांकड्या घरीं गेलों तेव्हां माझ्या मनाला अपराधित्वाची जाणीव किंचित् पोहोंचत होती. शोभनानें रघुनाथबद्दल मला जें सांगितलें होतें तेवढेंच मी कौशिकांना कळविलें होतें. बिंदा आणि माधव ह्यांच्या पत्रव्यवहाराबद्दल मी कांहींच बोललों नव्हतों. बिंदाच्या विरुद्ध पोलिसांना अधिक पुरावा देण्यास मी नाखूष होतों. जर खरोखरच त्या खुनांत तिचा हात असला तर तें पोलिसांनीं शोधून काढावें असें माझें मत होतें.

मी जाण्यापूर्वी सुचित्राला टेलिफोन केला होता आणि मी तेथें शक्य तितक्या लवकर यावें अशी तिनें इच्छा प्रदर्शित केली होती. कुणीतरी बोलण्यासारखें आपल्याजवळ नसलें तर आपणाला वेड लागेल असें तिनें सांगितलें.

मी पुढल्या दाराजवळ माझी टॅक्सी उभी केली आणि ड्रायव्हरला पैसे दिले. टॅक्सी निघून गेल्यानंतर मी दारासमोर घुटमळतच उभा राहिलों, पुढलें दार उघडेंच होतें. दारावरील घंटी वाजवावी कीं, तसेंच आंत शिरावें ह्याचा मी विचार करीत होतों.

मी घुटमळत उभा असतांना माझ्या पाठीमागें किंचित् आवाज झाला आणि एका झाडाच्या आड उभी असलेली शोभना मला दिसली. 'मी तिला हांक मारली पण ती दूर पळाली. मी तिच्या पाठीमागून जाऊन तिला गांठलें. पण ती आतां माझ्याबरोबर बोलावयास पूर्वीइतकी तयार नव्हती. 'शोभना तूं माझ्याबरोबर बोलत कां नाहींस ?' मी विचारलें.

'माझी इच्छा नाहीं.' ती म्हणाली, 'मी जें तुम्हांला सांगितलें तें तुम्ही पोलिसांना सांगितलें.'

म्हणजे रघुनाथ काकाबद्दल ना ? पण शोभना, त्यामुळें कांहीं

बिघडलें नाहीं !' मी म्हणालों, 'उलट त्यामुळें पोलिसांच्या मनांतील त्यांच्याबद्दलचा संशय दूर झाला आहे.'

'तुम्ही अगदींच मूर्ख आहांत.' ती म्हणाली, 'मी काकाबद्दल चिंता करीत नव्हतें. पण डिटेक्टिव्हाचें काम करण्याची ती पद्धत नाहीं. सर्व कांहीं शेवटच्या प्रकरणांत सांगायचें हें तुम्हांला माहीत नाहीं काय ?'

'शोभना, माझी चूक झाली खरी मी त्याबद्दल तुझी क्षमा मागतों. पण त्यांच्या कंपनीचें दिवाळें वाजणार ही गोष्ट कधींतरी उघडकीस येणारच होती.'

'ते आतां आज रात्रीं ह्यासंबंधीं चर्चा करणार आहेत.' ती नाक खडवीत म्हणाली, 'आई, बाबा, रघुनाथकाका आणि मावशी ती तिच्या घाटणीचे सर्व पैसे काकांना देण्यास तयार आहे. अर्थात् अद्याप ते तिला मिळालेले नाहींत. वडील कांहीं देणार नाहींत. कारण आई त्यांनीं चित्रपटांत भांडवल गुंतवावें म्हणून त्यांच्या मागें लागली आहे.'

'पण शोभना, मी खुनी कोण हें तुला माहीत आहे असें तूं म्हणाली होतीस. तो कोण ?'

तिनें फक्त माझ्याकडे तिरस्कारानें पाहिलें आणि मी म्हणालों, 'मी पुन्हां विसरलोंच. तें शेवटच्या प्रकरणांत सांगावयाचें, खरें ना ? पण शोभना, पण जर ती गोष्ट पोलिसांना किंवा इतर कुणाला न सांगण्याचें वचन दिलें तर ?'

'मला आणखी थोडा पुरावा हवा आहे.' ती म्हणाली, 'पण मी तें तुम्हांला सांगणार नाहीं. तुम्ही माझे मदतनीस असतां तरीहि तुम्हांला तें सांगितलें नसतें.'

'शोभना, मी तुला विनंति करणार होतों कीं तूं डिटेक्टिव्ह धनंजयांइतकी बुद्धिमान आहेस, तेव्हां मी तुझ्या हाताखालीं छोटू म्हणून काम करावें.'

'नाहीं.' ती म्हणाली, 'तुम्ही भलतेच मोठे आहांत. छोटू धनंजयांपेक्षां वयानें लहान असतो.'

माझा नाइलाज झाला होता. मी तिला म्हणालों, 'निदान मला त्या पत्राबद्दल तरी कांहीं सांगशील काय ?'

'मुळींच सांगणार नाहीं.' ती म्हणाली.

मला माझ्या वडिलांच्या सल्ल्याची आठवण झाली आणि म्हणालों, 'शोभना, मी तुला एक गंमत म्हणून सांगत होतों. ते रें म्हटलें तर तुला कांहीं माहितीच नाहीं.'

ती थोडी रागावली. ती माझें आव्हान स्वीकारील असें वाटलें. पण तिनें लागलीच स्वतःला सावरलें आणि पुन्हां तिची चर्या निर्विकार

दिसूं लागली.

'मला आतां घरांत गेलेंच पाहिजे. मला सुचित्राला शोधून काढावयाचें आहे.' मी म्हणालों, 'तूंहि माझ्याबरोबर चल.'

'नाही. मी येथेंच रहाणार.'

'तूं येथें रहाणार नाहींस. तुला माझ्याबरोबर आलेंच पाहिजे.' मी म्हणालों.

आणि मी तिला अचानक दोन्ही हातांनीं वर उचललें. तिला त्या गोष्टीचें आश्चर्य वाटलें. ती धडपडही करणार होती. पण नंतर तिनें गडबड केली नाहीं. माझी खात्री होती कीं, त्या धूर्त मुलीनें मी तेथें पुन्हां आलों त्या गोष्टीचा इतरांवर काय परिणाम होतो ते पहाण्याचें ठरविलें होतें.

तिनें माझ्याबरोबर असावें असें मी कां ठरविलें होतें तें त्यावेळीं तरी मला समजलें नव्हतें. मी तिच्यासह पुढल्या दारानें आंत जात असतांना माझ्या त्या लक्षांत आलें होतें. मी तिला वर उचललें त्यावेळींच आमच्या पाठीमागें पाचोळा तुडविण्याचा आवाज झाला होता

० ० ०

९ : कुटुंबांतील मंडळींची चर्चा !

पलीकडच्या मोठ्या दिवाणखान्यांतून अनेकांच्या बोलण्याची कुजबुज बाहेर एकूं येत होती. मी घुटमळलों, पण आंत गेलों नाहीं. मी पलीकडच्या दाराकडे गेलों आणि तें उघडलें. समोरच्या वाटेंत काळोख होता. पण एकाएकीं दार उघडलें जाऊन मला प्रकाशित स्वयंपाकघर दिसलें

त्या दारांत एक वृद्ध पण शरीरानें बरीच जाडजूड अशी स्त्री उभी होती. तिनें माझ्याकडे पाहिलें आणि तिच्या दृष्टीवरूनच सर्व कांहीं व्यवस्थित आहे हें मला समजलें. ती स्त्री सुस्वभावी दिसत होती आणि जरी माझें वय पस्तीस वर्षांचें होतें तरी एखाद्या चार वर्षांच्या लहान मुलाकडे पहावें तशी ती माझ्याकडे पहात होती. त्या सुमंतलालच्या स्वयंपाकिणीनें मला हयापूर्वी कधींच पाहिलें नव्हतें. पण तिनें मला लागलीच ओळखलें होतें.

'आपण सूर्यकांत ना ? स्वयंपाकघरांत या म्हणजे मी तुम्हांला चहा देतें.' ती म्हणाली.

ती बरीच मोठी आणि व्यवस्थित जागा होती. मी मध्यभागीं असलेल्या टेबलाजवळ बसलों आणि नानीनें माझ्या पुढ्यांत चहा आणि कांहीं बिस्किटें ठेवली. सर्व कांहीं ठीक दिसत होतें. आतां मला संक-

टाचा अंधार किंवा अज्ञात घटनांची भीति दिसत नव्हती.

'तुम्ही आलांत म्हणून सुचित्राला फार आनंद होईल.' वृद्ध नानी म्हणाली, 'ती अस्वस्थ झालेली दिसते पण येथील सर्वच मंडळी अस्वस्थ झाली आहेत.'

मी माझ्या पाठीमागें पाहिलें आणि नंतर विचारलें, 'शोभना कुठें आहे? ती तर माझ्याबरोबरच आंत आली होती.'

नानी तोंडानें चुक्चुक् करीत म्हणाली, 'ती दाराला कान लावून ऐकत असतें आणि तिच्याजवळ असलेल्या वहींत कांहींतरी लिहीत असते. खरें म्हटलें तर तिला शाळेंत पाठवायला हवें होतें आणि तिच्या वयाच्या मुलामुलींत मिसळण्याची संधि मिळायला हवी होती. पण ती घरांतच शिकली तर जास्त चांगलें असें त्या मालकाचें मत आहे.'

'मला वाटतें मालकाचें तिच्यावर प्रेम असेल.' मी म्हणालों.

'त्यांचें सर्वांवरच प्रेम होतें. मी वृद्ध सुमंतलालांना मालक म्हणतें.' नानी म्हणाली.

मी कांहीं बोलण्यापूर्वीच दार उघडून सुचित्रा आंत आली. 'कोण, सूर्यकांत!' ती म्हणाली, 'नानी, हे आले म्हणून मला फार आनंद होतो.'

'तें मला माहीत आहे.' नानी माझ्या पुढ्यांतील चहापानाची पात्रें उचलीत म्हणाली. नंतर ती बाजूच्या न्हाणीघरांत गेली व तिनें मधलें दार बंद केलें.

मी सुचित्राला जवळ ओढलें आणि विचारलें, 'तूं तर घरथरत आहेस. काय झालें?'

'मला फार भीति वाटते.' ती म्हणाली.

'तुझी जर येथून बाहेर पडण्याची तयारी असेल—'

'नाहीं, तें अशक्य आहे.' ती म्हणाली, 'ह्या प्रकरणाचा शेवट होईपर्यंत आपण थांबलें पाहिजे पण मला हें आवडत नाहीं. मी ज्यांच्याबरोबर रहातें, ज्यांना पहातें आणि ज्यांच्याशीं बोलतें त्यांच्यांतीलच कुणीतरी विषप्रयोग करणारा खुनी आहे ही कल्पनाच भयंकर आहे. जर तें समजलें असतें—'

'तीच तर पंचाईत आहे.' मी म्हणालों.

'मला कसली भीति वाटतें. तें तुम्हांला समजतें ना? सत्य कधींच समजणार नाहीं अशी मला भीति वाटते.'

तिचें तें म्हणणें चुकीचें नव्हतें वृद्ध सुमंतलालांचा खून कुणी केला हें गूढ कधींच उकललें जाणार नाहीं अशी शक्यता दिसत होती. तिचें बोलणें ऐकून मला एका गोष्टीची आठवण झाली.

'सुचित्रा, ह्या घरांतील किती माणसांना इसरीनची माहिती असावी ?' मी विचारलें. 'तुझे आजोबा इसरीन जवळ बाळगतात आणि तें जास्त प्रमाणांत शरीरांत मिनलें तर माणसाला मृत्यु येईल हें कुणाला माहीत असणार ?'

'मी ह्या तुमच्या प्रश्नाचा रोख समजलें.' ती म्हणाली, 'पण त्या प्रश्नांत कांहीं अर्थ नाही. आम्हां सर्वांनाच ती माहिती आहे. आजोबांना आपल्या घरांतील सर्व मंडळी आजूबाजूला असणें आवडत असे. एके दिवशीं आम्ही सर्व कॉफीपान करीत होतों आणि आजोबांना डोळ्यांचा फार त्रास होता. त्यावेळीं बिंदा उठली आणि तिनें इसरीनचा एकेक थेंब त्यांच्या डोळ्यांत घातला.

'आमच्या शोभनाला प्रत्येक गोष्टीची चौकशी करण्याची संवय आहे.' ती म्हणाली, 'ह्या बाटलीवर डोळ्यांत घालण्याचें औषध-तें पोटांत घेऊं नये असें कां लिहिलें आहे ?' आजोबा, तुम्ही हें औषध पिऊन टाकलेंत तर काय घडेल ? आणि ते हंसून म्हणाले, 'जर ह्या बिंदानें चुकीनें एखादे दिवशी इन्सुलीन ऐवजीं इसरीनचें इंजक्शन दिलें तर मी मरेन. कारण माझें हृदय फार मजबूत नाहीं. तेव्हां आपण त्या संबंधीं फार काळजी घ्यायला हवी. आणि इंजेक्शनच्या बाबतींत बिंदाची कांहीं चूक होणार नाहीं ह्याकडे लक्ष दिलें पाहिजे. आजोबांचें हें बोलणें आम्ही घरांतील सर्व मंडळींनीं ऐकलें आहे. तुमच्या लक्षांत आलें ना ?'

माझ्या तें लक्षांत आलें होतें वृद्ध सुमंतलालांनीं आपला खून कसा करतां येईल हें जणुकाय सर्वच मंडळींना सांगितलें होतें. खुनी माणसाला त्या संबंधीची योजना आंखण्याची गरजच नव्हती. आजोबांनींच अगदीं सोपा उपाय सर्वांना कळविला होता. मी दीर्घ निःश्वास सोडला.

सुचित्रानें माझ्या मनांतील विचार ओळखला असावा. ती म्हणाली, 'होय, तसें आहे खरें ! पण त्यावरूनच हें काम बिंदाचें असावें असें वाटत नाहीं जें सर्वांना माहीत आहे तें ती कधींच करणार नाहीं.'

'म्हणजे बिंदा खुनी असणें तुम्हांला पसंत नाहीं, असेंच ना ?'

मला तें पसंतच नव्हतें. त्या घरांतील सर्वच मंडळी तिचा द्वेष करीत होती. ती असहाय्य स्त्री आहे असें मला वाटत होतें. कदाचित् त्यामुळेंच मला तिच्याबद्दल सहानुभूति वाटत असावी.

नानी बाजूच्या खोलींतून बाहेर आली आणि आम्हां दोघांकडे पहात म्हणाली, 'खुनाबद्दल किंवा तशाच प्रकारच्या गोष्टीबद्दल सारखें बोलणें चांगलें नाहीं. तें पोलिसांचें काम आहे. तुम्ही तें त्यांच्यावरच सोपवावें.'

'पण नानी, ह्या घरांतील कुणीतरी खुनी आहे हें तुझ्या लक्षांत येत नाहीं काय ?'

'सुचित्रा, हें तुझें बोलणें चुकीचें आहे.' नानी म्हणाली, 'ह्या घराचें पुढलें दार आणि इतर दारेंहि सदासर्वकाळ उघडी असतात. कुणीहि चार सहज आंत येऊं शकेल.'

'नानी, चोर आला तर चोरी करील. तो घरांतील कुणावर विषप्रयोग करणार नाहीं.' सुचित्रा म्हणाली.

'मी चोराबद्दल म्हणत नाहीं. दार उघडें असतें तें सांगतें. बाहेरचा कुणीहि माणूस आंत येऊं शकेल. मला विचारशील तर हें कम्युनिस्टांचें काम आहे.'

'पण कम्युनिस्ट माझ्या आजोबांचा खून कां करतील ?'

'जें कांहीं घडेल त्याच्या बुडाशीं कम्युनिस्ट असतात असें आपण वर्तमानपत्रांत वाचीत नाहीं काय ?' नानीने उलट विचारलें, आणि जणुकाय आपण तें कोडे सोडविलें अशा प्रकारें मान हलवीत पुन्हां ती बाजूच्या खोलींत गेली आणि आम्ही दोघेहि हंसलों

'आतां तुम्ही दिवाणखान्यांत चला. तेथें कुटुंबातील मंडळी चर्चेसाठीं जमा झाली आहेत तुम्हांला जर ह्या कुटुंबातील एका मुलीशी लग्न करायचें असलें तर ती सर्व मंडळीं कशी आहेत हें तुम्हांला पहाणें आवश्यक आहे.'

'बैठक कशाबद्दल आहे ?' मी विचारलें.

'रघुनाथकाकांच्या व्यवहाराबद्दल. तुम्ही त्यांत आधींच अडकला आहांत. रघुनाथकाकानीं आजोबांचा खून केला असें तुम्हांला वाटत असलें तर तुम्हांला वेड लागलें आहे असें मला वाटल. काकाचें आजोबांवर अतिशय प्रेम होतें.'

'मला रघुनाथरावांबद्दल तसें वाटलें नाहीं. पण त्यांच्या बायकोचें तें काम असावें असें मला वाटलें.'

'कारण ती कल्पना मीच तुमच्या डोक्यांत भरविली. काकांचे सर्व पैसे नाहीसे झाले तरी काकीला त्याबद्दल मुळींच वाईट वाटणार नाहीं मला तर वाटतें कंपनीचे दिवाळें वाजणार म्हणून काकी मनांतून खूष झाली असणार ती श्रीमंतीच्या विरुद्ध आहे.'

आम्ही दिवाणखान्यांत गेलों आणि त्याबरोबर बोलणाऱ्यांनीं आपलें बोलणें अचानक थांबविलें आणि सर्वजण माझ्याकडे पाहूं लागले. सर्वच मंडळी तेथे होती. शेषनाथ खिडकीजवळच्या एका आरामखुर्चीवर बसला होता. त्याचा सुंदर चेहरा एखाद्या शिक्षा देण्यांत येत असलेल्या न्यायाधिशाच्या मुद्रेप्रमाणें गंभीर होता.

त्याच्या पलीकडच्या खुर्चीवर रघुनाथची बायको बसली होती आणि ती निर्विकार मुद्रेनें समोरच्या भिंतीचें निरीक्षण करीत होती.

सुनेत्रा शिवणकाम करीत होती. तिनें आपले ओंठ घट्ट आवळले होते. चित्रमालेनें सर्वांत सुंदर पेहेराव केला होता आणि तिच्याजवळच सुधीर कपाळावर आठ्या चढवून बसला होता.

शेषनाथ कपाळावर आठ्या चढवून म्हणाला, 'सुचित्रा, मला माफ कर पण आपण कौटुंबिक गोष्टीबद्दल चर्चा करीत आहोंत आणि ती चर्चा अत्यंत खाजगी स्वरूपाची आहे.'

मावशीनें माझ्याकडे पाहिलें आणि मी सर्वांचीच क्षमा मागून तेथून निघून जाण्याचें ठरविलें. पण त्यापूर्वीच सुचित्रा स्पष्ट आणि निश्चयी स्वरांत म्हणाली, 'सूर्यकांत आणि मी लग्न करणार आहोंत.'

'ते असले म्हणून बिघडतें कुठें?' रघुनाथ मोठ्यानें म्हणाला, 'शेषनाथ, ह्यांत खाजगी असें कांहींच नाही. उद्यां किंवा परवां ती गोष्ट जगजाहीर होणार आहे. शिवाय सूर्यकांत परवां सी. आय् डी. ऑफिसांत होते. त्यांना तें सर्व माहितच आहे.'

'तुम्ही तेथें होतां?' कपाळावर आठ्या चढवून शेषनाथनें विचारलें, 'पण बरोबर आहे. तुमचे वडीलच...'

मला तेथें रहावेंसें वाटत नव्हतें पण सुचित्रानें माझा हात घट्ट पकडून ठेवला होता. तिच्या काकीनें एक खुर्ची पुढें सरकविली आणि ती म्हणाली, 'बसा सूर्यकांत.'

मी कृतज्ञतेने तिच्याकडे पाहिलें आणि बसलों. आणि मावशीनें मध्येंच स्थगित झालेली चर्चा पुढें चालविली. ती म्हणाली, 'आपण सर्वांनींच सुमंतलालांच्या इच्छेचा मान राखला पाहिजे. माझ्यापुरतें तरी मी असें सांगेन कीं मला जे पैसे मिळणार असतील ते सर्व रघुनाथला देण्यास मी तयार आहें मला त्या पैशांतील एक पैहि नको.'

'त्यांना ते पैसे नकोतच!' त्याची बायको म्हणाली.

'शिवाय मृत्युपत्राची भानगड संपली कीं भावोजींना स्वतःच्या वांटणीचे पैसे मिळणारच.'

'ते पैसे मिळतीलच असें सांगतां येणार नाहीं आणि ते मिळालेच तर फार उशिरां मिळतील.' शेषनाथ म्हणाला.

'शेषनाथनें सांगितलें तें अगदीं बरोबर आहे.' रघुनाथ म्हणाला, 'कंपनीचें दिवाळें कुणीहि थांबवूं शकणार नाहीं. बाबा आतां हयात नाहींत आणि त्यांना जाऊन दोन दिवस लोटलें नाहींत तोंच आपण त्यांनीं मिळविलेल्या पैशांबद्दल चर्चा करीत आहोंत! मला वाटतें आपण ही चर्चा बंद करावी. मला कुणीहि मदत करूं शकणार नाहीं. जें घडेल त्याचा परिणाम भोगण्यास मी तयार आहें.'

'पण हा आमच्या अब्रूचा प्रश्न आहे.' शेषनाथ म्हणाला, 'आपण

बाबांच्या प्रतिष्ठेचाहि विचार करायला हवा.'

'तें म्हणणें बरोबर नाहीं. कंपनीशीं ह्या कुटुंबांतील कुणाचाहि संबंध नाहीं. ती जबाबदारी सर्वस्वी माझी आहे.

माझशी उभी राहिली आणि म्हणाली, 'मला वाटतें आतांपर्यंत आपण भरपूर चर्चा केली आहे.'

ती बैठक समाप्त झाली. रघुनाथची बायको खिडकीजवळ उभी होती. मी तिच्याकडे गेलों तेव्हां ती म्हणाली, 'चर्चा संपली त्याबद्दल मी ईश्वराचे आभार मानतें. जणुं काय येथें एक नाटक चाललें होतें आणि त्यांत चित्रमाला मुख्य नायिकेची भूमिका करीत होती.'

ती कांहीं क्षण स्तब्ध उभी राहिली. नंतर पुढें म्हणाली, 'आम्ही एकदांचे यांतून सुटलों तें फार चांगले झालें. ह्या व्यवहारात पडल्यामुळें हे कित्येक वर्षं कष्टी होते. त्यांच्यात व्यापारीबुद्धि नाहींच. पण त्यांचें आपल्या वडिलांवर फार प्रेम होतें. सर्वच त्या म्हातारड्यावर प्रेम करीत होते आणि तीच ह्या कुटुंबांतील वाईट गोष्ट आहे. म्हातारा जुलमी आणि त्रासदायक होता असें मी म्हणत नाहीं. पण त्यानें ह्या सर्वांना खूपच पैसे आणि स्वातंत्र्य दिलें होतें त्याचें त्या सर्वांवर प्रेम होतें आणि त्यामुळें ही सर्व मंडळीहि त्याच्यावर प्रेम करीत होती.'

'पण त्यांत कांहीं चूक आहे असें तुम्हांला वाटतें काय?' मीं विचारलें.

'अर्थातच. मुलें मोठीं झाल्यावर त्यांनीं लगेच त्यांना स्वतःपासून दूर करायला हवें. त्यामुळें मुलें स्वतंत्र बुद्धीनें कांहीं करूं शकतात. येथें तर म्हाताऱ्याच्या शब्दाखेरीज कांहीहि हालत नाहीं आणि हें तर आपल्या वडिलांना देवासारखें मानीत. ह्यांनींच पैशाकरितां आपल्या बापाचा खून केला असें तुम्ही पोलिसांना सुचविलेंत. तुम्ही ती केवढी मोठी चूक केलीत हे तुमच्या लक्षांत आलें नसेल!'

'तें आतां माझ्या लक्षांत आलें आहे.'

'कंपनी बंद होणार असें जेव्हां ह्यांना दिसलें तेव्हां ह्यांचें मनांतून अतिशय समाधान झालें. फक्त आपल्या वडिलांना काय वाटेल एवढीच त्यांना चिंता वाटत होती. आम्ही येथून निघून जाऊन नव्या जीवनाची सुरुवात करणार होतों.'

'तुम्हीं कुठें जाणार होतां?' मी विचारलें.

'आम्हीं मराठवाड्यांत जाणार होतों. माझा एक चुलतभाऊ कांहीं दिवसांपूर्वी मरण पावला आणि त्यानें आपली छोटीशी इस्टेट माझ्यासाठीं मागें ठेवली आहे. त्यांत विशेष दम नाहीं. पण बाहेरगांवीं जाण्यासाठीं ती एक जागा आम्हांला आहे. मला श्रीमंती नको आणि

फक्त शांतता हवी. मला पैसे आवडत नाहींत. मी कुणाचाहि पैशांसाठीं खून करणार नाहीं हें आतां तुमच्या लक्षांत आलें असेलच.'

'तुम्हांला स्वतःसाठीं पैसे नकोत. पण पैशानें चांगल्या गोष्टी करतां येतात. उदा० रपूर पैसे जवळ असले तर तुम्हांला चांगलें संशोधन करतां येईल.'

माझी कल्पना होती कीं तिला आपल्या संशोधनाचें भारी वेड असेल, पण ती म्हणाली, 'सारखें संशोधन करीत रहाणें हें कांहीं माझ्या आयुष्यांतील ध्येय नाहीं.'

'म्हणजे तुम्ही संशोधनाचें सर्व कार्य सोडून मराठवाड्यांत जाणार होतां ?'

'होय, आतांहि पोलिसांनीं आम्हांला जाऊं दिलें कीं आम्हीं तेथें जाणारच आहोंत. ही सर्व भानगड लवकर मिटावी आणि आम्हांला येथून जाण्याची लवकर संधि मिळावी अशी माझी फार इच्छा आहे.'

'पण हें काम कुणाचें असावें ह्याची तुम्हांला कांहींच कल्पना नाहीं काय ?' मी विचारलें, 'तुम्ही बुद्धिमान आहांत तेव्हां तुमचा कांही तर्क असणारच ?'

'नुसते तर्क करणें हें अशास्त्रीय आहे.' ती म्हणाली, 'फक्त एवढें म्हणतां येईल कीं बिंदा आणि माधव ह्या जोडीचें तें काम असूं शकेल.'

'तुम्हांलाहि त्यांचा संशय येतो तर ?' मी म्हणालों.

ती कांहीं बोलली नाहीं. तिनें फक्त खांदे उडविले आणि ती तेथून निघून गेली. त्याचवेळीं मावशी माझ्याजवळ आली आणि म्हणाली, 'मला तुमच्याबरोबर बोलावयाचें आहे.'

खूनी माणसाला दुसऱ्याजवळ बोलण्याची आतुरता असते हें वडिलांचे शब्द मला आठवत होते. मी कांहीं बोलण्यापूर्वीच मावशी म्हणाली, 'तुमचे कांहीं गैरसमज झाले नसावेत अशी मला आशा वाटते. विशेषतः शेषनाथाबद्दल तुमचा भलताच ग्रह होऊं नये तो पैशांच्या बाबतींत कंजूष नाहीं. त्याचेंहि आपल्या वडिलांवर अतिशय प्रेम होतें. पण आपणापेक्षां रघुनाथच जास्त आवडता आहे हें पाहिल्यानंतर त्यानें आपलें लक्ष लेखनावर आणि वाचनावर केंद्रित केलें.'

मी कांहींच बोललों नाहीं आणि मावशी पुढें म्हणाली, 'मला वाटलें त्याला रघुनाथबद्दल मत्सरहि वाटत असावा आणि त्याचे दिवाळें वाजणार म्हणून त्याला दुःखहि होणार नाहीं.'

'म्हणजे त्यांना आनंद होईल असें तुम्हांला म्हणावयाचें आहे काय ?'

'होय.' मावशी म्हणाली, 'जेव्हां त्यानें आपल्या भावाला ताबड-

तोब मदत करण्याची तयारी दाखविली नाहीं तेव्हां मला फार दुःख झालें होतें.'

'पण त्यांनीं मदत कां करावी ?' मीं विचारलें, 'रघुनाथराव कांहीं लहान नाहींत. त्यांनीं जो गोंधळ माजविला तो स्वतःच निस्तरायला हवा. मला असें वाटतें कीं स्वतःच्या हिंमतीवर नव्या जीवनाची सुरुवात करणें त्यांनाहि आवडेल.'

'त्याला तें आवडेल कारण, तें त्याच्या बायकोला आवडणार आहे' मावशी म्हणाली, 'ती फार विलक्षण स्त्री आहे. तिला भविष्यकाळाची किंमत नाहीं भूतकाळ ती विसरली आहे आणि तिला सौन्दर्यदृष्टीहि नाहीं. मावशी आपली भेदक नजर माझ्यावर रोखून पुढें म्हणाली, 'सुचित्रावर ह्या गोष्टीचा परिणाम झाला आहे त्याबद्दल मला वाईट वाटतें. माझें सर्वांवरच प्रेम आहे. रघुनाथ आणि शेषनाथ ह्या दोघांवरहि मी प्रेम करतें. सुचित्रा, सुनेत्रा आणि शोभना हीं जरी त्या नटव्या चित्रमालेचीं मलें असलीं तरी तींहि मला आवडतात.'

मावशी निघून गेल्यानंतर सुचित्रा माझ्याजवळ येऊन उभी राहिली. बराच वेळ दोघींहि कांहीं न बोलतां बाहेरच्या बागेकडे पहात होत्या. आतां घरांत आणि बाहेर अंधार पसरला होता. तेवढ्यांत चित्रमाला घाईघाईनें तेथें आली आणि तिनें प्रथम दिवे लावले. नंतर ती अगदीं व्यवस्थित तेथल्या कोचावर बसली.

'आमचे भावोजी कांहीं वाईट नाहींत.' ती माझ्याकडे पहात म्हणाली, 'मावशींनीं त्यांना आपल्या वांटणीचे सर्व पैसे देऊं केले. हा मनाचा केवढा मोठा उदारपणा होता ! खरें म्हटलें तर ह्या विषयावर एक चित्रपट काढायला हवा.'

'पण मावशींना सुमंतलाल आवडत नव्हते.' मी म्हणालों.

'भलतेंच ! तिचें तर त्यांच्यावर प्रेम होतें. माझी खात्री आहे कीं जर मामंजींनीं संधि दिली असती तर मावशींनीं त्यांच्याबरोबर लग्नहि केलें असतें.'

'आई ऽऽ !' सुचित्रा मोठ्यानें म्हणाली.

'हें बघ, तूं मला नेहमींच शहाणपणा शिकवण्याचा प्रयत्न करूं नकोस ! तुला ह्या असल्या गोष्टींत कांहीं समजत नाहीं.'

'पण आपण सुमंतलालांचा नेहमींच तिरस्कार करीत होतों असें मावशींनींच मला सांगितलें आहे.' मी म्हणालों.

'ती प्रथम येथें आली तेव्हां तिला तसें वाटत असेल. आपल्या बहिणीनें तसल्या माणसाबरोबर लग्न करावें हें तिला आवडलें नव्हतें. पण नंतर मुलांना सांभाळण्यांत ती तें सर्व विसरली होती. मामंजींनीं

बिन्दाबरोबर दुसरें लग्न केलें हें तिला तर मुळींच पसंत नव्हतें.'

'ते तुला आणि बाबांनाहि पसंत नव्हतें.' सुचित्रा म्हणाली.

'आम्हांलाहि पसंत नव्हतेंच. पण मावशी त्या लग्नाच्या जास्त विरुद्ध होती.' नंतर चित्रमाला अचानक विषय बदलून म्हणाली, 'शोभनानें शाळेंत जावें असा आम्हां निर्णय घेतला आहे.'

'शोभना आणि शाळेंत ?' सुचित्रानें आश्चर्यानें विचारलें.

'होय. मी उद्यांच ती व्यवस्था करणार आहें. मी तिला पांचगणी येथील बोर्डिंगमध्यें ठेवणार आहें. तिला तिच्यावयाच्या असणाऱ्या मुलांत मिसळण्याची सवय झाली पाहिजे. मला तसें नेहमींच वाटत होतें.'

'पण आजोबा त्या विरुद्ध होते.' सुचित्रा म्हणाली.

'आम्हीं सर्व त्यांच्या नजरेखालीं असावें असें त्यांना वाटत होतें. म्हातारी माणसें फार स्वार्थी असतात. पण मी तिला ह्या आठवड्यांतच पांचगणीला पाठविणार आहे.'

आणि सुचित्राची आई आली होती त्याच वेगानें तेथून निघूनहि गेली.

'आमच्या आईचें सर्वच कांहीं और आहे. सुचित्रा म्हणाली, 'तिच्या मनांत अचानक कल्पना येतात आणि त्यांची अंमलबजावणी करण्यासाठीं ती लागलीच धांवपळ सुरू करते. शोभनाला इतक्या घाई घाईनें बाहेर कां पाठविण्यांत यावें तें लक्षांत येत नाहीं.'

'पण शोभनाला शाळेंत पाठविण्याची कल्पना कांहीं वाईट नाहीं.'

'पण आजोबांना ते पसंत नव्हतें.' ती हट्टानें म्हणाली.

मला थोडी चीड आली. मी म्हणालों, 'सुचित्रा, ऐंशी वर्षांपेक्षां जास्त वय असणाऱ्या एका वृद्ध माणसाला ह्या असल्या गोष्टींत काय समजणार ?'

'ह्या घरांतील कुणाहिपेक्षां माझ्या आजोबांना जास्त समजत होतें.' ती म्हणाली.

'म्हणजे मावशीपेक्षांहि ?' मी विचारलें.

'नाहीं. मुलांनीं शाळेंत जावें असेंच मावशीचें मत आहे. शोभनाची अलीकडची वागणूक चांगली नाहीं हें मीहि कबूल करतें. तिला आडून ऐकण्याची फार वाईट सवय जडली आहे पण केवळ ती आपण फार मोठे डिटेक्टिव्ह आहोंत असें समजतें म्हणून.'

मी मनांत विचार करीत होतों कीं सुचित्राच्या आईनें शोभनाबाबत इतक्या घाईघाईनें जो निर्णय घेतला होता तो केवळ तिला शोभनाच्या हिताबद्दल फक्त चिंता वाटत आहे म्हणूनच असेल काय ? शोभनाला त्या घरांतील अनेक गोष्टी माहीत होत्या. शाळेच्या चांगल्या वातावर-

णांत ती राहिल्यानें तिच्यांत चांगला बदल होणार होता हें मलाहि मान्य होतें पण तो निर्णय इतक्या घाईघाईनें कां घेण्यांत यावा ? त्या मुलीला ह्या घरापासून शक्य तितक्या दूर पाठवावें हा एकच हेतु त्या निर्णयामागें नसेल ना ?

० ० ०

१० शिष्य आणि शिक्षक !

माझे वडील म्हणाले होते, त्यांना तुझ्याशीं खरं बोलूं दे.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी दाढी करीत असतांना विचार करीत होतों कीं त्यामुळें माझी किती प्रगति झाली आहे मावशी मला पुष्कळ गोष्टी माझ्याबरोबर बोलली होती. रघुनाथची बायको बोलली होती पण खरें म्हटलें तर मीच तिच्याबरोबर बोललों होतों. चित्रमाला बोलली होती, पण मी जणुं काय तिच्या प्रेक्षकांपैकीं एक आहें, अशा प्रकारचें तें बोलणें होतें. सुचित्रा माझ्याबरोबर बोलली होती. इतकेंच नव्हे तर नानीनेंहि मला कांहीं गोष्टी सांगितल्या होत्या, पण ह्यामुळें माझ्या माहितींत कांहीं भर पडली होती काय ? तशी भर पडली असावी असें मला वाटत नव्हतें.

फक्त एकाच माणसानें कोणत्याहि विषयासंबंधीं माझ्याबरोबर बोलण्याची इच्छा प्रदर्शित केली नव्हती आणि तो म्हणजे शेषनाथ. तें एक प्रकारें चमत्कारिक नव्हतें काय ? त्याच्या मुलीबरोबर लग्न करण्याचा माझा विचार आहे हें त्याला आतांपर्यंत समजलेंच असणार. तरीहि मी जणुं काय त्या घरांतच नाहीं अशाप्रकारें तो वागत होता. बहुधा मी तेथें आलों हें त्याला पसंत नसावें मावशीनें त्याबद्दल रद्दबदली केली होती. शेषनाथाची ती वागण्याची पद्धतच आहे असें ती म्हणाली होती. तिनें शेषनाथबद्दल आत्मीयता दाखविली होती ती कां ?

मी सुचित्राच्या वडिलांबद्दल विचार करीत होतों. तो मत्सरी वृत्तीचा होता. सुरुवातीपासूनच त्याला मागें ढकलण्यांत आलें होतें आणि त्यामुळें त्यानें जुन्या इतिहासाचा आश्रय घेतला होता. पण त्याला भरपूर पैसे मिळाले नव्हते म्हणून त्यानेंच आपल्या वडिलांचा खून केला असावा असें मला वाटत नव्हतें. पण बाप मरावा असें त्याला वाटावें अशी शक्यता दिसत होती त्याला तसें वाटण्याचे मानसशास्त्रीय दृष्ट्या कांहींतरी कारण असावें.

तो आपल्या बापाच्या घरीं रहावयास आला होता. त्यानंतर मुंबईतील रहातें घर कोसळल्यामुळें रघुनाथहि तेथें रहावयास आला होता. नंतर दिवसेंदिवस तो बापाचा अधिकाधिक आवडता बनला. तें शेष

नाथला पहावें लागलें आणि त्यामुळें बापाच्या मृत्यूमुळें त्याला समाधान लाभलें असेल काय ?

आणि त्या मृत्यूमुळें वडील भावाचें नुकसान होणार असलें तर ? रघुनाथाच्या कंपनीचें दिवाळें वाजण्याच्या बेतांत होतें... वस्तऱ्यानें माझ्या हनुवटीला जखम झाली आणि मी शि ी हांसडलो 'मी हें काय करीत होतों ? सुचित्राच्या बायालाच खुनी ठरविण्याचा प्रयत्न करीत होतों ? सुचित्रानें त्यासाठींच मला तेथें बोलाविलें होतें...'

पण तेंच तर कारण नसेल ? तिनें मला तेथें येण्याची खास विनंति केली होती त्याचें कांहींतरी तसेंच कारण होतें, ह्यांत शंका नव्हती. आपले वडील गुन्हेगार असावेत असा जर तिच्या मनांत संशय असला आणि जर तो संशय यदाकदाचित् खरा ठरला तर ती माझ्याबरोबर लग्न करण्यास तयार होणार नव्हती.

सुचित्रा शूर होती विचारी होती तिला सत्य हवें होतें. तिच्या आजोबांच्या मृत्यूचें गूढ जर उकललें गेलें नाहीं तर आम्हां दोघांमध्यें नेहमींच संशयाचा पडदा उभा राहिला जाणार होता. तिला सत्य हवें होतें. तें सत्य कोणत्याहि प्रकारचें असलें तरी त्याला तोंड देण्यास ती तयार होती आणि तिच्याइतकाच माझ्याहि दृष्टीनें तो प्रश्न महत्त्वाचा असल्यामुळें तिनें मलाहि तेथें बोलाविलें होतें.

शेषनाथ अपराधी असावा असा मावशीलाहि संशय असेल काय ? कुणाचा संशय येतो असें जेव्हां मीं त्याच्या बायकोला विचारलें, तेव्हां तिनें माझ्याकडे विशिष्ट नजरेनें पाहिलें होतें आणि बिंदा व माधव यांच्यावर सर्वांचाच संशय आहे ना ? असें मला उलट विचारलें होतें बिंदा आणि माधव ह्यांच्यापैकीं कुणी अपराधी असावा असें मानावयास त्या कुटुंबांतील सर्वच मंडळी उत्सुक होती. अर्थात् त्या सर्व मंडळींना जें वाटत होतें, तें खोटें ठरण्याचा आणि बिंदा व माधव खरोखरच अपराधी असल्याचाहि संभव होताच.

तें काम बिंदाचें नसून माधवचें आहे असें ठरलें तर तें सर्वांना जास्तच आवडणार होतें. मी जेव्हां दाढी आटोपून न्याहारी करण्यासाठीं तळमजल्यावर जावयास निघालों तेव्हां शक्य तितक्या लवकर माधवाची मुलाखत घेण्याचें ठरविलें होतें मी कॉफीचा प्याला उचलला आणि त्यावेळीं ह्या वांकड्या घराचा माझ्यावरहि परिणाम होऊं लागला आहे ह्याची मला जाणीव झाली. मलासुद्धां त्या कोड्याचें सत्य उत्तर नको होतें तर माझें इच्छित साध्य होईल असाच मला निर्णय हवा होता.

न्याहारीनंतर पी चौकशी केली आणि माधव शिकवणीच्या खोलींत सुधीर आणि शोभना यांना शिकवीत असणार असें मला सुचित्रानेंच

सांगितलें. तिकडे जात असतांना मी बिन्दाच्या पुढल्या दाराजवळ घुट-मळलों मी त्या दारावरील घंटी वाजवावी कीं दार ठोठावावे कीं सरळ आंत जावें ? मी असे ठरविलें कीं, तें घर कांहीं बिन्दाच्या खाजगी मालकीचें नाहीं तर तें सुमतलालांच्या सर्व कुटुंबाचें घर आहे.

मीं दार उघडलें आणि लगेच आंत प्रवेश केला. तेथें शांतता होती आणि तेथें कुणीहि दिसत नव्हतें माझ्या डाव्या बाजूला तेथल्या मोठ्या दिवाणखान्याचें दार होतें पण तें बंद होतें. माझ्या उजव्या बाजूला झोपण्याच्या खोलीचें आणि स्नानगृहाचें दार होतें ती दोन्ही दारें उघडी होतीं नंतर मला आठवण झाली कीं सुमंतलालांच्या झोपण्याच्या खोलीच्या शजारच्या स्नानगृहाच्या फडताळांतच इन्सुलीन आणि इसरीन हीं दोन्ही ॲसिडे ठेवण्यात आलीं होतीं.

पोलिसांच्या तपासणीचें काम आतांपर्यंत संपलेंच असणार. दार अधिक उघडून मी स्नानगृहांत शिरलों बाहेरच्या माणसाला त्या ठिकाणीं प्रवेश करणें किती सोपें आहे, हें त्यावेळीं माझ्या लक्षांत आलें. तें स्नानगृह आटोपशीर होतें. एका बाजूच्या भिंतींत एक फडताळ होतें. मी तें उघडलें. आंत औषध होतीं. एका खणांत इन्सुलीनचा सांठा होता आणि इंजेक्शन देण्याचें सर्व साहित्य होतें. वरच्या खणांत एक बाटली होती. रात्रीच्या वेळीं फक्त दोन गोळ्या घ्याव्या अशा सूचनेचें लेबल त्या बाटलीवर होतें. ह्याच खणांत ती इसरीनची बाटली असावी यांत शंका नव्हती. घरांतल्या किंवा बाहेरच्या कुणाहि माणसाला ती बाटली सहज सांडणार होती.

मी हळूंच त्या जागेंतून बाहेर पडलों आणि पुन्हां तळमजल्यावर गेलों. पोलिसांचें काम किती कठीण आहे, हें आतां माझ्या लक्षांत आलें होतें मी एका दाराजवळ थांबलों मला माधवच्या बोलण्याचा आवाज ऐकूं आला होता. मी जेव्हां त्या दाराला कान लावला तेव्हां इतिहासाचा धडा शिकविण्यांत येत आहे, हें मी ओळखलें आणि त्याबरोबर माधव हा उत्कृष्ट शिक्षक आहे हेंहि माझ्या लक्षांत आलें.

त्या गोष्टीचें काय आश्चर्य वाटावें, हें मला समजलें नाहीं. कारण सुमंतलालांना माणसाची अतिशय चांगली पारख होती. माधव हुषार नसता तर त्यानीं त्याची नेमणूक केली नसती

एकाएकीं माधवाचें बोलणें थांबलें खर्च्या मागें सरकविण्याचा आवाज झाला. मी त्वरेनें जिन्याजवळ गेलों. तें दार उघडलें गेलें तेव्हां मी जिना उतरून खालीं येत आहे असें भासवलें. शोभना आणि सुधीर हे दोघे बाहेर आले होते.

'नमस्ते.' मी म्हणालों.

मला पाहून सुधीरला आश्चर्य वाटलें असावें. त्यानें नम्रतेनेंच विचारलें, 'तुम्हांला कांहीं हवें आहे काय ?'

शोभनानें माझ्याकडे पाहिलेंहि नव्हतें. ती माझ्याजवळूनच पुढें निघून गेली आणि मी कांहीतरी बोलायला हवें म्हणून म्हणालों, 'मला तुमची अभ्यासाची खोली पहावयाची होती.'

'पण तुम्हीं ती. पूर्वी पाहिली आहे ना ?' सुधीर म्हणाला आणि त्यानें माझ्यासाठीं खोलीचें दार उघडलें.

मी आंत गेलों तेव्हां माधव एका टेबलाजवळ उभा होता. त्यानें वर मान करून पाहिलें. मी नमस्ते म्हणालों त्यानें पुटपुटत उत्तर दिलें व नंतर तो घाईघाईनें बाहेर निघून गेला.

सुधीर दाराजवळ उभा होता. तो म्हणाला, 'तुम्हीं त्याला घाबरविलेंत. पण ते सहजी घाबरतात.'

'सुधीर, तुला ते आवडतात काय ?'

'तसे ते बरे आहेत. पण अगदींच गाढव आहेत.' तो म्हणाला.

'पण ते वाईट शिक्षक नाहींत हें खरें ना ?'

'तसे ते चांगले शिक्षक आहेत त्यांना खूपच माहिती आहे. अनेक घटनांकडे ते तुम्हांला वेगळ्या दृष्टिकोनांतून पहावयास भाग पाडतात. संभाजी हा शिवाजी महाराजांना शोभण्यासारखाच होता, हें मला ह्यापूर्वी माहीत नव्हतें.'

आणि कांहीं क्षण आम्ही इतिहासासंबंधीं बोलत तेथेंच उभें राहिलों आणि सुधीर थोडा चिडूनच म्हणाला, 'खरें म्हटलें तर मी अकरावींत असतों. त्या शोभनासारख्या नालायक मुलीबरोबर घरांतच अभ्यास करीत बसणें हें मोठे दुर्दैव म्हटलें पाहिजे ती तर अवघी बारा वर्षांची आहे.'

'पण तुझा आणि तिचा अभ्यास एकाच प्रकारचा नसणार.' मी म्हणालों.

'नाहीं, तिला गणितासारखे विषय शिकविण्यांत येत नाहींत.' तो म्हणाला, 'पण शिकविलें तरी तिला त्यांत कांहींच समजणार नाहीं. तिला डिटेक्टिव्ह बनावयाचें आहे. ती आडून बोलणें ऐकते. आपल्या त्या काळ्या डायरींत लिहितें आणि आपणाला सर्व कांहीं माहिती आहे असें ती भासविते. ती अगदींच मूर्ख आहे.'

'मुलींना कधींच चांगलें डिटेक्टिव्ह बनतां येणार नाहीं असें मीहि तिला सांगितलें आहे.' मी म्हणालों, 'मला वाटतें तिच्या आईचेंच म्हणणें बरोबर आहे. तिची शक्य त्या त्वरेनें शाळेंत रवानगी करणेंच चांगलें. पण सुधीर, ती गेल्यामुळें तुला चुकल्यासारखें वाटणार नाहीं काय ?'

'त्या इवलाशा पोरीबद्दल मला कांहींच वाटणार नाहीं. पण मला हुया घराचाच वीट आला आहे आई सारख्या मुंबईला फेऱ्या घालीत असते आणि बाबा पुस्तकांत डोकें खुपसून बसलेले असतात. काका तर इतके मनमोकळे बोलत असतात कीं तें ऐकण्याचा कंटाळा येतो फक्त काकी बरी आहे. पण ती वेडसर असावी असें मला अधून मधून वाटतें. मावशी वाईट नाहीं, पण ती खूपच म्हातारी आहे.'

मी त्याचें तें बोलणें शांतपणें ऐकलें आणि विचारलें, 'पण तुझ्या आजोबांबद्दल काय? तुला ते आवडत नव्हते काय?'

'आजोबा हे समाजविघातक होते, नफा मिळवण्यापलीकडे त्यांना दुसरें कांहीं सुचत नव्हतें आणि ते स्वतःला फार मोठे समजणारे होते..'

माधवराव पुन्हां त्या खोलीकडे परत आल्यामुळें सुधीरचें बोलणें थांबलें होतें. माधवरावानें टेबलावरील पुस्तकें निष्कारण इकडचीं तिकडे करीत माझ्याकडे रोखून पाहिलें. नंतर तो म्हणाला, 'सुधीर, तूं बरोबर अकरा वाजतां येथें परत आलें पाहिजे. गेल्या कांहीं दिवसांत आपण आपला बराच वेळ फुकट घालविला.'

'ठीक आहे सर.' सुधीर म्हणाला व शीळ वाजवीत तेथून निघून गेला.

माधवानें पुन्हां पुस्तकांची चाळवाचाळव केली आणि खालच्या मानेनेंच मला विचारलें, 'पोलिसांचें काम कुठपर्यंत आलें आहे?'

'ते मला विश्वासांत घेत नसतात.'

'पण तुमचे वडील कमिशनर आहेत.'

'तें खरें, पण त्यामुळें ते मला सरकारी गुप्त गोष्टी सांगत नाहींत.'

'तर मग तुम्हांला कांहींच माहिती नाहीं? ते कुणाला अटक तर करणार नाहींत ना?'

'माझ्या माहितीप्रमाणें तरी तसें वडेल असें दिसत नाहीं. पण तसें कांहीं करावयाचें असेल तर त्या बाबतींत ते मला कदाचित् कांहीं सांगणार नाहींत.'

'सूर्यकांत, ह्यामुळें मनावर किती ताण पडत आहे ह्याची तुला कल्पना नाहीं ते सारखे येतात आणि जातात आणि प्रश्न विचारतात. पण त्या प्रश्नांचा ह्या प्रकरणाशीं कांहींच संबंध दिसत नाहीं. त्या इन्स्पेक्टरांनीं माझ्याबद्दल आणि बिंदाबाईंबद्दल कांहीं भलतीच कल्पना केली आहे. तें खरोखरच अयोग्य आहे. बिंदाबाई केवळ आपल्या यजमानापेक्षां बऱ्याच तरुण आहेत, म्हणून त्यांच्यासंबंधीं असें कांहीं सूचविणें अगदींच अयोग्य आहे. मला तर असें वाटूं लागलें आहे कीं, हें कारस्थानच आहे.'

'कारस्थान ?' मी विचारलें.

'होय, ह्या कुटुंबांतील मंडळींना माझ्याबद्दल कधींच सहानुभूति वाटली नव्हती आणि ते माझा तिरस्कार करतात असें दिसून आल्या मुळें मीहि त्यांच्यापासून दूरच रहात होतो. मी एक साधा शिक्षक आहें. पण त्यांच्यांतील प्रत्येकजण माझी चेष्टा करतात. कुणीतरी माझा संशय यावा अशाच प्रकारें सुमतलालाचा खून केला आहे. माझा सर्वनाश व्हावा अशी त्याची इच्छा दिसते '

'पण बिंदाबाईबद्दल काय ?' मी विचारलें

'बिंदाबाई देवता आहेत.' तो म्हणाला, 'आपल्या वयस्क नवऱ्याची त्या इतक्या इमानानें सेवाचाकरी करीत होत्या कीं त्याबद्दल कुणालाहि आश्चर्यच वाटावें तिनें त्यांच्यावर विषप्रयोग केला, असें म्हणणें हास्यास्पद आहे. त्या इन्स्पेक्टरांच्या हें कसें लक्षांत येत नाहीं ?'

'त्यांचें मन कलुषित झालें आहे ' मी म्हणालों, 'शिवाय आपल्या वयस्क नवऱ्याचा खून करणाऱ्या स्त्रिया त्यांनीं पाहिल्या आहेत.'

त्यानें एक पुस्तक उघडलें आणि तो तें वाचू लागला. तो मला आणखी कांहीं सांगणार नाहीं हें माझ्या लक्षांत आलें आणि मी तेथून बाहेर पडलों मी जिन्याकडे जात असतांना माझ्या डाव्या बाजूचें एक दार उघडलें गेलें आणि शोभना माझ्या अंगावरच कोसळली. तिचें तोंड आणि हात धुळीनें काळे बनले होते आणि तिच्या केंसांना कोळीष्टकें चिकटलीं होतीं.

'शोभना, तूं काय करीत होतीस ?' मी विचारलें.

'मी डिटेक्टिव्हाचें काम करीत होतें.' ती म्हणाली, 'मला आतां हात-पाय व तोंड धुतलें पाहिजे. मी तर म्हणतें कीं, आतां दुसऱ्या खुनाची वेळ आली आहे. तुम्हांला नाहीं तसें वाटत ?'

'दुसरा खून ? मीं आश्चर्यानें विचारलें

'होय अशा प्रकरणांत लागलीच दुसरा खून होतो असें मीं रहस्यकथेंत वाचलें आहे. ज्याला बरीच माहिती असते अशा माणसाला तो आपलें तोंड उघडील अशा भीतीनें ठार करण्यांत येत असतें '

'शोभना तूं खूपच रहस्यकथा वाचतेस, पण प्रत्यक्ष आयुष्यांत तसल्या गोष्टी घडत नसतात.' मी म्हणालों, 'आणि जर ह्या घरांतील कुणाला कांहीं माहिती असली तर ती सांगण्यासाठीं त्यांनीं पुढें यायला पाहिजे.'

मी शोभनाला तेथेंच सोडून पुढें निघालों आणि त्या जागेंतून बाहेर पडणार होतों तोंच दिवाणखान्यांतून बिंदा धाईबाईनें बाहेर पडून माझ्याजवळ आली. माधवाप्रमाणेंच तिनेंहि मला 'काय ताजी बातमी

आहे ?' असें विचारलें.

'नवीन कांहींच नाहीं.' मी म्हणालों.

तिनें दीर्घ निःश्वास सोडला आणि ती म्हणाली, 'सूर्यकांत, मी फार घाबरलें आहें.'

ती अतिशय घाबरली असावी हें तिच्या चर्येवरूनच स्पष्ट होत होतें. एका माधवाशिवाय तिच्या बाजूचें दुसरें कुणीच नव्हतें. तिला मदत करावी असें मला वाटलें. पण मदत करण्यासारखें कांहींच नव्हतें. त्यामुळेंच सुचित्रा मला म्हणाली होती कीं, बिंदानें तुमच्यावर प्रभाव पाडला आहे तिची बाजू घेण्यास सुचित्राहि तयार नव्हती.

'उद्यां दुपारीं कॉरोनर चौकशी होणार आहे. त्यावेळीं काय घडणार आहे ?' तिनें विचारलें.

'त्यावेळीं कांहीं घडणार नाहीं. तुम्हांला चिंता करण्याचें कारण नाहीं. बहुधा वर्तमानपत्रांना सर्व माहिती देण्याचा निर्णय घेतला जाईल.'

तिनें माझे आभार मानले आणि मी पुढें झालों आणि त्यावेळीं जिन्याजवळ उभी असलेली सुचित्रा मला दिसली !

'तुम्ही बराच वेळ येथे घालविला आहे.' ती म्हणाली, 'मुंबईन तुमचा टेलिफोन आला आहे. तुमच्या वडिलांना तुमच्याबरोबर बोलावयाचें आहे.'

'ठीक आहे सुचित्रा, बाबांचें काय म्हणणें आहे तें मी पहातों.'

० ० ०

११ : मृत्युपत्र आणि दुसरा खून !

माझ्या वडिलांच्या ऑफिसमधील वातावरण बरेंच तंग बनलें होतें. बाबा आपल्या खुर्चीवर बसले होते. कौशिक खिडकीला टेकून उभे होते आणि साखरदांडे समोरच्या खुर्चीवर बसले होते. ते अस्वस्थ झालेले दिसत होते.

'हें विलक्षण आहे.' ते म्हणत होते.

'अर्थात्च.' माझे वडील म्हणाले, 'सूर्यकांत, तूं वेळेवर आला आहेस. एक आश्चर्यकारक घटना घडली आहे.'

'त्या घटनेला तोडच नाहीं.' साखरदांडे म्हणाले.

मी वडिलांकडे आणि वकिलाकडे गोंधळून पाहिलें. कौशिक माझ्याकडे पाहून हंसत होते आणि माझे वडील म्हणाले, 'सूर्यकांत, हघा वकीलसाहेबांना आज सकाळीं एक विलक्षण पत्र मिळालें आहे. तें सुमंतलालांच्या एका वृद्ध मित्राचें आहे. त्या मित्रावर त्यांचा खूपच विश्वास होता असें दिसतें.'

'सुमंतलालांचा स्वभाव इतका संशयी होता असें मला कधींच वाटलें नव्हतें.' साखरदांडे म्हणाले, 'चाळीस वर्षांपेक्षां जास्त काळ मी त्यांचा कायदेशीर व्यवहार सांभाळीत आहें. खरें म्हटलें तर बरोबर सेहेचाळीस वर्षे आणि सहा महिने झाले आहेत.

कौशिक पुन्हां हंसले आणि मी विचारलें, 'काय घडलें ?'

'आपणाला आपले मित्र सुमंतलाल ह्यांनीं दिलेल्या कांहीं सूचना प्रमाणेंच आपण वागत आहोंत असें त्यांनीं त्यांच्या पत्रांत लिहिलें आहे.' माझे वडील म्हणाले, 'कांहीं वर्षांपूर्वीं सुमंतलालांनीं एक लिफाफा आपल्या मित्राकडे दिला होता आणि आपल्या मृत्यूनंतर तो साखरदांडे-कडे पाठवावा अशी सूचना दिली होती. आपण आजारी होतो आणि सुमंतलालांच्या मृत्यूची बातमी आपणाला काल समजली असें त्यांच्या त्या मित्रानें लिहिलें आहे आणि तें पत्र मिळतांच साखरदांडे येथें आले आहेत.'

'त्या लिफाफ्यांत त्यांचें एक मृत्युपत्र होतें आणि त्याबरोबरच मला उद्देशून एक पत्रहि लिहिलें होतें.' साखरदांडे म्हणाले.

'तुम्हांला हवें असलेलें मृत्युपत्र मिळालें तर !' मी म्हणालों.

'पण मी तयार केलेलें तें मृत्युपत्र नाहीं.' साखरदांडे म्हणाले, 'तें त्यांनीं स्वतःच्याच हातानें तयार केलें आहे. म्हणजे त्यांनीं मला मूर्ख ठरविलें आहे.

'साखरदांडेंनीं मला टेलिफोन करून त्या मृत्युपत्रांतील मुख्य गोष्टी सांगितल्या. मीं त्यांना सर्व कागदपत्रें घेऊन येथें बोलाविलें आणि तुला टेलिफोन केला.' माझे वडील म्हणाले.

मला त्या बैठकीला कां बोलावण्यांत आलें ह्याचा अद्याप उल-गडा झाला नव्हता. मला त्या मृत्युपत्राबद्दल योग्य वेळीं समजलें असतें. सुमंतलालांनीं आपले पैसे कुणाला आणि किती दिले ह्याच्याशीं मला कांहींच कर्तव्य नव्हतें

'ह्या वेगळ्या मृत्युपत्रामुळें इस्टेटीच्या वांटणीसंबंधीं कांहीं विशेष बदल होतो काय ?' मी विचारलें.

'अर्थातच होतो.' साखरदांडे म्हणाले, 'त्यामुळेंच तर ती माहिती पोलिसांना देणें आपलें कर्तव्य आहे असें मला वाटतें. तें मृत्युपत्र गेल्या वर्षी नोव्हेंबर महिन्याच्या एकोणीस तारखेला तयार करण्यांत आलें आहे. त्यांत सुमंतलालांनीं आपल्या बायकोला पांच लक्ष रुपये मिळावेत आणि बाकीची सर्व इस्टेट सुचित्राला मिळावी असें लिहिलें आहे.'

मला तें ऐकून धक्काच बसला. मीं विचारलें, 'त्यांनीं असें कर-ण्याचें कारण काय असावें ?'

'त्यांनीं तीं कारणें मृत्युपत्रासोबत जोडलेल्या पत्रांत लिहिलीं आहेत.' माझे वडील म्हणाले आणि त्यांनीं तें पत्र वाचण्यास सुरुवात केली.

" प्रिय साखरदांडे यांस,

'हें पत्र जेव्हां तुम्हांला मिळेल तेव्हां तुम्हांला आश्चर्य वाटेल आणि खात्रीनें रागहि येईल. पण मी अशाप्रकारें वागण्याचीं कांहीं कारणें आहेत. मी व्यक्तींच्या समूहापेक्षां त्यांतील एखाद्याच व्यक्तीला मान देत असतो, कारण अशी एखादीच व्यक्ति स्वतःच्या कर्तृत्वानें भवितव्य घडवीत असतें.

'ईश्वरानें मला दीर्घायुष्य दिलें आहे आणि त्यामुळेंच मी माझ्या कुटुंबांतील सर्व मंडळींची परीक्षा करूं शकलों आहें ती सर्व माझ्याच जवळ आहेत. ही आनंदाची गोष्ट आहे. मी जेव्हां मरेन त्यावेळीं जें ओझें मी आतांपर्यंत सांभाळलें तें सांभाळण्याची जबाबदारी दुसऱ्या कुणावर तरी पडणार आहे

'माझ्या संपत्तीची मला प्रिय असलेल्या माझ्या सर्व माणसांत समान विभागणी करावयाची कीं नाहीं ह्याबद्दल मीं बराच विचार केला आहें. पण तसें करणें योग्य नाहीं असें मी खूप विचारान्ती ठरविलें आहें. जो माझा वारस असेल त्यानें सर्व कुटुंबाची जबाबदारी सांभाळली पाहिजे.

'रघुनाथ हा माझा फार आवडता आहे. पण त्याला व्यवहाराचें ज्ञान नाहीं. माझ्या दुसऱ्या मुलाला, शेषनाथाला स्वतःबद्दलहि खात्री वाटत नाहीं. माझा नातू सुधीर हा हुषार आहे पण तो वयानें अतिशय लहान आहे. फक्त माझी नात सुचित्रा हिच्यांतच मला आवडणारे सारे गुण आहेत.

'सुचित्रा ही बुद्धिमान आहे. तिला माणसांची पारख असून ती कुणावरहि अन्याय करणारी नाहीं. ती शूर आहे, उदार आहे आणि तिचें मन पूर्वग्रहदूषित नाहीं. त्यामुळें माझ्यामागें बीच कुटुंबांतील सर्व मंडळींना चांगल्या प्रकारें सांभाळूं शकेल. सुचित्रालाच मी माझी वारस करण्याचें ठरविलें आहें. ही गोष्ट माझ्या हयातींत कुणालाहि न कळविण्याची माझी इच्छा होती. त्यामुळेंच हें मृत्युपत्र मी माझ्या एका खास मित्राच्या हातांत दिलें होतें.

'ह्या मृत्युपत्राचा कुणालाहि शेवटपर्यंत संशय येऊं नये म्हणून मी तुम्हांला एक मृत्युपत्र तयार करावयास सांगितलें होतें. मीं तें सर्वांना वाचून दाखविलें. पण साक्षीदार म्हणून त्यावर नोकरांच्या सह्या घेतांना त्यावर मीं एक वेगळाच खोटा कागद ठेवला होता आणि तो ब्लॉटिंग

पेपरनें झांकला होता

'ह्या युक्तीनें मी आणि नोकरांनीं मृत्युपत्रावर सह्या न करता एका कोऱ्या कागदावर केल्या होत्या. तुम्हीं सर्वजण, तुम्हांला अशाप्रकारें जाणूनबुजून फसविल्याबद्दल मला क्षमा करावी अशी माझी विनंति आहे तुम्ही माझी सर्व संपत्ति कायदेशीररीत्या सुचित्राच्या स्वाधीन करावी आणि तिनें माझ्यामागें माझ्या व प्रकारें सर्व कुटुंबाला सांभाळावें असें तिला सांगावे.''

त्या मृत्युपत्राखालीं सुमतलालांच्या आणि साक्षीदारांच्या सह्या होत्या. थोडया वेळानें साखरदांडे निघून गेले आणि आम्ही त्या नव्या आणि विलक्षण मृत्युपत्राबद्दल चर्चा करूं लागलों.

'सुमंतलाल हे फार लबाड होते.' कौशिक म्हणाले, 'त्यांनीं हें मृत्युपत्र एका वेगळ्या सॉलिसिटरच्या मदतीनें तयार केलें आहे. खरें म्हटलें तर आम्ही मूर्खच होतों. साखरदाडयांनीं तयार केलेल्या मृत्युपत्राची विल्हेवाट फक्त सुमंतलालनाच लावतां आली असती हें आमच्या लक्षांतच आलें नव्हतें.'

आणि मला शोभनाच्या प्रश्नाची आठवण झाली. ती म्हणाली होती कीं, 'पोलीस मूर्ख नाहींत काय?' पण तिला ह्या मृत्युपत्राची कांहीच कल्पना नव्हती. जरी ती दाराला कान लावून ऐकत असली तरी तिला आपले आजोबा काय करीत आहेत हें तर्कानें ओळखणें शक्य नव्हतें तर मग पोलिसांना मूर्ख म्हणण्याइतकें तिला काय माहीत असावें? तिला कांहीं माहिती होती कीं तो तशी बतावणी करीत होती?

'बाबा, ह्याबद्दल सुचित्राला कांहींच माहिती नव्हती. तिला हें ऐकून धक्काच बसणार आहे.' मी म्हणालों

त्याचवेळीं टेलिफोनची घंटी वाजली. माझ्या वडिलांनीं रिसीव्हर उचलून कानाला लावला व नंतर ते रिसीव्हर हातांत धरून मला म्हणाले, 'सुचित्राला तुझ्याशीं कांहीं बोलायचें आहे. आपलें काम अत्यंत तातडीचें आहे असें ती म्हणते.'

वडिलांच्या हातांतील रिसीव्हर घेऊन मी म्हणालों, 'सुचित्रा, मीच बोलत आहें.'

''आपल्या शोभनाचें कांहीं भयंकर झालें आहे!' ती घाईघाईनें म्हणाली, 'तिच्या मस्तकावर जोराचा फटका मारण्यांत आला आहे. तिची अवस्था गंभीर आहे. असें म्हणतात कीं, ती कदाचित्...'

मी दुसऱ्या दोघांकडे वळून म्हणालों, 'शोभनाच्या मस्तकावर कुणींतरी फार जोराचा प्रहार केला आहे.'

वडिलांनीं माझ्या हातांतील रिसीव्हर खेचून घेतला आणि ते रागा-

नेंच म्हणाले, 'मी तुला त्या मुलीवर नजर ठेवण्यास सांगितलें होतें...'

०　　०　　०　　०

मी कौशिकांबरोबर अतिशय वेगवान मोटारीनें जोगेश्वरीकडे जात असतांना माझ्या नजरेसमोर सारखी शोभना उभी रहात होती. दुसरा खून होण्याची वेळ आली आहे असें ती म्हणाली, तेव्हां तो दुसरा खून आपलाच होणार हें त्या बिचाऱ्या लहान मुलीला माहीत नव्हतें माझ्या वडिलांनी जो मला दोष दिला होता तो मीं स्वीकारला होता. मीं त्या मुलीवर नजर ठेवायला हवी होती. मला किंवा पोलिसांना खुनी माणसासंबंधीं कांहींच सुगावा लागला नव्हता. पण त्या मुलीला ती माहिती असणें शक्य होतें.

ती डिटेक्टिव्हगिरीचा खेळ खेळत होती. तसें करतांना ती जी माहिती मिळवीत होती त्या माहितीचें संपूर्ण महत्त्वहि तिला समजत नसावें. दुसऱ्या खेपेला आम्हीं तिला बागेंत पाहिली तेव्हां पावोळा तुडविण्याचा आवाज झाला होता. त्यापूर्वींच मला तिच्यावर संकट ओढवण्याचा संभव आहे अशी सूचना प्रत्यक्ष वडिलांकडून मिळाली होती. मी त्या वेळींच कांही हालचाल करायला हवी होती. तें खुनाचें प्रकरण होतें. खुनी माणूस आतां त्याच्या सुरक्षिततेसाठीं दुसरा खून करण्यास कचरणार नाहीं हें मला समजायला हवें होतें.

बहुधा चित्रमालेनें आपल्या मुलीला धोका आहे हें ओळखलें होतें आणि त्यामुळें तिनें तिला घरापासून दूर पांचगणी येथें अतिशय त्वरेनें पाठविण्याचा निर्णय घेतला होता.

आम्ही तेथें पोहोंचतांच सुचित्रा बाहेर आली. अंधेरी येथील हॉस्पिटलांत शोभनाला ॲम्ब्युलन्समधून नेण्यांत आलें असें तिनें सांगितलें. एक्स–रेनें फोटो घेतल्याशिवाय तिची अवस्था कितपत गंभीर आहे हें समजणार नाहीं असें डॉक्टरांनी सांगितलें होतें.

'पण तें घडलें कसें ?' कौशिकांनीं विचारलें.

सुचित्रानें आम्हांला घरापाठीमागल्या एका छोट्या अंगणांत नेलें. तेथें एक छोटी बैठी इमारत होती आणि तें दार उघडेंच होतें. ती कपडे वाळत घालण्याची जागा होती आणि त्या दाराला लोंबकळून तें झोंपाळ्या-

प्रमाणें मागें पुढें सरकविणें हा शोभनाचा आवडता खेळ होता. इमारतीची आंतली बाजू अगदीं लहान होती आणि तेथें बराचसा अंधार होता. आंत लांकडी पेटारे, जुन्या पाइपांचे तुकडे, माळयाचीं कांहीं जुनीं हत्यारें आणि मोडकें तोडकें कांहीं सामान ठेवलेलें होतें.

कौशिकांनीं त्या दाराची तपासणी केली. आपण त्या दाराला कुणालाहि स्पर्श करूं दिला नाहीं असें सुचित्रानें सांगितलें. त्यादारावर असलेल्या लांकडी कमानीवर एक भला मोठा दगड ठेवण्यांत आला होता आणि दार हलवितांच तो शोभनाच्या मस्तकावर आदळला होता. कौशिकांनीं खालीं वाकून तो दगड पाहिला. पण त्याला स्पर्श केला नाहीं.

'तिला प्रथम कुणीं पाहिलें?' त्यांनीं विचारलें.

'मीच पाहिलें.' ती म्हणाली, 'एक वाजतां नानी भोजनासाठीं तिला हांक मारीत होती. पण ती आली नव्हती. पंधरा मिनिटांपूर्वी ती स्वयंपाकघरांतून पाठीमागें गेली होती. ती बहुधा त्या दारावर झोंके घेत असेल. नानीनेंच मला सुचविलें.'

'म्हणजे तिची ती संवय घरांतील सर्वांना माहीत होती असेंच ना?' कौशिकांनीं विचारलें.

'होय.' सुचित्रा म्हणाली, 'जेव्हां मी तिला पाहिलें तेव्हां ती जमिनीवर पसरली होती आणि तिचे केंस रक्तानें माखले होते.'

कौशिकांनीं हातरुमालानें तो दगड उचलला आणि ते म्हणाले, 'ह्यावर कदाचित् बोटांच्या खुणा सांपडतील. पण मला वाटतें ज्या कुणाचें हें काम असेल त्यानें बरीच खबरदारी बाळगिली असावी. सूर्यकांत, तूं काय शोधीत आहेस?'

मी आंत असलेल्या सामानाकडे पहात होतों. तेथें एक पाठ तुटलेली लांकडी खुर्ची होती आणि बसावयाच्या ठिकाणीं माती पसरली होती.

'हें मोठें विलक्षण आहे' कौशिक त्या खुर्चीकडे पहात म्हणाले, 'कुणीतरी मातीनें माखलेल्या पायानें ह्या खुर्चीवर उभें होतें. पण तसें करण्याचें कारण काय? सुचित्राबाई, तुम्हीं तिला पाहिलें तेव्हां किती वाजलें होतें?'

'एक वाजून पांच मिनिटें झालीं होतीं.'

'आणि नानीनें तिला पंधरा मिनिटांपूर्वी घराच्या पाठीमागें जातांना पाहिलें होतें. म्हणजे त्या वीस मिनिटांच्या अवधींतच तो प्रकार झाला होता आणि हल्ला करणारा त्यापूर्वीच येथें गेला होता.' कौशिक म्हणाले.

आम्हीं घरांत प्रवेश केला. वाचनालयांत नेहमींच्या खुर्चीवर शेषनाथ बसला होता. त्याची चर्या उतरली होती. त्याच्या पायाजवळ चित्रमाला बसली होती आणि ती रडत होती.

मी जेव्हां तिचें सांत्वन करूं लागलों तेव्हां ती हातरुमालानें डोळे पुसत म्हणाली, 'ती कशी होती हें तुम्हांला माहीत नाहीं. अगदीं लहानपणापासूनच कुठें काय चाललें आहे हें समजावून घेण्याची तिला संवय होती. ती भोजनाच्या टेबलाखालीं लपून नोकरांचें बोलणें ऐकत असे. अलीकडे ती पेन्सिलीनें आपल्या छोटया वहीमध्यें कांहींतरी लिहीत असें.'

'पण तिची ती वही कुठें आहे?' मी विचारलें

ती वही कुणालाच सांपडली नव्हती. ती कुणीं पळविली असावी कीं, तिनेंच आपल्या खोलींत कुठें दडविली असावी? मी कौशिकांबरोबर तिच्या खोलीकडे गेलों आणि आम्ही दोघेहि उंबरठयाबाहेरच उभे राहिलों.

आम्हांला जें दृश्य दिसलें तें अगदींच विलक्षण होतें. जणुं काय भयंकर सोसाटयाच्या वादळानें ती जागा उध्वस्त केली होती. तिचें सर्व सामान खोलीभर पसरलें होतें. तिचीं अंथरुणें पांघरुणेंहि जमिनीवर फेकलीं होतीं. कुणीतरी घाईघाईनें तेथें येऊन कांहींतरी शोधीत असावें हयांत शंका नव्हती

'त्यावेळीं घरांत कोण होतें तें तुम्हीं पाहिलें काय?' मी विचारलें.

'होय. शेषनाथ, चित्रमाला, नानी आणि सुचित्रा तळमजल्यावर होतीं. वरच्या मजल्यावर बिंदा होती. माधव आणि सुधीर हे होते. मावशी एकटीच बागेंत होती आणि रघुनाथ आपल्याच खोलींत होता. त्याची बायको तेंकें दुखत असल्यामुळें आपल्या खोलींत एकटीच बसली होती. त्यांच्यांतील कुणालाहि हें काम करणें अशक्य नव्हतें.'

एकाएकीं मला कांहीं आठवण झाली आणि मी धांवतच वरच्या मजल्यावर गेलों. कौशिक मला अडविण्याचा प्रयत्न करीत होते. पण मी त्यांच्या अडविण्यानें थांबलों नाहीं. मी ज्या दारानें बाहेर पडतांना एकदां शोभनाला पाहिलें होतें तेथें गेलों. त्यावेळीं तिचे हात आणि तोंड धुळीनें माखले होते आणि केंसाना कोळीष्टकें चिकटलीं होतीं.

ती अडगळीची खोली होती. मला माझा हेतु साध्य करण्यास फक्त तीन मिनिटें लागलीं. तेथल्या जुन्या फडताळांत मला एक पत्रांचें पुडकें मिळालें. मीं त्यांतील पहिलेंच पत्र वाचलें–

" प्रिय माधव, गेल्या रात्रीं तुम्ही जी कविता म्हणत होतां, ती माझ्याचसाठी होती, हें मी ओळखलें होतें. माझी खात्री आहे कीं, लवकरच सगळें कांहीं ठीक होईल. त्यांना त्यांच्या मृत्यूपूर्वी हें समजलां कामा नये. त्यांना सुखानें मृत्यू यायला हवा. त्यांनीं माझ्यावर फार उपकार केले आहेत. त्यामुळें त्यांना कसलेंहि दुःख होतां कामा नये. पण माणसानें ऐंशीहून अधिक वर्षें जगण्यांत काय अर्थ आहे ? माझें तुझ्यावर प्रेम आहे..."

अशाच अर्थाचा आणखी बराच मजकूर त्या पत्रांत होता. मी गंभीर मुद्रेनें खाली गेलों आणि माझ्या हातांतील पुडकें कौशिकांच्या स्वाधीन केलें. त्यांनीं वरचें पत्र वाचलें, खालची कांहीं पत्रें चाळून पाहिली. नंतर समाधानी वृत्तीनें माझ्याकडे पाहिलें.

' बिंदा आणि माधव ह्यांचेंच हें काम आहे.' कौशिक म्हणाले, ' तें सिद्ध करण्यास आणखी काय पुरावा हवा आहे ?'

० ० ०

१२ : मृत्युपत्राचें वाचन !

' माधवानेंच तिच्यासाठीं तो सांपळा तयार केला. मला जें कोडें पडलें होतें तें आतां उलगडलें.' कौशिक म्हणाले, ' त्या मुलीलाहीं पत्रें सांपडलीं आणि तीं परत मिळविणें ह्या जोडीच्या दृष्टीनें अतिशय महत्त्वाचें होतें. ह्या पत्रांसाठींच तिला ठार करण्याचा प्रयत्न झाला. हीं पत्रें शोधण्यासाठींच तिची खोली उध्वस्त करण्यांत आली. एक खून केल्या-

नंतर दुसरा सहज करतां येतो. आणि त्या मुलीची दाराला झोंके घेण्याची संवय सर्वांनाच माहीत होती. पण खून करणारा बुद्धिमान नसावा असें मला वाटलें.'

'कशावरून ?' मी विचारलें.

'जर त्यानें तो दगड तेथून हलविला असता तर त्या मुलीवर हल्ला करण्यांत आला हेहि आपणाला समजलें नसतें. निदान आपण बचकळ्यांत तरी पडलों असतों.'

'बाबदल तुम्ही काय करूं शकाल ?' मी विचारलें.

'मला असें वाटतें कीं, माधवला अत्याचार पसंत नसावेत किंवा स्वतः हिंसक कृत्य करण्याची हिंमत त्याच्यांत नसावी. त्या मुलीच्या डोक्यावर दगड मारणें किंवा तिचा गळा दाबणें त्याला शक्य नव्हतें. म्हणून त्यानें ती युक्ति योजली. पुढें काय घडतें तें पहाण्यास तो थांबलाहि नसावा. आणि त्यानेंच इन्सुलीन आणि इसरीन ह्यांची अदलाबदल केली असावी.'

'तें काम त्यानें बिंदाच्या नकळतच केलें असावें काय ?'

'होय, त्यामुळेंच तिनें इन्सुलीनची बाटली कां फेंकली नाहीं ह्याचा खुलासा होतो. इसरीनची माहिती कदाचित् माधवाला तिच्याकडूनहि मिळाली असेल. पण हा दुसरा खून खात्रीनें माधवानें केला आहे. तिला ही कल्पनाच सुचली नसती. उद्यां कॉरोनर चौकशीनंतर साखरदांडे ह्या कुटुंबांतील मंडळींना नव्या मृत्युपत्राची माहिती देणार आहेत.'

• ० •

कॉरोनर चौकशींत विशेष कांहीं घडलें नव्हतें. पोलिसांच्या सूचनेनुसार ती पुढें ढकलण्यांत आली होती. आम्ही सर्व खुषीत होतों, कारण शोभनाची जखम डॉक्टरांना प्रथम वाटली होती तितकी गंभीर नव्हती आणि तिची प्रकृति अत्यंत झपाट्यानें सुधारेल अशा प्रकारची बातमी आम्हांला मिळाली होती. पण त्या अवधींत आम्हां कुणाला भेटण्याची तिला परवानगी नव्हती. प्रत्यक्ष तिच्या आईलाहि भेटण्याची परवानगी नव्हती.

'आईची आणि तिची भेट होतां कामा नये असें मीच डॉक्टरांना सुचविलें होतें.' सुचित्रा हळूच मला म्हणाली, 'डॉक्टरहि आईला ओळखतात आईनें तेथें दुःखाचें मोठें नाटक केलें असतें आणि शोभनाच्या प्रकृतीवर त्या गोष्टीचा वाईटच परिणाम झाला असता.'

'तूं अगदीं सर्व गोष्टींचा विचार करतेस.' मी हंसून म्हणालों.

'आतां आजोबा नाहींत. तेव्हां दुसऱ्या कुणीतरी विचार करायला हवाच.' ती म्हणाली.

चौकशीनंतर साखरदांडे आम्हां सर्वांबरोबर घरीं आले होते. घरांत शिरतांच ते आपला घसा खाकरून मोठ्यानें म्हणाले, 'मी तुम्हां सर्वांना कांहीं महत्त्वाची बातमी सांगणार आहें.'

ती बातमी ऐकण्यासाठीं सर्वजण चित्रमालेच्याच दिवाणखान्यांत एकत्र झाले होते. साखरदांडे काय सांगणार त्याची माहिती असल्यामुळें मी माझ्या चर्येवर इतर कुणालाहि कांहीं आविर्भाव दिसूं नयेत अशी खबरदारी घेतली होती. साखरदांडेंनीं प्रथम सुमंतलालांचें पत्र व नंतर मृत्युपत्र वाचलें.

मी बिंदा किंवा माधव ह्यांच्याकडे विशेष लक्ष देत नव्हते. सुमंतलालांनीं त्यापूर्वीच बिंदाला भरपूर पैसे दिलें होतें आणि तिला आणखी पांच लक्ष रुपये मिळणार होते. मी, रघुनाथ आणि शेषनाथ ह्या दोघांच्या बायका ह्यांच्याकडे लक्ष देत होतों.

सर्वांची त्या वेळेची वागणूक चांगली होती असें माझें मत बनलें होतें. शेषनाथनें आपले ओंठ घट्ट मिटले होते आणि डोकें खुर्चीच्या पाठीला टेकलें होतें. तो कांहींच बोलला नव्हता. चित्रमालेनें मात्र साखरदांडे थांबतांच हावभावयुक्त भाषण करण्यास सुरुवात केली होती.

ती म्हणाली, 'सुचित्रा, तो म्हातारा किती लबाड होता. आमच्या कुणावरहि त्याचा विश्वास नव्हता. म्हणून त्यानें आम्ही कुणी रागावूं नये ह्यासाठीं ही युक्ति शोधून काढली होती. मला वाटतें ही कथा चित्रपटासाठीं फार चांगली आहे.'

'पुरें झालें.' शेषनाथ म्हणाला.

'गरीब बिचारे रघुनाथ भावोजी.' चित्रमाला हावभाव करीत पुढें म्हणाली, मामंजी त्यांना मदत करणार होते पण त्यापूर्वीच ते मरण पावले. सुचित्रा, आतां तूं तुझ्या काकासाठीं कांहीं तरी केलें पाहिजेस.'

'नाहीं सुचित्रा.' रघुनाथची बायको लागलीच म्हणाली, 'तूं कांहीं सुद्धां करतां कामा नयेस.'

रघुनाथ आपल्या जागेवरून उठला आणि आपल्या पुतणीचे दोन्हीं हात प्रेमानें धरून म्हणाला, 'मला तूं पैसे पुरवूं नकोस हें प्रकरण आटोपलें कीं, मी तुझ्या काकीसह पराठवाड्यांत रहाणार आहें आणि सामान्य जीवन जगणार आहें. जर मला कधीं गरज लागली तर मी माझ्या पुतणीला पत्र पाठवीनच.'

नंतर रघुनाथ मावशीजवळ गेला आणि दोन्ही हात तिच्या गळ्यांत अडकवून म्हणाला, 'तूं आमच्यासाठीं खूप केलें आहेस. आणखीहि करण्याची तुझी इच्छा होती. ह्याचा मला कधींहि विसर पडणार नाहीं.'

हळूहळू ती सर्व मंडळी तेथून निघून गेली. साखरदांडे नाखूषच होते. ते आपलीं कागदपत्रें गोळा करीत होते. तेथून निघून जाण्याची तयारी झाल्यानंतर ते म्हणाले, 'सुचित्राबाई, मी तुमचें अभिनंदन करतों. तुम्हांला तात्पुरत्या खर्चासाठीं हवी असलेली रक्कम केव्हांहि मिळं शकेल. संपत्तीची काय व्यवस्था करावी, ह्याबंधीं माझा सल्ला लागल्यास मी तो देण्यास केव्हांहि तयार आहें.'

'पण रघुनाथ–' तेथून निघून जाण्याच्या बेतांत असलेली मावशी म्हणाली.

'रघुनाथ कांहीं लहान नाहीं.' साखरदांडे म्हणाले, 'त्याचें वय चौपन्न वर्षांचें आहे आणि त्याच्यांत व्यापारी वृत्ति नाहीं. सुचित्राबाईंनी आपले पैसे त्याच्या धंद्यांत गुंतवून त्याला आतां सांवरलें तरी त्यांचे ते पैसे पुढें मागें बुडणारच.'

'मी तसें करणार नाहीं. तसें करणें मूर्खपणाचें ठरेल.' सुचित्रा म्हणाली.

सुधीर रागावला होता. तो म्हणाला, 'आजोबांनीं माझ्यावर मोठा अन्याय केला आहे. आतांपर्यंत मी त्यांचा जुलूम सहन केला. आतां मला

सुचित्राचा जुलूम सहन करावा लागणार आहे.'

सुधीर पाय आपटीत निघून गेला. सुचित्रा अगदीं शांत होती. सर्व मंडळी तेथून निघून गल्यानंतर मी तिला म्हणालों, 'तुझ्या आजोबांनीं तुलाच आपलें वारसदार कां नेमलें हें आतां मला समजलें. तूं खरोखरच त्या आजोबांना शोभण्यासारखी नात आहेस.'

० ० ० ०

त्यावेळीं शोभना हजर नव्हती ह्याचें मलाहि वाईट वाटलें होतें. तो प्रकार पाहून ती खात्रीनें खूष झाली असती. तिची प्रकृति अपाटधानें सुधारत होती आणि ती आतां कोणत्याहि दिवशीं घरीं परतणार होती. पण एक महत्त्वाची घटना तिला पहातां आली नव्हती.

एके दिवशीं सकाळीं मी, सुचित्रा–बिंदा यांच्यासह पुढल्या बागेंत येत असतांना एक मोटार येऊन पुढल्या दाराजवळ उभी राहिली आणि कौशिक व त्यांचे मदतनीस खालीं उतरून घरांत गेले.

बिंदा त्या मोटारीकडे पहातच राहिली होती ती म्हणाली, 'हे पोलीस परत आले आहेत. मला वाटतं होतें ते आतां कधीं येणार नाहींत.'

तिचें सर्वांग शहारत होतें. ती दहा मिनिटांपूर्वीच आमच्या जवळ आली होती. बाहेर फिरावयास जाण्याचा तिचा बेत होता. तिनें एकाएकीं विचारलें, 'सुचित्रा, तूं माधवांना नोकरीवरून एकाएकीं कां काढून टाकावेस ?'

'कारण आम्ही सुधीरची कांहीं वेगळी व्यवस्था करणार आहोंत आणि शोभनाला पांचगणीला पाठविणार आहोंत–'

बिंदा कांहीं बोलण्यापूर्वीच कौशिक घरांतून बाहेर पडले आणि सरळ आमच्याकडे आले. ते बिंदाकडे पहात अधिकारयुक्त स्वरांत म्हणाले, 'सुमंतलालांवर विषप्रयोग करण्याच्या आरोपावरून मी तुम्हांला अटक करणार आहें. आतां तुम्ही जें बोलाल तें लिहून घेतलें जाईल आणि खटल्याच्या वेळीं पुरावा म्हणून दाखल करण्यांत येईल.'

बिंदा मोठ्यानें किंचाळली आणि मग म्हणाली, 'हें खरें नाहीं. सूर्यकांत, तुम्ही त्यांना सांगा, मी तें केलें नाहीं. मला त्याबद्दल कांहींच माहिती नाहीं.'

मी तिला शांत करण्याचा प्रयत्न केला. तिच्या बचावाची योग्य व्यवस्था करण्यात येईल असें तिला सांगितलें. नंतर ती माझ्यापासून दूर झाली आणि म्हणाली, 'तुम्हीं माधवरावांचें काय केलेंत ?'

'त्यांनाहि अटक करण्यांत आली आहे.' कौशिक म्हणाले.

तिला जबरदस्त धक्का बसला. तिच्या डोळ्यांतून अश्रुधारा वहात होत्या. ती मुळींच गडबड न करतां कौशिकांबरोबर मोटारीकडे गेली. कौशिकांचा भदतनीस माधवला घेऊन बाहेर आला. ते सर्व मोटारींत बसले आणि मोटार निघून गेली

मी एक दीर्घ निःश्वास सोडला आणि सुचित्राकडे वळलों. ती अतिशय खिन्न दिसत होती ती म्हणाली, 'आपण बिंदाच्या बचावासाठीं पहिल्या प्रतीचा वकील नेमला पाहिजे. पण त्यांना आतांच कां अटक करण्यांत आली ? पोलिसांजवळ पुरेसा पुरावा नव्हता ना ?

'पोलिसांना त्यांचीं प्रेमपत्रें मिळालीं आहेत.' मी म्हणालों.

'त्यांनीं तसलीं पत्रें जवळ बाळगावींत हा किती मूर्खपणा होता !' ती म्हणाली, 'झालें तें वाईटच झालें. पण आपण असेंच कांहीं घडण्याची अपेक्षा करत नव्हतों काय ?' मी म्हणालों, 'कुणातरी योग्य माणसानें तुझ्या आजोबांचा खून केला असें सिद्ध झालें तर बरें होईल असें तं बिंदूमाधव क्लबमध्यें म्हणाली होतीस.'

'होय' ती म्हणाली, 'मला वाटतें आतां आम्ही यांतून सुटलों. तुमचीहि अशीच खात्री आहे ना ?'

'सुचित्रा, तुझ्यावर तर कधींच कुणाचा संशय नव्हता' मी म्हणालों.

तिची चर्या एकदम उतरली आणि ती म्हणाली, 'माझाहि संशय व्यायला हवा होता. कारण खून करण्याचें मलाहि कारण होतें.'

मी दचकलों व म्हणालों, 'हें तुला म्हणणें योग्य नाहीं. तुला त्या मृत्युपत्राबद्दल कांहींच माहिती नाहीं.'

'पण मला ती माहिती होती.' ती म्हणाली, 'पंधरा दिवसांपूर्वीच आजोबांनीं मला तें सांगितलें होतें. आपण आपली सर्व संपत्ति तुला दिली आहे आणि तूं आपल्या मागें सर्व कुटुंबाचें संरक्षण केलें पाहिजेस. असें ते मला म्हणाले होते.'

आम्ही घराकडे परतलों. मी सुचित्रानें जें सांगितलें त्याबद्दल विचार करीत होतों. त्यावेळीं ती आणखीहि कांहीं म्हणाली ह्याची मला आठवण झाली. तसेंच जर कांहीं साधारण असलें तर आपण सुद्धां खून करूं असें ती म्हणाली होती.

० ० ०

१३ : तिसरा मृत्यु !

समोरून रघुनाथ आणि त्याची बायको घाईघाईनें आमच्याकडे येत होतीं. रघुनाथ उत्सुक आणि उत्तेजित दिसत होता. त्याच्या बायकोच्या कपाळावर आंठ्या पसरल्या होत्या.

'एकदाचें तें घडलें !' रघुनाथ म्हणाला, 'मला वाटत होतें कीं, ते त्या दुष्ट बाईला कधींच अटक करणार नाहींत. ते इतके दिवस कां थांबले होते हें एका ईश्वरालाच माहीत. पण आतां त्यांनीं तिला आणि तिच्या प्रियकराला पकडलें आहे आणि त्या दोघांनाहि फांसावर लटकवण्यांत येईल अशी मला आशा वाटते.'

'तुम्ही असे रानटी माणसासारखें वागूं नका.' त्याची बायको कपाळावर जास्तच आंठ्या चढवीत म्हणाली.

'मी रानटी-? त्यांनीं एका असहाय्य आणि त्यांच्यावर संपूर्ण विश्वास टाकणाऱ्या वृद्धावर निर्दयतेनें विषप्रयोग केला आणि मला आनंद होतो कीं शेवटीं खुनी पकडले गेले आहेत आणि त्यांना योग्य शिक्षा होणार. मी तुला सांगतों, मीं स्वतःच त्या बाईचा मोठ्या आनंदानें गळा दाबला असता. सुचित्रा, पोलीस येथें आले तेव्हां ती तुमच्या बरोबर होती. तिच्यावर काय परिणाम झाला होता ?'

'काका, तो प्रकार भयंकर होता !' हलक्या आवाजांत सुचित्रा म्हणाली. ती अतिशय घाबरली होती.

'फार चांगलें झालें !' रघुनाथ म्हणाला.

'असा खुनशीपणा दाखवूं नका.' त्याची बायको म्हणाली.

'तुला तें समजणार नाहीं. कारण तो तुझ्या वडिलांचा प्रश्न नव्हता. माझें माझ्या वडिलांवर अतिशय प्रेम होतें. तुला तें कसें समजत नाहीं ?'

'तें आतां मला समजूं लागलें आहे.'

रघुनाथ अर्धवट चेष्टेनें म्हणाला, 'तुझ्यांत मुळीं कल्पनाशक्तीच नाहीं. समज, जर मी बाबांवर विषप्रयोग केला असता—'

ती आपल्या हाताचा मुठी आवळून रागानें म्हणाली, 'गंमत म्हणून सुद्धां असें कांहीं बोलूं नका.'

आम्ही घराकडे निघालों. रघुनाथ आणि सुचित्रा पुढें चालत होती. सुचित्राची काकी आणि मी पाठीमागून चालत होतों आणि काकी म्हणाली, 'मला वाटतें आतां ते आम्हांला जाऊं देतील'

'तुम्हांला येथून निघून जाण्याची फार घाई झाली आहे काय?' मीं विचारलें.

'त्यामुळें माझ्या मनावर आणि शरीरावर परिणाम होत आहे. सूर्यकांत, मी माझ्या सुखासाठीं धडपडत आहें. माझ्या आणि सुचित्राच्या काकाच्या. ते त्यांना येथेंच रहाण्याचा आ ह करतील. सुचित्रा त्यांना पैसेहि देऊं करील अशी मला भीति वाटतें. मला सर्व कोलाहलापासून दूर जावयाचें आहे आणि त्यांचें नवें जीवन असें घडवायचें आहे कीं त्यांत त्यांना अपयश येणार नाहीं.'

मी फक्त मान डोलाविली आणि त्याच वेळीं एक मोटार वाड्याच्या पुढल्या दारासमोर उभी राहिली. मी आनंदानें म्हणालों, 'ती पहा आपली शोभना परत आली.'

शोभना आणि चित्रमाला मोटारींतून खालीं उतरल्या होत्या. शोभनाच्या मस्तकाच्या भोंवतीं बँडेज होतें. पण एरव्हीं ती फार चांगली दिसत होती.

मोटारींतून खालीं उतरतांच ती म्हणाली, 'आई, मला माझे सोनेरी मासे पहावयाचे आहेत.' आणि ती तेथल्या छोट्या तळ्याकडे जाण्यासाठीं आमच्याच रोखानें येऊं लागली.

'शोभना, तूं प्रथम घरांत चल आणि थोडा वेळ पडून रहा.' तिची आई म्हणाली, 'मी तुला भाजीचा सूप देतें.'

'आई, तूं काळजी करूं नकोस.' शोभना म्हणाली, 'मी अगदीं बरी आहें आणि मला तुझा तो सूप मुळींच आवडत नाहीं.'

बिचारा आईला काय करावें हें समजेना. कित्येक दिवसांपूर्वीच शोभना हॉस्पिटलांतून बाहेर येण्याइतकी बरी झाली होती. पण कौशिकांनीं मुद्दाम तेथें तिला ठेवलें होतें, हें मला माहीत होतें. त्यांचा ज्यांच्यावर संशय होता, त्यांना कोठडींत बंद केल्यावरच त्यांनीं शोभनाला बाहेर येऊं दिलें होतें. आतां शोभना सुरक्षित रहाणार होती.

मी चित्रमालेला म्हणालों, 'ताज्या हवेंत ती कांहीं वेळ फिरली कीं तिला बरें वाटेल आणि मी तिच्यावर लक्ष ठेवतों.'

तळघाजवळ पोहोंचण्यापूर्वीं मी शोभनाला गांठलें आणि म्हणालों, 'तुझ्या गैरहजेरींत अनेक गोष्टी घडल्या आहेत.'

तिनें उत्तर दिलें नाहीं आणि ती तळघांत डोकावत म्हणाली, 'मला वेडा कुठें दिसत नाहीं ?'

'कोणता वेडा ?' मी विचारलें.

'माझा एक सोनेरी मासा. वेड्यासारखा पळत असतो आणि तो मला आतां कुठें दिसत नाहीं.'

'तूं सुचित्राला सांग कीं ती तुला तसल्या प्रकारचे कित्येक मासे विकत घेऊन देईल' मी म्हणालों, 'आजोबांनीं सर्व संपत्ति तिला दिली आहे. हें तुला समजलें आहे का ?'

ती कंटाळलेल्या नजरेनें माझ्याकडे पहात म्हणाली, 'मला तें आईनें सांगितलें आहे व त्यापूर्वीहि मला तें समजलें होतें.'

'म्हणजे तुला तें हॉस्पिटलांत समजलें होतें ?'

'आजोबांनीं तिला तें सांगितलें तेव्हां मीं तें दाराला कान लावून ऐकलें होतें.' ती म्हणाली, 'त्यावेळीं जवळपास नानी नव्हती म्हणून बरें झालें. ती म्हणते कीं तसें करणें सभ्य माणसांना शोभत नाहीं.'

'नानीचें म्हणणें अगदीं बरोबर आहे. आडून ऐकणें वाईटच. शिवाय आडून ऐकणाऱ्याला स्वतःची निंदा ऐकावयास मिळते हें तुला माहीत आहे काय ?'

'त्यांत काय झालें ?' ती मान उडवीत म्हणाली, 'सत्य आणि नीति यांना अलीकडच्या जगांत किंमत नाहीं असें माधव मास्तरांनींच एकदां सांगितलें होतें.'

मी तो विषय बदलला आणि म्हणालों, 'तुला एक फार मोठी गोष्ट पहावयास मिळाली नाहीं. इन्स्पेक्टर कौशिकांनीं बिंदा आणि माधव ह्यांना अटक केली आहे.'

'मला तें माहीत आहे.' ती म्हणाली.

'तुला तें कसें माहीत असणार? तूं येथें येण्यापूर्वी तर तें घडलें.'

'पण वाटेंत आम्हांला त्यांची मोटार भेटली आणि त्यावरून मी तें ओळखलें. पण कौशिकांनीं त्यांच्या हातांत बेड्या घातल्या नव्हत्या.'

'कौशिक ती काळजी घेतील.' मी म्हणालों, 'पण शोभना, आतां त्यांची तीं पत्रें सांपडलीं आणि मी तीं पोलिसांना दिलीं.'

ती आपल्या मस्तकावरून हात फिरवीत म्हणाली, 'मी खरें म्हटलें तर मरायलाच हवें होतें. दुसरा खून होण्याची वेळ आली आहे असें मी तुम्हांला सांगितलेंच होतें.'

त्याचवेळीं मावशीची हाक ऐकूं येऊं लागली, 'शोभना, तूं ताबड तोब येथें ये.'

त्या मुलीनें उसासा सोडला आणि ती म्हणाली, 'आतां मला गेलें पाहिजे. मावशीचें ऐकायलाच हवें.'

शोभना धांवत सुटली आणि मी सावकाश तिच्यामागून चालूं लागलों. ओटीवर उभ्या असलेल्या मावशीबरोबर दोन शब्द बोलून ती आंत गेली. मावशी ओटीवरच उभी होती. आज मला ती अतिशयच म्हातारी दिसत होती. मी तिच्या चर्येवरील सुरकुत्या पाहून बचकलों होतों. मी तिच्याकडे कांहींशा चितायुक्त नजरेनें पहात आहे हें तिनें ओळखलें आणि तिनें हसण्याचा प्रयत्न केला.

'तें एकदां समाप्त झालें ह्याचा मला आनंद होतो.' ती निःश्वास सोडून म्हणाली, 'काय पण तमाशा! जरी खुनासाठीं अटक झाली असली तरी माणसानें आपली प्रतिष्ठा सांभाळली पाहिजे. त्या बिंदाचें सोडा, पण तो माधवसुद्धां थरथरत होता. पण सूर्यकांत, हें प्रकरण समाप्त होण्यास किती वेळ लागेल? त्यांच्यावरील खुनाचा आरोप सिद्ध होईल असें तुला वाटतें काय?'

'कांहीं सांगतां येत नाहीं.' मी म्हणालों, 'पोलिसांजवळ त्यांच्या प्रेमपत्राशिवाय आणखी किती पुरावा आहे हें मला माहीत नाहीं.'

'त्यांचीं प्रेमपत्रें सांपडलीं ? सूर्यकांत, हें एकून मला आनंद होत नाहीं.' मावशी म्हणाली, 'पण बिंदाच्या बचावासाठीं योग्य ती खबरदारी घ्यायला हवी. जर आपण तसें केलें नाहीं तर त्या म्हाताऱ्याच्या आत्म्याला कष्ट होतील.'

'सुचित्रा ती व्यवस्था करणार आहे.' मी म्हणालों.

मावशीनें मान हलविली आणि नंतर ती म्हणाली, 'आतां भोजनाची वेळ झाली आहे. तुम्ही जेवत घेणार नाहीं काय ?'

'पण मी आतां मुंबईला जाणार आहें.'

'तुम्ही मला तुमच्याबरोबर न्याल काय ?' तिनें विचारलें, 'मला वाटतें आतां आम्ही कुठेंहि गेलों तरी पोलीस हरकत घेणार नाहींत.'

'पोलीस हरकत घेणार नाहींत आणि मीहि मोठ्या आनंदानें नेईन.' मी म्हणालों, 'पण भोजन केल्यानंतर सुचित्रा आणि तिची आई मुंबईला जाणार आहे. तुम्ही त्यांच्याबरोबर जर गेलांत तर तुमचा प्रवास अधिक आरामशीर होईल.'

'नाहीं, माझी त्यांच्याबरोबर जाण्याची मुळींच इच्छा नाहीं. मला तुमच्याबरोबरच न्या आणि ह्याबद्दल कुठेंहि बोलूं नका.'

मला त्या बोलण्याचें आश्चर्य वाटलें होतें, पण मी त्यांना माझ्याबरोबर नेलें आणि तिच्या सूचनेप्रमाणें ऑपेरा हाऊसच्या नाक्यावर सोडलें. मावशीला तिच्या डॉक्टरांकडे जायचें होतें हें त्यावेळीं मला समजलें.

मी माझ्या वडिलांकडे गेलों तेव्हां ते सुबंतलाल प्रकरणाचीच कागदपत्रें चाळीत होते, म्हणून मी कौशिकांच्या खोलींत गेलों. ते बरेच खुषींत दिसत होते.

'तुमच्याजवळच्या पुराव्याच्या आधारावर त्यांच्यावर खुनाचा आरोप सिद्ध होईल काय ?' मी म्हणालों.

'तें सांगणें फार कठीण आहे.' ते म्हणाले, 'कारण आमच्याजवळ

प्रत्यक्ष पुरावा कांहींच नाहीं. मीं माझें कर्तव्य केलें आहे आणि त्यांतून तूं आणि मी सुटलों आहोंत. पुढें काय करावयाचें तें कोर्टाचें काम आहे.'

कां कुणास ठाऊक, पण कौशिकांचें पूर्ण समाधान झालें नव्हतें तीन दिवसांनंतर मी त्यासंबंधीं माझ्या वडिलांबरोबर चर्चा केली तेव्हां त्यांनाहि त्या प्रकरणाबद्दल अद्याप शंका आहे असें मला दिसून आलें.

'सूर्यकांत, खरा गुन्हेगार त्यांच्या कुटुंबांतीलच कुणी तरी आहे असें तुला वाटतें ना ?' त्यांनीं विचारलें.

'मला तसें वाटत नाहीं, पण ज्या दोघांना अटक करण्यांत आली आहे, त्याचें तें काम असावें असेंहि मला वाटत नाहीं.' मीं सत्य सांगितलें.

'तर मग तुझ्या मतें तें कुणाचें काम असावें ?' वडिलांनीं विचारलें.

'माझी त्याबद्दल खात्री नाहीं. बिंदाचें तें काम असावें अशी रघुनाथची खात्री दिसते. आणि तिला फांसावर चढविण्यांत यावें असें त्याचें म्हणणें आहे. त्या घरांतील प्रत्येकानेंच बिंदाचा संशय घेतला आहे त्याचें काय कारण असावें ?'

'कारण त्यांच्यापैकीं ती कुणालाहि मनापासून अपराधी असावी असें वाटत नाहीं.' माझे वडील म्हणाले, 'पण तो खून कुणीं केला असेल ? तुझें त्या सर्वांशीच बोलणें झालें आहे तुझ्या मतें खुनी कोण ?'

'मला तें समजलच नाहीं. त्यांच्यांतील कुणीहि खुनी माणसाच्या माझ्या चित्राशीं जुळणारा नाहीं. पण त्याबरोबरच त्यांच्यांतील कुणीतरी खुनी आहे ह्यांतहि शंका नाहीं.'

'तुला सुचित्राचा संशय येतो काय ?'

'नाहीं ! अर्थातच नाहीं !' मी जोरांत म्हणालों.

'पण तुझ्या मनांत तो विचार आला होता हें तूं नाकारूं नकोस.' माझे वडील किंचित हंसून म्हणाले, 'त्या शेषनाथाबद्दल तुझें काय मत आहे ?'

'तो रघुनाथाचा अतिशय मत्सर करतो, पण तसा मत्सर तो सर्व आयुष्यभरच करत आला आहे. वडिलांचे रघुनाथवर जास्त प्रेम असावें हें त्याला आवडत नव्हतें. रघुनाथचें दिवाळें वाजण्याच्या बेतांत होतें आणि सुमंतलाल त्याला त्यांतून वांचविणार होते. समजा, हें जर शेष-

नाथाला समजलें असतें तर तो...पण मी कांहींतरीच तर्क करीत आहें.'

'हा तुझा तर्क भलताच नाहीं.' वडील म्हणाले, 'तो मानवी प्रवृत्तीला धरूनच आहे. आतां त्या चित्रमालेचें काय ?'

'तिचा स्वभाव अगदीच पारकट आहे. तिनें एकाएकीं शोभनाला दूर पाठविण्याचा निर्णय घेतला होता. पण तिला, शोभनावर तिला माहीत असलेल्या माहितीमुळें कांहीं संकट ओढवेल अशी भीति वाटली असावी.'

'तिला भीति वाटली आणि तसें प्रत्यक्ष घडलेंहि. असा माझ्याकडे पाहूं नकोस. प्रत्यक्ष आईनें आपल्या अभंकाचा खून केल्याचीं अनेक उदाहरणें आहेत. तुला त्या रघुनाथबद्दल काय वाटतें ?'

'त्यानें तो खून केला नाहीं असें मीं पूर्वींच सांगितलें होतें.'

'आणि त्याची बायको ?'

'तिनें जर तो खून केला असला तर त्याचें कारण बरेंच वेगळें असलें पाहिजे. आपण बाहेरगांवीं जाणार आहोंत ही गोष्ट रघुनाथनें आपल्या वडिलांना कळवूं नये असें तिचें म्हणणें होतें, पण सुमंतलालांनीं तर त्याच्या कंपनीचा व्यवहार सुधारण्याचें ठरविलें होतें. त्यामुळें कदाचित् चिडून जर तिनें...'

'आणि तो मावशी ?' वडिलांनीं विचारलें.

'मावशी तो खून सहज करूं शकली असती, पण तिनें तो कां करावा तें मला समजत नाहीं.' मी म्हणालों, 'बिन्दाचा योग्य बचाव झाला पाहिजे असें तिचें म्हणणें आहे. तेव्हां तिनें त्या दोघांना पोलिसांच्या ताब्यांत देण्याचा प्रयत्न केला असें मी म्हणणार नाहीं.'

'आणि तिनें शोभनाच्या मस्तकावर प्रहार करून तिला ठार करण्याचा प्रयत्न केला असता काय ?'

'नाहीं, मुळींच नाहीं.' मी म्हणालों.

'कुटुंबांतील आणखी माणसांचा आपण विचार केलेला नाहीं.' वडील म्हणाले, 'तो सुधीर खून करूं शकला असता. त्याला शाळेंत शिकण्याची परवानगी मिळाली नाहीं म्हणून तो मनांतून आजोबांवर जळत होता आणि त्याला शोभना आवडत नाहीं असेंहि मी ऐकलें आहें.'

'तें खरें आहे.' मी म्हणालों, 'त्या शोभनाला सर्व कांहीं माहीत आहे आणि ती तें सर्व आपल्या डायरींत लिहीत होती आणि तिची ती डायरी सांपडलेली नाहीं. मला वाटतें, अद्याप ती तिच्याजवळ असावी आणि जर--' मी माझें बोलणें अर्धवट सोडलें आणि अस्वस्थ होऊन उभा राहिलों.

'जर ती डायरी तिच्याजवळच असली तर ती अद्याप सुरक्षित नाहीं असेंच तुला म्हणावयाचें आहे ना?' वडिलांनीं विचारलें, 'तुला जर तशी भीति वाटत असली तर तूं पुन्हां तेथें जाणें योग्य होईल.'

मी कांहीं बोलण्यापूर्वींच टेलिफोनची घंटी वाजली आणि माझ्या वडिलांनीं कांहीं ऐकल्यानंतर रिसीव्हर माझ्या हातीं दिला. सुचित्रानें मला टेलिफोन केला असावा हें मी त्यांच्या चर्येवरूनच ओळखलें होतें.

सुचित्राचें पहिलेंच वाक्य ऐकून मला धक्का बसला. ती म्हणाली 'सूर्यकांत, तें प्रकरण सपलेलें नाहीं. खुनी माणूस अद्याप घरांतच आहे.'

'ह्या तुझ्या बोलण्याचा अर्थ काय?' मी घाबरून विचारलें, 'म्हणजे पुन्हां शोभनावर--'

'नाहीं ह्या खेपेला नानीवर संकट कोसळलें. शोभनासाठीं तयार केलेला कोको तिनें घेतला नव्हता आणि तो तसाच टेबलावर राहूं दिला होता. इतकी चांगली गोष्ट फुकट घालविणें चांगलें नाहीं, अशा विचारानें नानी तो कोको प्याली.'

'बिचारी नानी.' मी म्हणालों, 'तिची अवस्था वाईट आहे काय?'

'नानी मरण पावली!' ती म्हणाली.

० ० ०

१४ : रहस्यस्फोट !

ह्याहि खेपेला कौशिक आणि मी मोटारीनें वांकडच्या घराकडे गेलों. कौशिक अतिशय अस्वस्थ झाले होते. 'तर मग तें बिंदा आणि माधव ह्यांचें काम नव्हतेंच!'

मला मात्र त्या गोष्टीचा एक परीनें आनंदच झाला होता. मला

त्या दोघांबद्दलहि सहानुभूति वाटत होती. बिंदा कशीहि असली तरी ती आपल्या वृद्ध नवऱ्यावर विषप्रयोग करील असें मला वाटत नव्हतें. माधव तर अगदींच सज्जन आणि निरुपद्रवी दिसत होता. त्यांचें प्रेम-प्रकरण उघडकीस आलें आणि ते सांपळ्यांत सांपडले गेले म्हणून ते घाबरले होते. माधव शोभनाचा खून करण्याइतका खचितच निर्दय नव्हता.

आम्ही घरांत शिरलों तेव्हां एका साध्या पोशाखांतील पोलिसानें कौशिकाला सलाम केला आणि कौशिकांनीं त्याला एका बाजूला नेलें. माझें लक्ष एका बाजूला रचून ठेवलेल्या सामानाकडे गेलें. कुणींतरी प्रवासाची जय्यत तयारी केली होती.

मी त्या सामानाकडे पहात असतांनाच रघुनाथची बायको तेथें आली. तिच्या अंगावर बाहेर जाण्याचा पेहेराव होता, ती म्हणाली, 'सूर्यकांत, तुम्हीं आम्हांला निरोप देण्यासाठीं अगदीं वेळेवर आलांत. आम्ही आतांच मुंबईला जाणार आहोंत. उद्यां सकाळीं विमानानें हैद्राबाद येथें जाऊं.'

ती शांत दिसत होती. हंसतहि होती. पण तिची नजर अतिशय सावध होती. मी तिला म्हणालों, 'तुम्हांला जातां येणार नाहीं. घरांत हा असला प्रकार घडला असतांना—'

'नानीच्या मृत्यूशीं आमचा कांहींच संबंध नाहीं.' ती कठोर स्वरांत म्हणाली, 'आम्ही त्यावेळीं दोघेजण वरच्या मजल्यावर सामानाची बांधाबांध करीत होतों आम्ही सबंध दिवसांत खालीं आलोंच नव्हतों.'

'तुम्ही तसें सिद्ध करूं शकाल काय?' मीं विचारलें.

'मी हयांच्याबद्दल शपथेवर सांगूं शकेन आणि ते माझ्याबद्दल सांगतील.' ती म्हणाली, 'शिवाय आम्ही एका मूर्ख म्हातारीवर विषप्रयोग कां करावा? त्या बिचारीचें आमचें कांहींच वाईट केलें नव्हतें.'

'पण शोभनावर विषप्रयोग करण्याचा तो प्रयत्न होता. केवळ दुर्दैवानें नानीचें तो कोको घेतला आणि शोभनाला बऱ्याच गोष्टी माहीत आहेत. त्यामुळें—'

त्याचवेळीं शोभना एक सफरचंद खात बाहेर आली. तिचे डोळे आनंदानें चकाकत होते. ती म्हणाली, ' अगदीं आजोबांप्रमाणेंच नानीवर विषप्रयोग झाला आहे. ही गंमत नाहीं काय ?'

' पण तुला हयाबद्दल कांहींच वाटत नाहीं ? ' मी जरा रागानेंच विचारलें, ' नानी तुला आवडत होती ना ?'

' मुळींच आवडत नव्हती. ' ती म्हणाली, ' ती मला नेहमींच कांहीं ना कांहीं कारणावरून दोष देत होती. '

' शोभना, हया घरांतील कुणावर तरी तुझें प्रेम आहे काय ? '

' माझें मावशीवर प्रेम आहे.' ती म्हणाली, ' सुधीर जरी माझ्या-बरोबर चांगल्या प्रकारें वागत नसला तरी त्याच्यावरहि मी कदाचित् प्रेम करीन. मी डिटेक्टिव्हगिरी करणें त्याला आवडत नाहीं. '

' तूं तुझा तो शोध आतां थांबवशील तर बरें होईल.' मी म्हणालों, ' तसें करणें तुझ्या दृष्टीनें सुरक्षिततेचें नाहीं. '

' मला तसें करावयाचेंच नाहीं. मला सर्व कांहीं समजलें आहे. '

कोणीतरी सुस्कारा सोडल्याचा आवाज मी ऐकला. मी मागें वळून पाहिलें. थोडयाच अंतरावर मावशी जिन्याजवळ उभी होती. पण तिनें तो सुस्कारा सोडला असावा असें मला वाटलें नाहीं. शोभना बाहेर आली होती त्या दारामागून तो आवाज झाला होता. मी त्वरेनें पुढें सरकून तें दार उघडलें. पण आंत कुणीच नव्हतें.

मी शोभनाचा हात पकडला आणि तिला जवळ ओढीतच एका छोटया खोलींत नेलें. नंतर दार बंद करून तिला त्या खुर्चीवर बसविलें आणि मी समोरच्या खुर्चीवर बसलों.

' बोल शोभना, तुला काय माहिती आहे ?' मी विचारलें.

' मला पुष्कळ गोष्टी माहीत आहेत.' ती चिडूनच म्हणाली.

' तुला त्या कोकोमध्यें कुणीं काय घातलें हें माहीत आहे ?'

' होय. ' ती म्हणाली.

' तुझ्या आजोबांवर कुणी विषप्रयोग केला हें तुला माहीत आहे ?'

' होय. ' ती पुन्हां म्हणाली.

' तुझ्यावर कुणी हल्ला केला हें तुला माहीत आहे ?' मीं विचारलें,

आणि तिनें मानेनेंच होकार दिला. ' तर मग तूं मला ते सर्व आतांच सांगितलें पाहिजेस. '

' सांगणार नाहीं. ' ती हट्टानें म्हणाली.

' तुला सांगायलाच हवें. ' मी जोरांत म्हणालों, ' ती सर्व हकीकत पोलिसांना सांगायला हवी. '

' मी पोलिसांना तर कांहींच सांगणार नाहीं. कारण ते मूर्ख आहेत. त्यांना वाटलें कीं तें काम बिंदा आणि माधवचें आहे. हा त्यांचा मूर्खपणा नाहीं काय ? त्या दोघांचें तें काम नाहीं हें मला चांगलें माहीत होतें. '

त्या मुलीला काय करावें तें मला समजेना. मी शक्य तितक्या शांत आवाजांत म्हणालों, ' हें बघ शोभना, तूं फार हुषार आहेस हयांत मुळींच शंका नाहीं. पण जोंपर्यंत तूं त्या सर्व गुप्त गोष्टी तुझ्या मनांतच ठेवशील तोंपर्यंत तुला धोका आहे हें तुला समजत नाहीं काय ?'

' मला अर्थातच धोका आहे. ' ती मान हलवीत म्हणाली.

' आतांपर्यंत तुझे प्राण घेण्याचे दोन प्रयत्न झाले. त्यांतून तूं मोठ्या नशिबानें निसटलीस. पण खुनी कोण हें आपणाला माहीत आहे असें ओरडत तूं घरभर फिरत आहेस. त्यामुळें पुन्हां तुला ठार मारण्याचा प्रयत्न होईल आणि जर तूं वाचलीस तर तुझ्याऐवजीं निष्कारण दुसरें कुणींतरी मरेल. '

' पण रहस्यकथांमधून खुनामागून खून होत असतात. ' ती हंसत म्हणाली, ' खुनी कोण हें तुम्हांला अगदीं शेवटीं समजतें. कारण तोपर्यंत त्याच्याशिवाय दुसरें कुणी शिल्लकच नसतें. '

' पण हो रहस्यकथा नाही.' मी जोरांत म्हणालों, ' हें जोगेश्वरी येथील वांकडें घर आहे आणि तूं अनेक रहस्यकथा वाचणारी एक वेडी मुलगी आहेस तुला मी जबरदस्तीनें बोलावयास भाग पाडीन.'

' पण मी तुम्हांला कांहींतरी खोटें सांगेन. ' ती म्हणाली, ' मी खरें सांगतें कीं खोटें हें तुम्हांला समजणारच नाहीं. त्या माणसावर जर माझें प्रेम असलें तर मी त्याचें नांव कधींच सांगणार नाहीं मी...'

त्याच वेळीं मावशी तेथें आली आणि ती म्हणाली, ' चल शोभना,

मी तुला माझ्याबरोबर मोटारीनें नेणार आहें. सूर्यकांत, हया पोरीला जरा एक तास फिरावयास मिळेल तर तें चांगलें होईल. आपण बोरिवली येथें जाऊं आणि आइस्क्रीम घेऊं.'

शोभना लागलीच खूष होऊन मावशीकडे गेली आणि म्हणाली, 'पण मला दोन प्लेट आइस्क्रीम लागेल.'

'तूं तुझे कपडे कर.' मावशी म्हणाली, 'सूर्यकांत, तुम्ही तोंपर्यंत तिला सोडूं नका. मला कांहीं लिहावयाचें आहे.'

मावशी तेथल्याच टेबलावर लिहावयास बसली आणि मी शोभनाबरोबर तिच्या खोलींत गेलों. मी शोभनाचे कपडे शोधून देण्यास व तिच्या तोंडाला पावडर लावण्यास मदत केली. मी तसें करीत असतांना सुचित्रा तेथें आली.

'तुम्हांला हेंहि काम करतां येतें हें मला माहीत नव्हतें.' ती म्हणाली.

'मी मावशीबरोबर बोरिवली येथें जाणार आहें आणि दोन प्लेट आइस्क्रीम खाणार आहें.' ती म्हणाली.

सुचित्रानें कपाळावर आंठ्या चढविल्या. ती चिंताग्रस्त दिसत होती. तिचा उतरलेला आणि घाबरलेला चेहरा पाहून मलाहि धक्का बसला होता. शोभनाला घेऊन आम्ही पूर्वीच्या खोलींत गेलों. मावशीनें दोन बंद लिफाफे टेबलावर ठेवले होते. आम्हांला पहातांच ती त्वरेनें उठली.

'आम्ही आतांच येथून निघणार.' ती म्हणाली, 'मी मोटार तयार करायला सांगितली आहें.'

शोभनाचा हात धरून मावशी बाहेर निघाली. आम्ही दोघहि त्यांच्यामागून बाहेर गेलों. मोटार दाराबाहेर उभी होती.

मावशी आकाशाकडे पहात म्हणाली, 'आजचा दिवस फार चांगला आहे. हें घर आणि आजूबाजूची बागहि किती चांगली दिसते.' नंतर तिनें सुचित्राजवळ जाऊन तिचें चुंबन घेतलें आणि ती म्हणाली, 'तूं मनाला फार लावून घेऊं नकोस. आयुष्यांत कांहीं गोष्टींना तोंड द्यावें लागतें आणि त्या सहनहि कराव्या लागतात. चल शोभना.'

मावशी मोटार चालविण्याच्या जागेवर बसली. शोभना तिच्या बाजूला बसली. मोटार सुरू झाल्यानंतर त्या दोघांनीं आमच्याकडे पहात हात हलविले आणि मोटार निघून गेली.

'मला वाटलें मावशीनें केलें तें योग्यच केलें.' मी म्हणालों, 'कांहीं वेळ शोभना बाहेर फिरली, तर ती थोडी जास्त खूष होईल. पण सुचित्रा, तिला जें कांहीं माहीत आहे तें आपण तिच्याकडून काढून घ्यायलाच हवें.'

'कदाचित् तिला कांहीं माहितीहि नसेल. आपण कुणीतरी फार महत्त्वाचे आहोंत असेंहि ती दाखवीत असेल. कारण तिचा तसा स्वभाव आहे.'

'तुला वाटतें तसें नाहीं.' मी म्हणालों, 'पण कोकोंत कोणत्या प्रकारचे विष मिसळविलें होतें हें पोलिसांना समजलें काय?'

'होय, मावशी हृदयविकारासाठीं कांहीं गोळ्या घेत असे. त्या गोळ्यांनीं भरलेली बाटली तिच्या खोलींत होती. आतां ती बाटली रिकामी आहे.'

'पण मावशीनें उरल्या गोळ्या बंद करून ठेवायला हव्यात.'

'तिनें त्या कपाटांत बंद केल्याच होत्या. पण तिची कपाटाची चावी मिळविणें कांहीं कठीण नव्हतें.'

'पण तें काम कुणाचें असावें?' मी गोठ्यानें म्हणालों, 'त्यांना येथून जाऊं देतां कामा नये.'

सुचित्राला आश्चर्य वाटलेलें दिसलें. ती म्हणाली, 'तुम्ही हें काका-काकीबद्दल बोलतां? तुम्हांला असें तर वाटत नाहीं...'

'तुला काय वाटतें?' मीं उलट विचारलें.

'मला कांहींच वाटत नाहीं.' ती अगदीं हलक्या आवाजांत म्हणाली, 'मला अतिशय भीति वाटते. मला ह्या घरांत रहाण्याचीहि भीति वाटते...'

o o o o o

आम्ही बराच वेळ बाहेरच्या बागेंत बसलों होतों आणि जणुं काय आपसांत ठरवूनच घरांतील भयानक प्रकाराबद्दल बोलत नव्हतो. त्या-

ऐवजीं सुचित्रा वृद्ध नानीच्या जुन्या आठवणी सांगत होती. नानीनें तिच्या वडिलांना, काकांना व त्यांच्या इतर भावंडांना लहानाचें मोठें केलें होतें. नंतर सुचित्रेला व तिच्या सर्व भावंडांनाहि सांभाळलें होतें.

त्या आठवणी सांगतांना सुचित्राला खूपच बरें वाटत होतें आणि त्यामुळें त्या सांगतांना तिला मी उत्तेजन देत होतों. मी मनांतून विचार करीत होतों कीं, कौशिक काय करीत असतील. अर्थात्च ते सर्व घरांतील मडळींना प्रश्न विचारीत असणार.

शेवटीं ती पोलिसांची मोटार तेथून निघून गेली. आंत छायाचित्रकार आणि ठसे घेणारे बसले होते. त्यानंतर एक ॲम्ब्युलन्स तेथें आली. सुचित्राच्या अंगावर शहारे आले. लवकरच ती ॲम्ब्युलन्सहि निघून गेली. वृद्ध नानीचें प्रेत अधिक तपासणीसाठीं तेथून हलविण्यांत आलें होतें.

तरीहि आम्ही बागेंत बसून बोलतच होतों. त्या शब्दांच्या बुरख्याखालीं आम्ही आमच्या मनांतील खरे विचार दडविण्याचा प्रयत्न करीत होतों. शेवटीं अंगावर शहारे देऊन सुचित्रा म्हणाली, 'फार उशीर झाला आहे. अंधार पडूं लागला आहे. आतां आपण आंत गेलेंच पाहिजे. मावशी आणि शोभना परत आल्या नाहींत. त्या केव्हांच परत यायला हव्या होत्या.'

मनांतून मी अस्वस्थ झालों. काय घडलें असावें ? मावशी हेतुपुरस्सर त्या मुलीला माझ्यापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न करीत असेल काय ?

आम्ही सर्व घरांत गेलों. एका मोलकरणीनें सुचित्राच्या सांगण्यावरून आम्हांला चहा आणून दिला. रडल्यामुळें त्या मोलकरणीचे डोळे लाल बनले होते आणि ती अधूनमधून घाबरून पाठीमागें पहात होती. सुचित्राप्रमाणें तिलाहि भयानें पछाडलें होतें.

नंतर चित्रमाला तेथें आली आणि म्हणाली, 'मावशी आणि शोभना कुठें आहेत ? त्यांना बाहेर जाऊन बराच उशीर झाला आहे ना ?'

ती तसें सहज म्हणाली होती. पण त्यामुळें माझी अस्वस्थता वाढीस

लागली होती. मी कौशिकांना शोधून काढलें आणि त्यांना ती हकीकत सांगितली. ते ताबडतोब टेलिफोनकडे गेलें आणि त्यांनीं पोलिसांना कांहीं सूचना दिल्या.

'मला बातमी मिळाली कीं मी ती तुम्हांला सांगेन'

मी पुन्हां दिवाणखान्यांत गेलों. आतां सुचित्राबरोबर सुधीर बसला होता. आतां तिची आई तेथून गेली होती. मी सुचित्राला म्हणालों, 'कौशिकांना कांहीं बातमी मिळाली कीं ते आपणाला सांगणार आहेत.'

ती हलक्या आवाजांत म्हणाली, 'सूर्यकांत, कांहींतरी घडलें आहे. कांहींतरी घडलेंच असणार.'

'पण सुचित्रा, तुला वाटतो तितका उशीर झालेला नाहीं.' मी म्हणालों.

'तुम्ही इतकी चिंता कां करतां तें मला समजत नाहीं.' सुधीर म्हणाला, 'त्या बहुधा सिनेमा पहायला गेल्या असतील.'

सुधीर खांदे उडवीत तेथून निघून गेला आणि मी सुचित्राला म्हणालों, 'मावशींनीं बहुधा शोभनाला एखाद्या हॉटेलांत नेलें असेल किंवा त्या तिला घेऊन मुंबईला गेल्या असतील. त्या मुलीला धोका आहे हें त्यांनीं आपणापेक्षांहि चांगल्या प्रकारें ओळखलें असेल.'

सुचित्रा माझ्याकडे चमत्कारिक नजरेनें पहात होती. ती म्हणाली, 'मावशीनें मला निरोप द्यावा त्याप्रमाणें मला जवळ ओढून माझें चुंबन घेतलें.'

मी कांहीं बोललों नाहीं. आम्ही बसलों होतों. कांहीं वाचण्याचा प्रयत्न करीत होतों. साडेसहा वाजतां कौशिक तेथें आले आणि त्यांची चर्या पहातांच आम्ही दोघे घाबरलों.

'मला माफ करा. पण फार वाईट बातमी घेऊन आलों आहें.' ते म्हणाले, 'मी त्या मोटारीचा शोध करण्यासाठीं आजूबाजूच्या सर्व पोलीस ठाण्यांना सूचना दिल्या होत्या. अंधेरीकडून वेसावेकडे जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूला एका दगडाच्या खाणींत ती मोटार कोसळली आहे. मोटारींतील दोन्ही माणसें ठार झाली आहेत.'

'माझी शोभना!' कौशिकांच्या पाठीमागून तेथें आलेली चित्र-

माला ओठचानें हुंदका देऊन म्हणाली.

ती सुचित्राजवळ गेली आणि तिनें तिला मिठी मारली आणि मी म्हणालों, ' जरा थांबा.'

मावशीनें घरांतून बाहेर पडण्यापूर्वी दोन पत्रें टेबलावर लिहून ठेवलीं होतीं. त्यांची मला आठवण झाली. मी धांवतच बाजूच्या त्या छोट्या खोलीकडे गेलों. तेथल्या टेबलावर दोन पत्रें होतीं. वरचें पत्र कौशिकांच्या नांवें लिहिलें होतें. माझी गडबड पाहून कौशिकहि माझ्या मागें आले होते. त्यांना तें पत्र दिलें. त्यांनी तें पत्र वाचलें. मीहि त्यांच्या मागें उभा राहून तें वाचत होतों.

" माझी अशी अपेक्षा आहे कीं हें पत्र माझ्या मृत्यूनंतर उघडण्यांत येईल. मी तपशील सांगण्याच्या भानगडींत पडत नाहीं, पण माझे मेहुणे, सुमंतलाल आणि नानी ह्यांच्या मृत्यूची सर्व जबाबदारी माझी आहे. बिंदा आणि माधव हे निरपराधी आहेत आणि त्यांनीं सुमंतलालांचा खून केला नाहीं.

" तुम्ही जर ऑपेराहाऊसच्या नाक्यावरील डॉ. नवरंगे ह्यांच्याकडे चौकशी केलीत तर मी फार कांहीं महिने जगलें असतें असेंच ते आपणाला सांगतील. दोघा निरपराधी माणसांवर त्यांनीं न केलेल्या खुनाबद्दल आरोप ठेवण्यापूर्वी ह्या मार्गानें निघून जाणें मी पसंत केलें आहे. मी पूर्ण शुद्धीवर असून मी काय लिहिलें आहे हें मला बरोबर समजत आहे.

त्या पत्राखालीं मावशीची सही होती. माझ्याजवळ उभें राहून सुचित्रानेंहि तें पत्र वाचलें होतें. ती हळूच म्हणाली ' मावशी...'

मला पूर्वीच्या अनेक गोष्टी आठवल्या. मावशीचा मला सुरुवातीपासूनच थोडा संशय येत होता. पण——

सुचित्रानेंच माझ्या मनांतील विचार बोलून दाखविले. ती म्हणाली, ' पण मावशीनें शोभनाला कां बरोबर नेलें ?'

' मीहि तेंच विचारीत आहें.' मी म्हणालों, ' तसें करण्यांत तिचा उद्देश काय ?'

पण बोलत असतांनाच सर्व सत्य माझ्या लक्षांत आलें होतें. मावशीचें दुसरें पत्र माझ्या हातांतच होतें. मीं त्याकडे पाहिलें तेव्हां लिफाफ्यावर माझेच नांव दिसलें. तो लिफाफा बराच मोठा आणि जड होता. त्यांत काय असावें हें मी उघडण्यापूर्वीच ओळखलें होतें. मीं तो उघडला आणि शोभनाची मोठी डायरी खाली पडली. मी खाली वाकून ती उघडली. आणि पहिल्याच पानावर लिहिलेला मजकूर वाचला.

कित्येक मैलांवरून बोलावें त्याप्रमाणें मला सुचित्राचा आवाज ऐकूं आला. 'आपण चूक करीत आहोंत. मावशीच्या हातून तसें घडणार नाहीं.'

'तें खरें आहे.' मी म्हणालों.

सुचित्रा माझ्याजवळ आली आणि हळूंच म्हणाली, 'हें शोभनाचें काम होतें ना ?'

आम्हीं दोघांनीं मिळून डायरीच्या पहिल्या पानावर वेड्यावांकड्या अक्षरांत लिहिलेली ती नोंद वाचली.

"आज मीं आजोबांचा खून केला !"

० ० ० ०

मी इतका आंधळा कसा बनलों होतों हें मला समजेना. सुरवातीपासूनच सत्य अगदीं स्पष्ट दिसण्यासारखें होतें. खून करण्यासाठीं आवश्यक असलेले सर्व गुणधर्म शोभनामध्यें होते. तिचा बढाईखोरपणा, आपण फार हुषार आहोंत. अशी तिची कल्पना, बोलतांना तिला होणारा आनंद आणि पोलीस मूर्ख आहेत हें तिचें पालुपद !

ह्या सर्व गोष्टी स्पष्ट असूनहि ती एक लहान मुलगी होती म्हणून माझें त्याकडे लक्ष गेलें नव्हतें. पण लहान मुलांनींहि खून केले आहेत आणि हा खून लहान मुलाला करणें अवघड नव्हतें. तिच्या आजोबांनींच त्यांना कसें ठार करतां येईल हें सांगितलें होतें. फक्त आपले बोटाचे ठसे कुठें उमटणार नाहींत एवढी खबरदारी तिला घ्यावयाची होती व तेवढें ज्ञान तिला रहस्यकथा वाचनामुळें मिळालेलें होतें. बाकीची सर्व सामुग्री तिनें वाचलेल्या रहस्यकथांतून गोळा केली होती.

ती डायरी, तिची डिटेक्टिव्हगिरी, संशयाबद्दलची बताचणी आपणास जें माहीत आहे तें आपण कधींच कुणाला सांगणार नाहीं असें तिचे वारंवार म्हणणें...

स्वतःवर हल्ला करण्याचा तिचा तो प्रयत्न खरोखरच कौतुकास्पद होता. तो प्रयोग करण्यांत ती कदाचित् ठारहि झाली असती, पण तिच्या बालिश मनाला तो विचार शिवलाहि नव्हता. ती हया तिच्या रहस्य-कथेची नायिक होती आणि नायिकेला कधींच मरण नसतें! तेथल्या एका खुर्चीवर मातीच्या रूपानें तें काम कुणीं केलें असावें हया संबंधींचा पुरावा तेथें होताच कमानीवरील फटीमध्यें तो मोठा दगड ठेवण्या-साठीं फक्त तिलाच त्या खुर्चीवर उभें रहावें लागणार होतें, पण तें त्यावेळीं आमच्या लक्षांतहि आलें नव्हतें.

तिनें ती अजब शक्कल लढविली होती. तिनें आपली रहस्यकथा बरोबर सजविली होती. तिला कांहींतरी माहीत होतें आणि त्यामुळें तिला धोका होता आणि तिच्यावर हल्लाहि झाला होता !

ती मुद्दामच माझें लक्ष वेधण्यासाठीं अभ्यासाच्या खोलीशेजारच्या अडयळीच्या खोलींतून बाहेर आली होती. त्या ठिकाणीं माधव आपलीं प्रेमपत्रें लपवीत होता, हें तिनें शोधून काढलें होतें. दाराला धरून झोके घेण्यापूर्वी ती स्वतःच तिच्या खोलींत शिरली होती आणि तिनेंच तेथलें सामान फेकून त्या खोलीची कुणीतरी कसून तपासणी केली होती असा आभास निर्माण केला होता.

जेव्हां ती हॉस्पिटलांतून पटत आली आणि बिंदा व माधव हयांना धटक करण्यांत आली असें समजलें, तेव्हां ती नाखूष झाली असावी. तेव्हां तें प्रकरण संपणार होतें आणि शोभनाला कांहींच महत्त्व उरणार नव्हतें.

म्हणून तिनें माधवीच्या खोलींतून त्या विषारी गोळया पळविल्या होत्या आणि त्या आपल्या कोकोच्या प्याल्यांत घातल्यानंतर तो तसाच टेबलावर राहूं दिला होता. नानीच तो कोको घेईल हें तिला माहीत असावें काय ? बहुधा तिचा तसा तर्क असावा. नानीनें तिला लहान-

पणापासून सांभाळलें होतें. तिच्यांत कांहीं विकृति आहे हें नानीला माहीत होतें. त्यामुळेंच नानी तिच्यावर एक प्रकारचा पहारा करीत असे. त्यामुळेंच ती नानीचा द्वेष करीत होती

तिच्या घर्त आजोबांनाहि तिचा तो दोष माहीत असावा. म्हणूनच त्यांनीं तिला शाळेंत न पाठवितां तिचा घरांतच शिकविण्यासाठीं माधवा-सारख्या एका हुषार शिक्षकाची नेमणूक केली होती. त्यांना तिचीच जास्त भीति वाटत होती. त्यामुळेंच त्यांनीं सुचित्राला आपलें वारस-दार नेमलें होतें. इतर कुणाहिपेक्षां सुचित्राच आपल्या धाकट्या बहिणीला सांभाळील हें त्यांना माहीत होतें.

वृद्ध मावशीलाहि तें माहीत होतें. सुमंतालालचा खून झाल्यानंतर तिला संशय आला होता, नंतर भीति वाटली होती आणि शेवटीं तिला सत्य समजलें होतें आणि भावी अनर्थ टाळण्यासाठीं तिनें त्या मुलीसह आत्मबलिदान केलें होतें !

मी माझ्या हातांतील पत्र वाचण्यास सुरवात केली--

—" प्रिय सूर्यकांत, हें पत्र मी फक्त तुझ्यासाठींच लिहीत आहें. तुला वाटलें तर तूं तें सुचित्रालाहि वाचावयास देऊं शकतोस. कुणाला तरी सत्य माहीत असणें आवश्यक आहे. मला सोबतची डायरी घराच्या पाठीमागें कुत्र्यासाठीं तयार केलेल्या जुन्या लांकडी खुराड्यांत सांपडली. ती तिची डायरी लपविण्याची जागा होती. ती डायरी वाचून मला वाटत असलेल्या संशयाला दुजोरा मिळाला मी जो उपाय योजिला आहे तो बरोबर आहे कीं चुकीचा आहे हें मला माहीत नाहीं. माझ्या आयु-ष्याचा शेवट अगदीं जवळ आला आहे आणि त्या मुलीला यातना सहन कराव्या लागूं नयेत अशी मला इच्छा आहे. तिनें जें केलें तें उघडकीस आलें तर तिला अतिशय यातना होणारच.

' माझी जर चूक होत असली, तर ईश्वरानें मला क्षमा करावी पण सर्व कुटुंबासाठीं आणि कुटुंबावरील प्रेमासाठींच मी हें करीत आहें. ईश्वरानें तुम्हा दोघांनाहि सुखी ठेवावें.

तुमची—मावशी "

क्षणभरात घुटमळून मी तें पत्र सुचित्राला वाचण्यास दिलें. नंतर आम्ही बापानीं मिळून शोभनाची डायरी वाचण्यास सुरुवात केली.

" मी आज आजोबाचा खून केला. मला नृत्य शिकावयाचें होतें. त्या गोष्टीला जेव्हां आजोबांनीं हरकत घेतली तेव्हांच मी त्यांचा खून करण्याचें ठरविलें होतें. आजोबा नाहींसे झाले म्हणजे आम्हांला मुंबईत रहावयास मिळेल आणि मी नृत्य शिकूं लागलें तर आई हरकत घेणार नाहीं."

शोभनानें रोज घडणाऱ्या गोष्टी लिहून ठेवल्या होत्या. पण त्याकडे लक्ष न देतां मी तिनें केलेल्या कांहीं महत्त्वाच्या नोंदी मोठ्यानें वाचल्या.

" मला पांचगणीला जावयाचें नाहीं. मी जाणार नाहीं. जर आईनें माझ्यावर तशी जबरदस्ती केली तर मी तिचाहि खून करीन. त्यासाठीं विष कुठून मिळवायचें हा प्रश्न आहे. पण बाजूच्या रानांत धोतऱ्याच्या बिया मिळतात. मी त्यांचा उपयोग करीन. "

" आज मला सुधीरनें फारच चिडविलें. तो म्हणतो कीं मी मुलगी आहे आणि मला कधींच डिटेक्टिव्ह होतां येणार नाहीं. मीच तो खून केला हें जर त्याला ससजलें तर तो मला मूर्ख म्हणणार नाहीं. "

" मला सूर्यकांत आवडतो. पण तो जरा मूर्खच आहे. गुन्हा कुणीं केला असें सिद्ध करावयाचें, तें मी अद्याप ठरविलेलें नाहीं बिंदा आणि माधव ही जोडी योग्य आहे. बिंदा मला फारच वाईट वागणूक देते. पण माधव मला आवडतो. कित्येक रहस्यकथांतील प्रसंग त्यानेंच मला समजावून सांगितले आहेत. तेव्हां काकीनें तो खून केला असें सिद्ध करावें. पण मी तें अद्याप ठरविलेलें नाहीं. "

शोभनानें डायरींत केलेली शेवटची नोंद महत्त्वाची होती.

" मी नानीचा अतिशय द्वेष करते. ती मला अगदीं लहान समजतें आणि सारखा उपदेश करते. मला घराबाहेर पाठविण्याची कल्पना तिनेंच आईला सुचविली. मी तिचा खून करणार आहें. मावशीच्या गोळ्यांचा त्यासाठीं उपयोग करतां येईल. जर आणखी एक खून झाला तर पोलीस परत येतील आणि मोठी गंमत पहावयास मिळेल."

" बानी मेली. मला फार आनंद झाला आहे. ती गोळ्यांची बाटली कुठें लपवावी तें मीं अद्याप ठरविलेलें नाहीं. ती मी काकीच्या खोलींत ठेवीन किंवा सुधीरच्या सामानांत लपवीन. मला जेव्हां वृद्धावस्थेंत मरण येईल तेव्हां मी ही डायरी त्या काळांतील पोलीस कमिशनरांकडे पाठवीन आणि ही असामान्य होतें हें त्यावेळीं जगाला समजेल !"

मीं डायरी बंद केली. सुचित्राच्या डोळ्यांतून सारख्या अश्रुधारा वहात होत्या.

मला शोभना आवडली होती. अद्यापहि मला तिच्याबद्दल अतिशय सहानुभूति वाटत होती. त्या वांकड्या घरांतील तें एक वांकडें पाऊल पडलेलें लहान मूल होतें. ही जर जगली असती तर तिला बाल गुन्हेगारांच्या तुरुंगांत टाकण्यांत आलें असतें. कदाचित् वेड्याच्या हॉस्पिटलांतहि दाखल करण्यांत आलें असतें. तेव्हां जें घडलें होतें तें कांहीं वाईट नव्हतें. मावशीला त्यासाठीं आपलें बलिदान करावें लागलें होतें ही मात्र अतिशय वाईट गोष्ट होती.

त्यानंतर बिंदा आणि माधव ह्यांची सुटका होणार ह्यांत संशयच नव्हता. कोर्टांत पहिल्याच दिवशीं पोलिस त्यांच्यावरील आरोप मागें होते आणि त्यानंतर बहुधा ती जोडी विवाहबद्ध होणार होती.

मी आणि सुचित्राहि विवाहबद्ध होणार होतों. माझी ब्रह्मदेशांतील वकीलातींत नेमणूक झाली होती. मी सुचित्राला घेऊन तेथें जाणार होतों, त्यामुळें तिला त्या भयानक गोष्टीचें जलद विस्मरण होण्यास मदत होणार होती.

० ० ०

' सूर्यकांत, त्यांतील सत्य काय होतें ?' माझ्या वडिलांनीं विचारलें.

मी माझ्या वडिलांना कधींच असत्य सांगितलें नव्हतें. मी म्हणालों, ' बाबा, तें मावशीचें काम नव्हतें. तें सर्व त्या शोभनानें केलें होतें.'

माझ्या वडिलांनीं मान डोलाविली आणि ते मृदु स्वरांत म्हणाले, 'होय, मलाहि तसेंच वाटत होतें. म्हणून मी तिच्यावर नजर ठेवावयास तुला सांगितले होतें. गरीब बिचारी शोभना !'

गरीब बिचारी शोभना !

-० समाप्त ०-

(ह्या कादंबरीचे सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन.)

काममहर्षी कल्याणमल्ल यांचा विख्यात ग्रंथ !

अनंगरंग

मोहक मुखपृष्ठ आणि विषयानुरूप प्रत्येक आकर्षक चित्रांसह चौथी आवृत्ति प्रसिद्ध झाली.

पृष्ठें २२४. मूल्य रु. ५॥ फक्त

रजिस्टर्ड खर्चासह ६ रुपयांत बरोबर देऊ.

नवजीवन प्रकाशन, ५५१ बुधवार, पुणें २

कोका पंडितांच्या 'कोकशास्त्र' नामक सुप्रसिद्ध
संस्कृत ग्रंथाचें सुरस तसेंच सुबोध आणि
— सविस्तर मराठी भाषांतर —

पृष्ठें २०० **रंगेल रतिशास्त्र** कि. फक्त ५॥ रुपये

(८४ चित्रांसह)

सुधारून वाढविलेली चौथी आवृत्ति

रजिस्टर्ड ट. ख. सह ६ रुपयांत घरपोंच पाठवूं.

नवजीवन प्रकाशन, ५५१ बुधवार, पुणें २.

कामशास्त्राचा जगन्मान्य परिपूर्ण ग्रंथ–

वात्स्यायनांचें कामसूत्र

(सचित्र ४ थी आवृत्ति)

कित्येक मनमोहक चित्रें आणि मुळगांवकरांचें
सप्तरंगी कलात्मक वेष्टणचित्र.

पृष्ठें २२४, किंमत रु. ५॥ फक्त

व्ही. पी. नें ६ रुपयांत घरपोंच पाठवूं –

नवजीवन प्रकाशन, ५५१ बुधवार, पुणें २

• 'रहस्यमय, • रोमांचकारी, • विचित्र,
• विलक्षण, • अद्‌भुत, • भीषण, • विस्मयपूर्ण
आणि • साहस' कथांचें --

एक मस्त नवें मासिक

मस्तकथा

फेब्रुवारी १९६७ च्या अंकांत मन स्थगित करणाऱ्या
एकाहून एक वरचढ विस्मयकथा--

- होय, मी खुनी आहे !
- नरेंच निर्मियलें भूत जगीं !
- नाच !
- बळी !
- हुस्नबानू
- दुश्मन
- आणि ती पुन्हां हंसली नाहीं !
- तिसरा डोळा...

पृष्ठें ११६.... ....बहुरंगी मोहक छपाई

तिरंगी सूचक मुखपृष्ठ

आणि किंमत अवघी १ रुपया

[] खास अंकांसह वार्षिक वर्गणी फक्त १० रुपये []

-- सर्वत्र उपलब्ध --

उत्पादक **रम्यकथा प्रकाशन**, ५५१ बुधवार, पुणें २